# महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ

# वार्षिक अहवाल : सन २०१६-२०१७

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | तपशिल | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १ | महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ स्थापना व कार्य | ३-५ |
| २ | संचालक मंडळ | ६ |
| ३ | व्यवस्थापन | ७-८ |
| ४ | वित्तीय स्थिती | ९-११ |
| ५ | इतर विभाग | |
| | (अ) बाजार समिती विभाग | १२-१४ |
| | (ब) निर्यात विभाग | १५-२४ |
| | (क)प्रकल्प विभाग | २५-२६ |
| | (ड) अभियांत्रिकी विभाग | २७-३१ |
| | (इ) संगणक विभाग | ३२-३३ |
| | (ई) जनसंपर्क व प्रसिध्दी विभाग | ३४-४० |
| | (प) कृषि व्यापार विकास विभाग | ३९ – ५१ |
| | (फ) तळेगाव शेती विभाग | ५२-५३ |
| ६ | इतर प्रकल्प | |
| | १) आंतरराष्ट्रीय कृषि विकास निधी सहाय्यीत - कृषि समृद्धी : समन्वयीत कृषि विकास प्रकल्प (CAIM) | ५४-५७ |
| | २) जागतीक बँक सहाय्यीत - महाराष्ट्र कृषि स्पर्धाक्षम प्रकल्प (MACP) | ५८-६० |
| | ३) आशियाई विकास बँक (ADB) सहाय्यीत - कृषि व्यापार विषयक पायाभूत सुविधा विकास गुंतवणूक कार्यक्रम (AIDIP) | ६१-६३ |

# १. महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे - स्थापना व कार्ये

महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे ची स्थापना महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व नियमन) अधिनियम १९६३ मधील कलम ३९ (अ) अन्वये २३ मार्च १९८४ रोजी झाली. सन २०१६-१७ या वर्षामध्ये कृषि पणन मंडळाने ३३ वे वर्ष पूर्ण केले आहे व कृषि पणन मंडळाचा ३३ वर्षाचा कालावधी हा विविध क्षेत्रात यश संपादित करुन देणारा तसेच राज्यात कृषी पणन व्यवस्थेत अद्ययावतपणा बरोबरच सूसुत्रता आणि समन्वयता आणण्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण ठरला आहे. अहवाल वर्षात कृषि पणन मंडळाने कृषी पणन व्यवस्थेत आधुनिकीकरण, सुधारणा आणण्याबरोबरच राज्यात कृषी पणन व्यवस्था मजबूत करण्यासाठी विविध प्रकल्प राबविणे, योजना राबविणे, नवीन कार्यक्रम आखणे तसेच शेतकरी आणि शेतक-यांच्या संस्थांच्या विकासासाठी नियोजनबध्द प्रयत्न केले आहेत. राज्यात कृषि मालाच्या निर्यातीसाठी निर्यात सुविधा केंद्रांची स्थापना करुन ही केंद्रे सक्षमरित्या चालविण्यासाठी प्रयत्न केले आहेत. याचप्रमाणे महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व नियमन) अधिनियम १९६३ मध्ये बदल करणे आणि बाजार समित्यांसाठी मॉडेल ॲक्ट मधील तरतूदी लागू करणेसाठी प्रयत्न केले आहेत.

**उद्दीष्ट्ये व प्रमुख कार्यक्रम :**

महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व नियमन) अधिनियम १९६३ मधील कलम ३९ (ज) अन्वये कृषि पणन मंडळाची उद्दीष्टे खालीलप्रमाणे आहेत;

१. बाजार व बाजारक्षेत्रांच्या विकासासाठी बाजार समित्यांनी हाती घेतलेले कार्यक्रम राबवुन अशा बाजार समित्यांच्या कामामध्ये समन्वय राखणे.
२. कृषि उत्पन्न बाजारांच्या विकासासाठी राज्यस्तरीय नियोजनाचे काम हाती घेणे.
३. कृषि उत्पन्न पणन विकास निधीची व्यवस्था ठेवणे व त्याचे प्रशासन करणे.
४. बाजार समित्यांच्या कामकाजात सुधारणा घडवून आणण्यासाठी बाजार समित्यांना सरसकटपणे सल्ला देणे किंवा एखाद्या विशिष्ट बाजार समितीला सल्ला देणे.
५. बाजार समितीने हाती घेतलेल्या बांधकाम कार्यक्रमासंबंधातील आराखडे व अंदाज तयार करण्याच्या तिच्या कामावर पर्यवेक्षण करणे आणि त्याबाबत तिला मार्गदर्शन करणे.
६. कृषि उत्पन्नाच्या पणनशी संबंधित असलेल्या गोष्टींबाबत प्रचार व प्रसिध्दी करण्यासाठी आवश्यक ती व्यवस्था करणे.
७. या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी मंडळ निश्‍चित करील अशा अटींवर व शर्तींवर बाजार समित्यांना अर्थसहाय्य किंवा कर्ज देणे.
८. कृषि विषयक पणनच्या संबंधातील विषयांबाबत चर्चासत्रे, कार्यसत्रे व प्रदर्शने आयोजित करणे किंवा त्यांची व्यवस्था ठेवणे.
९. कृषि उत्पन्नाच्या पणन संबंधात सर्वसाधारण हिताच्या असतील अशा इतर गोष्टी करणे.
१०. या अधिनियमान्वये त्याच्याकडे विशेषरीत्या सोपविण्यात आले असेल असे इतर कोणतेही कार्य पार पाडणे.
११. राज्य शासन त्यांच्याकडे सोपवील अशी तत्सम स्वरुपाची इतर कार्ये पार पाडणे.

**अंमलबजावणीतील प्रमुख कार्यक्रम :**

१. विविध कृषी उत्पन्न बाजार समित्यांना बाजार व्यवस्था विकसित करणेकरिता नव-नवीन सुधारणाबाबत सल्ला देणे व त्यासाठी कर्ज उपलब्ध करुन देणे.
२. फळे भाजीपाला आणि फुले यांचे आयुष्य वाढविण्यासाठी सहकारी संस्थांना प्रशितीकरण करणे Valule addition Centre, शितगृहांची उभारणी करण्यासाठी तंत्रज्ञान उपलब्धतेबरोबरच उभारणीस मार्गदर्शन करणे.
३. विविध फळे, फुले आणि भाजीपाल्याची रोपे / बियाणे / कंद यांची आयात करणे.
४. बाजार समित्यांची लिलाव प्रक्रीया व कार्यालयीन कामकाजाचे संगणकीकरण करणे.
५. कृषि पणन मंडळ, पणन संचालनालय व बाजार समित्यांच्या कामकाजासाठी संगणक प्रणाली विकसित करुन कार्यान्वीत करणे.
६. बाजार समित्यांचे पदाधिकारी / अधिकारी यांचेसाठी प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करणे.
७. राज्यामध्ये उच्च तंत्रज्ञानावर आधारित, कृषी आधारित प्रकल्प वाढविणे तसेच त्यामध्ये उत्पादीत मालाच्या विक्रीसाठी मदत व मार्गदर्शन करणे.
८. विविध प्रदर्शनात भाग घेणे तसेच प्रदर्शनांचे आयोजन करणे.
९. शेतमाल तारण योजना राबविणेसाठी बाजार समित्यांना सवलतीच्या दराने कर्ज देणे.
१०. शेतमाल निर्यातवृध्दी होण्यासाठी शेतकऱ्यांच्या मालाचे नमुने परदेशात पाठविणे, निर्यातीबाबतची माहिती शेतकरी आणि शेतकऱ्यांच्या संस्थांना देणे व त्यांच्या मालाची निर्यात करुन देणे.
११. प्रकल्प अहवाल तयार करणे.
१२. तळेगांव ताभाडे येथील शेतीवर आधुनिक शेतीचे प्रयोग राबविणे.
१३. व्ही. एच. टी प्रकल्पातील सोई सुविधांचा व्यावसायिक उपयोग शेतकरी, निर्यातदार यांना करुन देणे.
१४. राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समित्यांना केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध योजनांचा फायदा तसेच अनुदान मिळवून देण्यासाठी मदत आणि मार्गदर्शन करणे.
१५. बाजार समित्यांना राज्यातील तसेच परराज्यातील अभ्यास दौऱ्यांसाठी मार्गदर्शन करणे.
१६. “कृषि पणन मित्र” मासिकाचे प्रकाशन आणि वितरण करणे.
१७. ‘उत्पादक ते ग्राहक’ योजना वेगवेगळ्या शहरांमध्ये राबविणेकरिता संस्थांना प्रोत्साहीत करणे.
१८. प्रसिध्दी माध्यमांशी योग्य समन्वय ठेवून कृषि पणन मंडळाच्या विविध योजनांना प्रसिध्दी देवून त्यांची माहिती बाजार समिती, शेतकरी, शेतकऱ्यांच्या संस्था यांच्यापर्यंत पोहोचवून त्याचे फायदे शेतकऱ्यांना करुन देणे.
१९. राष्टीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्थेअंतर्गत माती परिक्षण, शेतकरी प्रशिक्षण तसेच सुगी पश्चात तंत्रज्ञानासंबंधात विविध चाचण्या घेणे.
२०. कृषि पणन मंडळातील अधिकाऱ्यांची / कर्मचाऱ्यांची कार्यक्षमता वाढविण्याचे दृष्टिने त्यांना प्रशिक्षित करणे.
२१. कृषि निर्यात क्षेत्र अंतर्गत निर्यात सुविधा केंद्रांची उभारणी करणे.
२२. हॉर्टिकल्चर ट्रेनिंग सेंटर मध्ये पूर्ण क्षमतेने प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन करणे तसेच नव नविन पिकांबाबत प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करणे.
२३. उत्पादक ते ग्राहक कृषि माल विक्री योजना कार्यान्वीत करुन तिचा प्रचार आणि प्रसार करणे
२४. कृषि पणनाशी संबंधीत विषयावर माहिती पुस्तिका तयार करणे.
२५. राज्यातील बाजार समित्यांचा व्यवसाय विकास आराखडा तयार करणे.
२६. राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत कृषि विपणनाच्या सुविधा निर्माण करणे.
२७. नक्षलग्रस्त भागातील कृषि उत्पन्न बाजार समित्यांमध्ये राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत सोयी सुविधांची उभारणी करणे.

२८. कृषि मालाचे ब्रँण्ड विकसित करणे.

२९. राष्ट्रीय कृषी बाजार (National Agriculture Market) प्रकल्पात राज्यातील ३० बाजार समित्यांचा समावेश करणे.

३०. कृषि उत्पन्न बाजार समित्यांसाठी कॉमन अकौंटिंग सिस्टिमचा वापर करणे.

३१. उत्पादक ते ग्राहक उपक्रमाअंतर्गत "शेतकरी आठवडे बाजार" योजनेची संपूर्ण राज्यात अंमलबजावणी करणे.

३२. शेतकरी उत्पादक कंपन्यांना सल्ला सेवा, मदत, मार्गदर्शन करणे तसेच शेतकरी उत्पादक कंपन्यांना शेतमाल विक्री व्यवस्थेसाठी मार्गदर्शन करणे, त्यांचे मजबूतीकरण करणे.

३३. आंतरराज्य व्यापार वृध्दीसाठी प्रयत्न करणे या अंतर्गत राज्यातील शेतीमाल शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या माध्यमातून इतर राज्यात विक्री करणे तसेच इतर राज्यातील शेतीमाल विना मध्यस्त आपल्या राज्यात विक्रीसाठी आणणे.

३४. निर्यातदार आणि शेतकरी / गट / कंपन्या यांचे सांगड घालून निर्यातीला प्रोत्साहन देणे, मार्गदर्शन करणे.

३५. निर्यातीस चालना देण्यासाठी " हॉर्टिकल्चर एक्सपोर्ट ट्रेनिंग प्रोग्राम " आयोजित करुन निर्यातदार तयार करणे.

३६. निआम - जयपूर, मॅनेज – हैद्राबाद, आय.आय. एफ.टी. – नवी दिल्ली, डी.एम.आय.,वैकुंठ मेहता नॅशनल इन्स्टीट्यूट ऑफ को-ऑप मॅनेजमेंट, आय.सी.एम., पुणे यांच्या मदतीने विविध प्रशिक्षण, कार्यक्रमाचे आयोजन करणे. तसेच त्यांचे मार्फत आयोजित प्रशिक्षण कार्यक्रमांमध्ये कृषि उत्पन्न बाजार समित्या तसेच कृषि पणन मंडळाचे अधिकारी पाठविणे.

## २. संचालक मंडळ

| अ.क्र. | संचालकाचे नाव व पदनाम |
|---|---|
| १) | मा.ना.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (दि.१०/०७/२०१६ पर्यंत)<br>मा.ना.श्री.सुभाष सुरेशचंद्र देशमुख (दि.११/०७/२०१६ पासून )<br>मंत्री, सहकार, पणन आणि वस्त्रोद्योग,<br>महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई –३२. तथा<br>मा.अध्यक्ष महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ., पुणे |
| २) | मा.ना.श्री.राम शिंदे (दि.१०/०७/२०१६ पर्यंत)<br>मा.ना.श्री.सदाशिव रामचंद्र खोत (दि.११/०७/२०१६ पासून)<br>राज्यमंत्री, कृषि,फलोत्पादन व पणन .<br>महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई – ३२ तथा<br>मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ.,पुणे. |
| ३) | मा.श्री.दिलिपराव मोहिते,<br>सभापती, महाराष्ट्र राज्य बाजार समिती सहकारी संघ मर्या., पुणे तथा<br>मा.सदस्य, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे. |
| ४) | मा.श्री.चंद्रकांत दळवी, भा.प्र.से.<br>सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था,<br>महाराष्ट्र राज्य, पुणे. |
| ५) | मा.चिफ जनरल मॅनेजर,<br>नाबार्ड प्रतिनिधी, पुणे. |
| ६) | मा.श्री.विकास देशमुख, भा.प्र.से.<br>आयुक्त, (कृषि)<br>कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे. |
| ७) | मा.श्री.भवेश कुमार जोशी,<br>उपकृषि पणन सल्लागार,<br>प्रादेशिक कार्यालय, मुंबई. |
| ८) | मा.ॲड.सुधिर दौलतचंद कोठारी,<br>सभापती, कृषि उत्पन्न बाजार समिती, हिंगणघाट, जि.वर्धा तथा<br>मा.सदस्य, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे. |
| ९) | मा.श्री.तात्यासाहेब दगडू हुले,<br>सभापती, कृषि उत्पन्न बाजार समिती, पाटोदा, जि.बीड<br>मा.सदस्य, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे. |
| १०) | मा.डॉ.किशोर तोष्णीवाल (दि.०९/०१/२०१७ पर्यंत)<br>मा.श्री.सुनिल पवार (०९/०१/२०१७ पासुन)<br>पणन संचालक,महाराष्ट्र राज्य,पुणे |
| ११) | मा.श्री मिलिंद आकरे (०१/०४/२०१६ ते २२/६/१६)<br>मा.श्री.एम.आर.मोरे (२२/०६/१६ ते १२/०८/२०१६)<br>मा.डॉ.के.झेड.तोष्णीवाल (१२/०८/२०१६ पासुन)<br>कार्यकारी संचालक,<br>महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे<br>तथा सदस्य सचिव |

# ३. व्यवस्थापन

| क्र. | अधिकाऱ्याचे नाव व पदनाम | कालावधी | विभाग |
|---|---|---|---|
| १. | श्री. एम.डब्ल्यू. आकरे (अतिरिक्त पदभार) | २२/०६/२०१६ पर्यंत | कार्यकारी संचालक |
| | श्री. एम.आर.मोरे (प्रतिनियुक्ती) | २२/०६/२०१६ ते १२/०८/२०१६ | |
| | डॉ.के.झेड. तोष्णीवाल (अतिरिक्त पदभार) | १२/०८/२०१६ पासून | |
| २. | श्री. मिलिंद आकरे | -- | सरव्यवस्थापक |
| ३. | डॉ. प्रशांत सोनवणे, उपसरव्यवस्थापक | -- | बाजार समिती/बीडीपी / प्रशासन |
| ४. | श्री.ओ.व्ही.निला, उपसरव्यवस्थापक | ०८/११/२०१६ पर्यंत | अभियांत्रिकी |
| | श्री.डी.डी.देशमुख, सहाय्यक सरव्यवस्थापक (उपसरव्यवस्थापक अतिरिक्त पदभार) | ०८/११/२०१६ पासून | |
| ५. | श्री. जितेंद्र व्ही. कोळंबे, उपसरव्यवस्थापक | -- | वित्त व लेखा |
| ६. | डॉ. बी. एन. पाटील, सहाय्यक सरव्यवस्थापक, | -- | कृषि व्यापार विकास व जनसंपर्क व प्रसिध्दी |
| ७. | श्री.एम.एल.लोखंडे, सहाय्यक सरव्यवस्थापक | -- | संगणक |
| ८. | श्री.डी.एम.साबळे, सहाय्यक सरव्यवस्थापक | -- | निर्यात सेल / व्ही. एच. टी. वाशी |
| ९. | श्री.एम.पी.पवार, सहाय्यक सरव्यवस्थापक | -- | बीडीपी/प्रकल्प |
| १०. | श्री. पी. डी. टेकाळे, सहा. व्यवस्थापक (प्र) | ३१/०८/२०१६ पर्यंत | प्रशासन |
| | श्री. डी.एस पाटील, व्यवस्थापक | ०१/०९/२०१६ पासून | |
| ११. | श्रीमती एस.ए.तांभाळे, विधी अधिकारी व्यवस्थापक, | -- | विधी अधिकारी जनसंपर्क व प्रसिध्दी |
| १२. | श्री.जयंत कोकणे, व्यवस्थापक, | -- | वित्त व लेखा |
| १३. | श्री.एस.पी.बाजारे, व्यवस्थापक | -- | रा.कृ.वि.यो.- अभियांत्रिकी |
| १४. | श्री.बी.जी.कातोरे, व्यवस्थापक | -- | बाजार समिती |
| १५. | श्री.ए.ए.औताडे, व्यवस्थापक | -- | शेतमाल तारण योजना(बा.स.) |
| १६. | श्री. के.एस. फटांगरे , व्यवस्थापक | -- | संगणक ( हार्डवेअर ) |
| १७. | श्री.व्ही.व्ही.जगदाळे, व्यवस्थापक | -- | संगणक ( डेटाबेस ) |
| १८. | श्री.एस.डी.मेहेरकर, व्यवस्थापक (प्र) | -- | शेती (तळेगाव) |

## विभागीय उपसरव्यवस्थापक/ विभागीय सहायक सरव्यवस्थापक / विभागीय व्यवस्थापक /जिल्हा पणन अधिकारी

| क्र. | विभाग प्रमुखाचे नाव व पदनाम | कालावधी | विभाग |
|---|---|---|---|
| १. | डॉ. अशोक एस गार्डी, उपसरव्यवस्थापक | -- | पुणे |
| २. | श्री.सी.एम.बारी, उपसरव्यवस्थापक | दि. १५/०६/२०१६ पर्यंत | नाशिक |
| | श्री.डी.डी.आहेर, उपसरव्यवस्थापक | दि. १५/०६/२०१६ पासून | |
| ३. | कु. शुभांगी सं. गोंड, उपसरव्यवस्थापक | -- | लातूर |
| ४. | श्री.एम. यु. राठोड, उपसरव्यवस्थापक | दि. ०६/०६/२०१६ पर्यंत | अमरावती |
| | श्री.ए.जे.विरकर, व्यवस्थापक (उपसरव्यवस्थापक अतिरिक्त पदभार) | दि.०६/०६/२०१६ ते दि. १४/०६/२०१६ | |
| | श्री.डी.एम.डागा, व्यवस्थापक(उपसरव्यवस्थापक अतिरिक्त पदभार) | दि. १४/०६/२०१६ ते दि. २५/११/२०१६ | |
| | श्री.एल.बी.मुंदडा, उपसरव्यवस्थापक | दि. २५/११/२०१६ पासून | |
| ५. | श्री. सचिन भिमराव घोडके, उपसरव्यवस्थापक | -- | नागपूर |
| ६. | श्री. एम. एन. साळुंके पाटील, उपसरव्यवस्थापक | -- | औरंगाबाद |
| ७. | श्रीमती पर्णिता बुरांडे, उपसरव्यवस्थापक | दि. ०४/०६/२०१६ पर्यंत | रत्नागिरी |
| | श्री.एम.जी.जोशी, सहाय्यक सरव्यवस्थापक (उपसरव्यवस्थापक अतिरीक्त पदभार) | दि. ०४/०६/२०१६ ते दि. २३/०६/२०१६ | |
| | श्री. एम.के.अहिरे, उपसरव्यवस्थापक | दि. २३/०६/२०१६ पासून | |
| ८. | श्री. संपत टी. गुंजाळ , उपसरव्यवस्थापक | दि.१४/०१/२०१६ ते दि. ०४/०८/२०१६ | कोल्हापूर |
| | श्री.एस.एस.घुले, सहाय्यक सरव्यवस्थापक (उपसरव्यवस्थापक अतिरिक्त पदभार) | दि. ०४/०८/२०१६ ते दि. ०२/०९/२०१६ | |
| | श्री.ए.जे.पवार, व्यवस्थापक, (उपसरव्यवस्थापक अतिरिक्त पदभार) | दि. ०२/०९/२०१६ पासून | |
| ९. | श्री. सुरेंद्र एम. तांबे, उपसरव्यवस्थापक ( प्रशासकीय अधिकारी) | -- | पदव्युत्तर कृषि व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालय, तळेगाव दाभाडे |

# ४. वित्तीय स्थिती

## उत्पन्नाची साधने -

महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ मधील कलम क्र. ३९ (ल) नुसार महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाच्या उत्पन्नाची साधने ही कृषि उत्पन्न बाजार समित्यांकडून जमा होणारे वार्षिक अंशदान, कर्जावरील व्याज, गुंतवणूकीवरील व्याज, निर्यात सुविधा केंद्रे व इतर उत्पन्न ही आहेत.

सदरच्या प्राप्त होणाऱ्या निधीमधून कृषि पणन मंडळाच्या आस्थापना तसेच प्रशासकीय खर्च व इतर विकासात्मक कामांबाबतचा खर्च भागवून उर्वरीत रक्कम बाजार समित्यांना विकासात्मक कामांसाठी निधी म्हणून देण्याची तरतूद वरील कायदा कलम ३९ (ल)(३) मध्ये नमुद केली आहे. त्यानुसार दिनांक ३१.०३.२०१७ अखेर कृषि पणन मंडळास प्राप्त झालेले उत्पन्न व त्याचा विनियोग याबाबतची माहिती खालीलप्रमाणे;

### ताळेबंद – २०१६-२०१७

(रु. कोटीत)

| अ.क्र | देयता | रक्कम रु. | संपत्ती | रक्कम रु. |
|---|---|---|---|---|
| १ | मार्केटिंग फंड | ३८८.१७ | स्थावर मालमत्ता | १४३.३४ |
| २ | बँक ओव्हरड्राफ्ट | ० | गुंतवणूक | २३३.५६ |
| ३ | चालु देयता | २२.१६ | बँकेतील शिल्लक | १९.१७ |
| ४ | अनुदान (अपेडा व इतर ) | ४७.७७ | अखेरच्या मालाचा साठा | ०.०२ |
| ५ | मार्केटिंग एक्सटेन्शन फंड | ७.३३ | कर्ज व अग्रिम | १२.७५ |
| ६ | कांदा निर्यात डेव्हलपमेंट एक्सटेंशन फंड | ४८.४७ | आयकर | ०.४८ |
| ७ | आर.वाय.व्ही.के. अनुदान | १.५५ | चालु देयता | १३४.२८ |
| ८ | तरतूद | २८.१५ | | |
| | **एकूण** | **५४३.६०** | **एकूण** | **५४३.६०** |

### उत्पन्न व खर्च – २०१६-२०१७

(रु. कोटीत)

| अ.क्र. | खर्च | रक्कम रु. | उत्पन्न | रक्कम रु. |
|---|---|---|---|---|
| १ | आस्थापना खर्च | १२.७८ | बाजार समिती कर्जावरील व्याज | ३.२६ |
| २ | प्रशासकीय खर्च | ४.७२ | गुंतवणुकीवरील व्याज | ११.८४ |
| ३ | निर्यातवृध्दी | ०.०३ | प्रकल्प सल्ला विभाग | ०.०१ |
| ४ | विकास व प्रकल्प | २.८२ | निर्यात सुविधा केंद्रे उत्पन्न | २.३१ |
| ५ | घसारा | ६.१३ | कृषि पणन मित्र वर्गणी | ०.१८ |
| ६ | तरतूद | ० | इतर उत्पन्न | ३.४० |
| | | | तुट | ५.४८ |
| | **एकूण** | **२६.४८** | **एकूण** | **२६.४८** |

मंडळाचे अतिरिक्त निधी शासकीय व शेड्युल्ड बँकेमध्ये केलेल्या गुंतवणुकीमुळे गुंतवणुकीवरील व्याजाचे उत्पन्न सरासरी ६.५० टक्के दराने मिळाले असून अहवाल वर्षातील भांडवली बाजारातील व्याजदर ५.५० टक्के ते ७.७५ टक्के विचारात घेता मिळालेले उत्पन्न निश्चित चांगले आहे.

**लेखे तपासणी —**
पणन मंडळाचे वैधानिक लेखा परिक्षण मार्च २०१३-२०१४ अखेर व अंतर्गत लेखापरिक्षण व कर लेखा परिक्षण मार्च २०१६ अखेर पूर्ण करण्यात आले आहे.

## सन २०१७-२०१८ अर्थसंकल्प - उत्पन्न

(रु.कोटीत)

| अ.क्र. | तपशील | रक्कम रु. | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | अंशदान | ३५.०० | ३३.७८ |
| २ | कर्ज वसुली | ३०.०० | २८.९५ |
| ३ | कर्जावरील व्याज (व इतर .स.बा) | ५.०० | ४.८३ |
| ४ | गुंतवणुकीवरील व्याज | १३.०० | १२.५५ |
| ५ | मुदत ठेवीवरील कर्ज | १०.०० | ९.६५ |
| ६ | निर्यात सुविधा केंद्र उत्पन्न | ३.५० | ३.३८ |
| ७ | अनुदान .वाय.व्ही.के.आर), अपेडा व इतर ( | १.५० | १.४५ |
| ८ | इतर उत्पन्न | ५.६२ | ५.४२ |
| | **एकूण** | **१०३.६२** | **१००.००** |

## सन २०१७-२०१८ अर्थसंकल्प — विनियोग

(रु. कोटीत)

| अ.क्र. | तपशील | रुपये | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | बाजारसमिती कर्ज वाटप व अनुदान वाटप | ४६.०० | ३१.०० |
| २ | आस्थापना, प्रशासकीय व इतर खर्च | २५.५९ | १७.२४ |
| ३ | मुदत ठेवींवरील कर्ज, घर बांधणी अग्रिम व इतर अग्रिम | ११.७० | ७.८८ |
| ४ | भांडवली खर्च (मुख्यालय), निर्यात सुविधा केंद्रे व इतर | ६२.७६ | ४२.२९ |
| ५ | निर्यात प्रमोशन व विकास व प्रकल्प | २.३५ | १.५८ |
| | **एकूण** | **१४८.४०** | **१००.००** |

## सन २०१७-२०१८ अर्थसंकल्प – उत्पन्न




## सन २०१७-२०१८ अर्थसंकल्प – विनियोग



# ५. इतर विभाग

## अ ) बाजार समिती विभाग

दि. ३१/३/२०१७ अखेर राज्यात एकुण ३०६ बाजार समित्या व ५९८ उपबाजार कार्यरत आहेत. बाजार समित्या राज्यातील सर्व जिल्ह्यामध्ये कार्यरत आहेत. राज्यातील कार्यरत असणाऱ्या बाजार समित्यांची विभागनिहाय संख्या खालीलप्रमाणे आहे ;

| अ. क्र. | विभाग | मुख्य बाजार | उपबाजार |
|---|---|---|---|
| १) | रत्नागिरी | २० | ४१ |
| २) | नाशिक | ५३ | ११७ |
| ३) | पुणे | २३ | ६७ |
| ४) | औरंगाबाद | ३६ | ६५ |
| ५) | लातूर | ४९ | ८० |
| ६) | अमरावती | ५५ | ९१ |
| ७) | नागपूर | ४९ | ७७ |
| ८) | कोल्हापूर | २१ | ६० |
| | **एकूण** | **३०६** | **५९८** |

**१) अंशदान :**

महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ चे कलम ३७ (२) अन्वये अहवाल वर्षात महाराष्ट्रातील एकूण ३०० कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या सन २०१५-२०१६ या आर्थिक वर्षाच्या एकूण उत्पन्नावर अंशदान आकारणी करण्यात आली.

| दि. ३१/०३/२०१५ अखेर थकीत रु. | सन २०१५-१६ ची अंशदान मागणी रु. | एकूण वसूलपात्र रक्कम रु. | वसूल रक्कम रु. | येणेबाकी रु. |
|---|---|---|---|---|
| ९४०.१३ | ३४९९.७७ | ४४३९.९० | ३३७७.८८ | १०६२.०२ |

**२) कर्ज :**

**विकासात्मक कर्ज :**

कृषि पणन मंडळमार्फत बाजार समित्यांना त्यांचे मुख्य व दुय्यम बाजार आवारातील विविध विकास कामे करण्यासाठी अंतरिम व दिर्घ मुदतीची कर्जे (अर्थसहाय्य) मंजूर केली जातात. यामध्ये प्रामुख्याने जमीन खरेदी, जमीन संपादन, अंतर्गत रस्ते, रस्त्यांचे डांबरीकरण, पिण्याच्या पाण्याची सोय, लिलाव ओटे, लिलाव ओट्यावर आवश्यकतेप्रमाणे शेड उभारणे, लिलावगृह, कंपाऊंड वॉल, गेट व वॉचमन केबिन, स्वच्छतागृह, विद्युतीकरण, आडत व्यापारी गाळे, शेतकरी बाजार, कांदा चाळ बांधकाम तसेच कमर्शियल शॉपिंग कॉम्प्लेक्स (व्यापारी गाळे) इ. बांधकामांचा समावेश होतो.

अहवाल वर्षात एकूण 12 कृषि उत्पन्न बाजार समित्यांना विविध विकासात्मक कामे करण्यासाठी एकूण रक्कम रु.9,56,72,764/- इतके कर्ज वितरित करण्यात आलेले आहे.

**तिमाही कर्ज -**

| अ. क्र. | बाजार समितीचे नाव | दिनांक | कर्ज रक्कम रु. | कर्जाचे कारण |
|---|---|---|---|---|
| १ | पाटोदा, जि.बीड | १६/०४/२०१६ | ११००१७५६ | (५ वा हप्ता) मुख्य व उपबाजार आवारात विकास कामे. |
| २ | तळोदा, जि.नंदुरबार | १६/०५/२०१६ | १०००००० | धान्य चाळणी यंत्र. |
| ३ | इंदापूर, जि. पुणे. | ०७/०६/२०१६ | १०००००० | व्यापारी गाळे बांधकाम. |
| ४ | चांदुररेल्वे, जि.अमरावती | ०९/०६/२०१६ | ३५००००० | (१ ला हप्ता) विकास कामे. |
| ५ | श्रीगोंदा, जि.अहमदनगर | २०/०६/२०१६ | ४०३३३२१ | (१ ला हप्ता) एम.ए.सी.पी. योजनेअंतर्गत विकास कामे. |
| ६ | पाटोदा, जि.बीड | ३१/०८/२०१६ | १४२०५६८६ | (६ वा व अंतिम हप्ता) मुख्य बाजार पाटोदा व उपबाजार शिरुर येथे विकास कामे. |
| ७ | साक्री, जि.धुळे | २७/०९/२०१६ | १२११९११४ | (१ ला व अंतिम हप्ता) एम.ए.सी.पी. योजनेअंतर्गत विकास कामे. |
| ८ | पारनेर, जि.अहमदनगर | १७/१०/२०१६ | २७५९०७६ | (अंतिम हप्ता) एम.ए.सी.पी. योजनेअंतर्गत विकास कामे. |
| ९ | पुसद, जि.यवतमाळ | ०५/११/२०१६ | २८५०९०६ | (१ ला हप्ता) एम.ए.सी.पी. योजनेअंतर्गत विकास कामे. |
| १० | जिंतुर, जि.परभणी | ३०/१२/२०१६ | ७६२९७०८ | (१ ला हप्ता) एम.ए.सी.पी. योजनेअंतर्गत विकास कामे. |
| ११ | इस्लामपूर, जि.सांगली | ०२/०३/२०१७ | ३४८११९३ | (१ ला हप्ता) एम.ए.सी.पी. योजनेअंतर्गत विकास कामे. |
| १२ | दिंडोरी, जि.नाशिक | १८/०३/२०१७ | १२६८३२२३ | (१ ला हप्ता) एम.ए.सी.पी. योजनेअंतर्गत विकास कामे. |
| १३ | चोपडा, जि.जळगांव | १८/०३/२०१७ | १०४०८७८१ | (१ ला हप्ता) एम.ए.सी.पी. योजनेअंतर्गत विकास कामे. |
| | **एकुण वाटप** | | **९५६७२७६४** | |

**कर्ज व्याजदर** - राज्यातील बाजार समित्यांचे सर्व प्रकारचे दिर्घ व अल्प मुदती कर्जाचे व्याजदर 8 व 10 टक्के वरुन कमी करुन सर्व बाजार समित्यांसाठी एकसमान म्हणजेच 6 टक्के इतके दि.12/02/2016 पासून अदा करण्यात येणाऱ्या नविन कर्जासाठी तसेच यापूर्वी मंजुर झालेल्या परंतू दि.12/02/2016 नंतर अदा करण्यात येणाऱ्या कर्ज हप्त्यास लागू करण्यात आलेले असून दि.9/3/2016 चे परिपत्रकान्वये सर्व बाजार समित्यांना कळविण्यात आले आहे.

## 3) अर्थसंकल्प मंजुरी -

महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम 1963 यातील कलम 38 आणि त्याखालील नियमातील संबंधित नियमान्वये अहवाल वर्षात 303 बाजार समित्यांचे मूळ अर्थसंकल्पांना मंजुरी देण्यात आली. त्याचप्रमाणे 158 बाजार समित्यांचे पुरवणी अर्थसंकल्प मंजुर करण्यात आले. तसेच सन 2015-16 चे 83 बाजार समित्यांचे पुर्नविनियोजन पत्रके मंजूर / नामंजुर करण्यात आली.

**4) थेट पणन अंतर्गत राज्यातील बाजार समित्यांच्या कार्यक्षेत्रातील खरेदीवरील बाजार फी बाबत -**

थेट पणन अंतर्गत राज्यात एकुण ५२७ कंपन्यांना पणन संचालनालयापार्फत परवाना देण्यात आलेला आहे.थेट पणन परवाना प्राप्त धारकांना कृषि पणन मंडळाकडे बाजार फी व देखरेख फी भरावी लागते.

सदरील कंपन्यांनी दि.१/१/२०१६ ते दि.३१/३/२०१७ अखेर कृषि उत्पन्न बाजार समित्यांचे कार्यक्षेत्रात खरेदी केलेल्या शेतीमालावरील बाजार फी व देखरेख फी कृषि पणन मंडळाकडे जमा केली आहे. ८१ अनुज्ञप्ती धारक कंपन्यांना खरेदी केलेल्या एकुण शेतीमालाची देय होणारी एकुण बाजार फी व देखरेख फी रु.३,००,१०,६५४.४६/- इतकी आहे.

# ब) निर्यात विभाग

राज्यातील कृषि मालाची निर्यात वाढावी व त्यासाठी निर्यातक्षम उत्पादनात वाढ होणेकरीता विविध कार्यशाळेच्या माध्यमातुन शेतक-यांना मार्गदर्शन करण्यात आले आहे त्यासाठी कृषि मालाची प्रतवारी, पॅकींग, हाताळणी, साठवणूक इ.साठी आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध करणे, प्रशितकरण आणि शितगृहांची उभारणी करणे, शेतकरी, बाजार समित्या आणि फळे भाजीपाला उत्पादक सहकारी संस्था यांना केंद्र आणि राज्य शासनाच्या विविध योजनांमधून जास्तीत जास्त अनुदान/आर्थिक सहाय्य उपलब्ध करून निर्यातीला चालना देण्याच्या दृष्टीने कृषि पणन मंडळ प्रयत्नशिल आहे.

**निर्यात वृध्दीकरीता पायाभूत सुविधांची उभारणी -**

राज्यामध्ये उत्पादीत होणा-या विविध कृषि उत्पादनांच्या निर्यातवृध्दीच्या दृष्टीने केंद्र व राज्य शासनामार्फत राज्यामध्ये हापूस आंबा, केशर आंबा, कांदा, संत्रा, केळी, डाळिंब व फुले या उत्पादनांकरिता कृषि निर्यात क्षेत्रांची स्थापना करण्यात आलेली आहे. हापूस आंबा, केशर आंबा, कांदा, संत्रा, केळी, डाळिंब या कृषि निर्यात क्षेत्रांच्या अंमलबजावणीसाठी कृषि पणन मंडळाची नोडल एजन्सी म्हणून नियुक्ती करण्यात आलेली होती. नोडल एजन्सी या नात्याने कृषि पणन मंडळामार्फत विविध कृषि उत्पादनांच्या निर्यातीसाठी राज्यात खालीलप्रमाणे पायाभूत सुविधांची उभारणी करण्यात आलेली आहे.

| अ.क्र. | सुविधा | संख्या | एकुण प्रशितकरण संख्या | प्रशितकरण क्षमता मे.टन | शीतगृह संख्या व | शीतगृह क्षमता मे.टन | रायपनिंग चेंबर मे.टन | रायपनिंग चेंबर क्षमता मे.टन |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | निर्यात सुविधा केंद्र | २२ | २० | १०० | ३५ | १११९ | १२ | २११ |
| २. | आधुनिक फळे व भाजीपाला सुविधा केंद्र | २० | २० | १०० | २० | ५०० | ०० | ०० |
| ३. | फुले निर्यात सुविधा केंद्र | ३ | ६ | ३० | १२ | ३०० | ०० | ०० |
| **एकुण** | | **४५** | **४६** | **२३०** | **६७** | **१९१९** | **१२** | **२११** |

महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाने अपेडा व राष्ट्रीय कृषि विकास योजनेच्या अर्थसहाय्याने राज्यात निर्यात सुविधा केंद्र (२२), आधुनिक फळे व भाजीपाला निर्यात सुविधा केंद्र (२०) व फुले निर्यात सुविधा केंद्र (३) एकूण ४५ निर्यात सुविधा केंद्रांची उभारणी केलेली आहे. ज्यामुळे शीतगृह क्षमता १९१९ मेटन, प्रशितकरण २३० मे.टन व रायपनींग चेंबर २११ मे.टन इतकी क्षमता निर्माण झाली. सदर सुविधा केंद्रावरुन सुमारे ६०००० मे.टना पेक्षा जास्त कृषिमालाची निर्यात करण्यात आलेली आहे. तर फुले निर्यात सुविधा केंद्र, तळेगाव दाभाडे जि. पुणे येथून ४८.८६ लाख गुलाब फुलांचे स्टेम्स इंग्लंडसह इतर देशांना निर्यात करणेत आली आहे.

## विभागनिहाय निर्यात सुविधा केंद्रांचा तपशील -

| विभागाचे नाव | क्रमांक | सुविधा केंद्राचे नांव | ठिकाण | प्रकल्पातील समाविष्ठ घटक | | प्रक्रिया मे.टन |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | घटक | क्षमता | |
| पुणे | १ | शेतमाल निर्यात सुविधा केंद्र, इंदापूर | शिवलीलानगर, इंदापुर – अकलुज रोड इंदापुर, जि.पुणे | हाताळणी यंत्रणा | १० मे. टन / तास | ---- |
| | | | | कांदा साठवणूक सुविधा | ५०० मे. टन | |
| | | | | निर्यातदार गाळे - ३६० स्के.मी. | | |
| | | | | प्रशासकीय इमारत - २३३ स्के.मी. | | |
| | २ | A) कोल्ड स्टोरेज युनिट, इंदापुर, जि. पुणे. | शिवलीलानगर, इंदापुर – अकलुज रोड इंदापुर, जि.पुणे | कोल्ड स्टोरेज | ३ x ४० मे. टन | |
| | | | | प्रिकुलिंग | ५ मे. टन/बॅच | --- |
| | | | | ट्रान्सफॉर्मर | १६० KVA | |
| | | | | डी.जी. सेट | १०० KVA | |
| | | B) आईस मेकींग युनीट | | आईस स्टोरेज | ४० मे. टन | |
| | | | | आईस टँक | ५ मे. टन /दिवस | |
| | ३ | केळी निर्यात सुविधा केंद्र इंदापूर | कृषि उत्पन्न बाजार समिती, इंदापुर, मुख्य बाजार, इंदापुर-अकलुज रोड, शिवलिला मार्केट, ता. इंदापुर, जि. पुणे. | प्रिकुलिंग | ५ मे. टन / बॅच | -- |
| | | | | कोल्ड स्टोरेज | २५ मे.टन | |
| | | | | रायपनिंग चेंबर | ४ x २५ मे. टन | |
| | | | | दोन पॅकहाऊस (वालचंदनगर व अकलुज) | ४८८५ स्क्वे. फुट प्रत्येकी | |
| | | | | डि.जी. सेट | १७५ KVA | |
| | ४ | द्राक्षे व डांळिब निर्यात सुविधा केंद्र,बारामती | जळोची, ता बारामती जि.पुणे, | प्रिकुलिंग | ५ मे. टन / बॅच | ३६० डाळींब |
| | | | | कोल्ड स्टोरेज | २ x २५ मे. टन | |
| | | | | पॅक हाऊस | ४०३५ स्क्वे. फुट | |
| | | | | हाताळणी यंत्रणा | १.५ मे. टन / तास | |
| | | | | डी.जी. सेट | १२५ KVA | |
| | ५ | फुले निर्यात सुविधा केंद्र तळेगांव (दा) ता.मावळ जि.पुणे | महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळ, (फ्लोरीकल्चर पार्क) जोग सेंटर - मुंबई - पुणे रोड, वाकडेवाडी एमआयडीसी, तळेगाव,जि.पुणे | प्रिकुलिंग | २ x ५ मे.टन / बॅच | ४८.८६ लाख गुलाब स्टेम्स |
| | | | | कोल्ड स्टोरेज | ४ x २५ मे.टन | |
| | | | | पॅकहाऊस | ६००४ चौ.फुट | |
| | | | | डि.जी. सेट | २०० KVA | |
| | | | | ट्रान्स फॉर्मर | २०० KVA | |

| विभागाचे नाव | क्रमांक | सुविधा केंद्राचे नांव | ठिकाण | प्रकल्पातील समाविष्ठ घटक | | प्रक्रिया मे.टन |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | घटक | क्षमता | |
| | ६ | निर्यात सुविधा केंद्र, तळेगाव | हॉर्टीकल्चर ट्रेनिंग सेंटर, तळेगाव दाभाडे, ता. मावळ, जि.पुणे. | प्रिकुलिंग | ५ मे. टन. / बॅच | |
| | | | | कोल्ड स्टोरेज | ५० मे. टन | |
| | | | | पॅक हाउस | ८०० स्क्वे. फुट | |
| **कोल्हापूर** | ७ | A) डाळींब व द्राक्ष निर्यात सुविधा केंद्र आटपाडी | कृषि उत्पन्न बाजार समिती, आटपाडी, ता. आटपाडी, जि. सांगली. | प्रिकुलिंग | ५ मे. टन / बॅच | ------- |
| | | | | कोल्ड स्टोरेज | २ x २५ मे.टन | |
| | | | | पॅकहाऊस | २००० स्क्वे. फुट | |
| | | | | डि.जी. सेट | २०० KVA | |
| | | | | ट्रान्सफॉर्मर | २०० KVA | |
| | ८ | फुले निर्यात सुविधा केंद्र-सातारा, जि. सातारा | अजिंक्यतारा शेतकरी सहकारी फळे, फुले व भाजीपाला खरेदी विक्री संस्था मर्या. ता. सातारा,जि.सातारा | प्रिकुलिंग | २ x ५ मे.टन / बॅच | --- |
| | | | | कोल्ड स्टोरेज | ४ x २५ मे.टन | |
| | | | | डि.जी. सेट | २०० KVA | |
| | | | | ट्रान्सफॉर्मर | ३१५ KVA | |
| **रत्नागीरी** | ९ | हापुस आंबा निर्यात सुविधा केंद्र, नाचणे | शांतीनगर, नाचणे रोड, ता. जि. रत्नागीरी | प्रिकुलिंग | ५ मे. टन. / बॅच | ----- |
| | | | | कोल्ड स्टोरेज | २५ मे.टन | |
| | | | | रायपनिंग चेंबर | ५ मे.टन | |
| | | | | पॅकहाऊस | ६००० स्क्वे. फुट | |
| | | | | हाताळणी यंत्रणा | १.५ मे.टन / तास | |
| | | | | प्लॅस्टिक क्रेट्स | ८०० नग | |
| | | | | डी.जी. सेट | १०० KVA | |
| | | | | ट्रान्सफॉर्मर | १६० KVA | |
| | १० | हापुस आंबा निर्यात सुविधा केंद्र, जामसंडे | जामसंडे, ता देवगड, जि. सिंधुदुर्ग | प्रिकुलिंग | ५ मे. टन. / बॅच | ----- |
| | | | | कोल्ड स्टोरेज | २५ मे.टन | |
| | | | | रायपनिंग चेंबर | ५ मे.टन | |
| | | | | पॅकहाऊस | ६००० स्क्वे. फुट | |
| | | | | हाताळणी यंत्रणा | १.५ मे.टन / तास | |
| | | | | प्लॅस्टिक क्रेट्स | ९०० नग | |
| | | | | डी.जी. सेट | १०० KVA | |
| | | | | ट्रान्सफॉर्मर | १६० KVA | |
| | ११ | विकीरण सुविधा केंद्र वाशी | सेक्टर १९, दाना बंदर गेट नं- २ समोर, वाशी, नवी मुंबई. | रॅडिएशन सोर्स | कोबाल्ट ६० | १९१.३(१.३ मे.टन डाळींब उर्वरीत आंबा) |
| | | | | सोर्स तिव्रता | ५०० कि.क्युरी | |
| | | | | रॅडिएशन युनिट (आंबा) | ५ मे. टन / तास | |
| | | | | कोल्ड स्टोरेज | ७६ मे.टन | |

| विभागाचे नाव | क्रमांक | सुविधा केंद्राचे नांव | ठिकाण | प्रकल्पातील समाविष्ठ घटक | | प्रक्रिया मे.टन |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | घटक | क्षमता | |
| | | | | डि.जी.सेट | ५०० KVA | |
| | | | | ट्रान्सरफॉर्मर | ५०० KVA | |
| | १२ | भाजीपाला प्रक्रिया केंद्र | सेक्टर १९, दाना बंदर गेट नं- २ समोर, वाशी, नवी मुंबई. | प्रिकुलिंग | ५ मे.टन / तास | १२८५ भाजीपाला |
| | | | | कोल्ड स्टोरेज | ९८ मे.टन | |
| | १३ | निर्यात सुविधा केंद्र वाशी, नवी मुंबई (व्ही.एच.टी. ) | निर्यात भवन, मुंबई कृषी उत्पन्न बाजार समिती,भाजीपाला बाजार आवार, सेक्टर नं.२१,वाशी, मुंबई. | व्हि.एच.टी. मशिन | १.५ मे.टन / बॅच | ६६८ मे.टन (२१० मे.टन आंबा) |
| | | | | कोल्ड स्टोरेज | २ x ५० मे. टन | |
| | | | | पॅक हाऊस | ४००० स्के.फुट | |
| | | | | हाताळणी यंत्रणा | १ मे.टन / तास | |
| | | | | प्लॅस्टिक क्रेट्स | ४३२ नग | |
| | | | | अॅल्युमिनीअम पॅलेट | १२ नग | |
| | | | | डी.जी. सेट | १२५ KVA | |
| | | | | ट्रान्सफॉर्मर | ५०० KVA | |
| | १४ | आंबा पॅक हाऊस, गोरेगांव | महाराष्ट्र कृषि उद्योग विकास मंडळ, गोरेगांव यांचे फुले लिलाव केंद्र | प्रिकुलिंग | ५ मे.टन / बॅच | १४० मे.टन आंबा |
| | | | | रायपनिंग चेंबर | ११ मे.टन | |
| | | | | ग्रेडिंग लाईन | ३ मे.टन / तास | |
| | | | | ट्रान्सफॉर्मर | ३१५ KVA | |
| **नाशीक** | **१५** | कांदा, द्राक्ष व डाळिब निर्यात सुविधा केंद्र, कळवण | मु.पो.भेंडी, ता कळवण ,जि. नाशिक। | प्रिकुलिंग | ५ मे. टन. / बॅच | ----- |
| | | | | कोल्ड स्टोरेज | ५० मे. टन | |
| | | | | पॅक हाऊस | ४३५० स्के.मी. X २ | |
| | | | | हाताळणी यंत्रणा | २ मे.टन / तास | |
| | | | | कांदा साठवणूक | ८ x ५० मे.टन | |
| | | | | वे-ब्रिज | | |
| | | | | स्टाफ कॉर्टर | २ x १ BHK | |
| | | | | प्लॅस्टिक क्रेट्स | १००० नग | |
| | | | | डी.जी. सेट | १६० KVA | |
| | १६ | कांदा निर्यात सुविधा केंद्र चांदवड | कृषि उत्पन्न बाजार समिती, चांदवड मौजे. चांदवड, ता. चांदवड, जि. नाशिक | प्रिकुलिंग | ५ मे.टन / बॅच | १०८ मे.टन कांदा |
| | | | | कोल्ड स्टोरेज | ५० मे.टन | |
| | | | | पॅकहाऊस | ४७६५ क्स्वे. फुट | |
| | | | | डि.जी. सेट | १६० KVA | |
| | | | | ट्रान्सफॉर्मर | १६० KVA | |
| | | | | कांदा चाळ | ३५० मे.टन | |
| | | | | प्लॅस्टिक क्रेट्स | ५०० नग | |
| | १७ | फुले निर्यात सुविधा केंद्र मोहाडी | कृषि उत्पन्न बाजार समिती, दिंडोरी, उपबाजार आवार, | प्रिकुलिंग | ५ मे.टन / बॅच x २ | ४३५५ मे.टन द्राक्ष निर्यात |
| | | | | कोल्ड स्टोरेज | २०० मे.टन | |
| | | | | पॅकहाऊस | ६००४ चौ.फुट | |

| विभागाचे नाव | क्रमांक | सुविधा केंद्राचे नांव | ठिकाण | प्रकल्पातील समाविष्ठ घटक | | प्रक्रिया मे.टन |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | घटक | क्षमता | |
| | | ता.दिंडोरी जि.नाशिक | मोहाडी, गट नं- १२८६ ता. दिंडोरी,जि.नाशिक | डि.जी. सेट | २०० KVA | |
| | | | | ट्रान्स फॉर्मर | २०० KVA | |
| | १८ | केळी निर्यात सुविधा केंद्र, सावदा. | ता.रावेर, जि,जळगाव | प्रिकुलिंग | ५ मे. टन. / बॅच | ५४३७ केळी |
| | | | | कोल्ड स्टोरेज | २५ मे. टन. | |
| | | | | रायपनिंग चेंबर | २५ मे.टन / बॅच | |
| | | | | पॅकहाऊस | ५७०० स्क्वे. फुट | |
| | | | | हाताळणी यंत्रणा | २ मे.टन / तास | |
| | | | | प्लॅस्टिक पॅलेट्स | १५० नग | |
| | | | | वे-ब्रिज | ६० मे.टन | |
| | | | | स्टाफ कॉर्टर | २ x १ BHK | |
| | | | | डी.जी. सेट | १४० KVA | |
| | | | | ट्रान्सफॉर्मर | १६० KVA | |
| | १९ | फळे व भाजीपाला निर्यात सुविधा केंद्र खडकेवाके | मौजे- खडकेवाके, ता.रहाता, जि. अहमदनगर | प्रिकुलिंग | ५ मे.टन / बॅच | --- |
| | | | | कोल्ड स्टोरेज | १५० मे.टन | |
| | | | | पॅकहाऊस | ६९६४ स्क्वे.फुट | |
| | | | | हॅंडलिंग लाईन | २ मे.टन / तास | |
| | | | | डि.जी. सेट | २०० KVA | |
| | | | | ट्रान्सफॉर्मर | ३१५ KVA | |
| **औरंगाबाद** | २० | केशर आंबा निर्यात सुविधा केंद्र, जालना | कृषी उत्पन्न बाजार समिती जालना मार्केट यार्ड, जालना, जि.जालना | प्रिकुलिंग | ५ मे. टन. / बॅच | |
| | | | | कोल्ड स्टोरेज | ५० मे.टन | ९२.४२ आंबा |
| | | | | रायपनिंग चेंबर | ५ मे.टन / बॅच | |
| | | | | पॅकहाऊस | ६००० स्क्वे. फुट | |
| | | | | हाताळणी यंत्रणा | १.५ मे.टन / तास | |
| | | | | वॅक्सिंग युनिट | | |
| | | | | अग्निशमन व्यवस्था | | |
| | | | | प्लॅस्टिक पॅलेट्स | १५० नग | |
| | | | | प्लॅस्टिक क्रेट्स | ३७२ नग | |
| | | | | डी.जी. सेट | १४० KVA | |
| | | | | ट्रान्सफॉर्मर | १६० KVA | |
| **लातुर** | २१ | केशर आंबा निर्यात सुविधा केंद्र बीड | कृषि उत्पन्न बाजार समिती, बिड, ग्रामपंचायत बहीरवाडी, ता. बीड, जि. बीड. | प्रिकुलिंग | ५ मे. टन / बॅच | ------- |
| | | | | कोल्ड स्टोरेज | ५० मे.टन | |
| | | | | रायपनिंग चेंबर | १० मे.टन | |
| | | | | पॅक हाऊस | ३८७५ स्क्वे. फुट | |
| | | | | डि.जी. सेट | १६० KVA | |

| विभागाचे नाव | क्रमांक | सुविधा केंद्राचे नांव | ठिकाण | प्रकल्पातील समाविष्ठ घटक | | प्रक्रिया मे.टन |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | घटक | क्षमता | |
| | | | | ट्रान्सफॉर्मर | १६० KVA | |
| | २२ | केशर आंबा व डाळिंब निर्यात सुविधा केंद्र, लातुर. | एम.आय.डी.सी लातुर जि. लातुर | प्रिकुलिंग | ५ मे. टन. / बॅच | १०४३ सफरचंद, डाळींब ई. |
| | | | | कोल्ड स्टोरेज | १०० मे.टन | |
| | | | | पॅकहाऊस | ५७०० स्क्वे. फुट | |
| | | | | रायपनिंग चेंबर | २५ मे.टन / बॅच | |
| | | | | हाताळणी यंत्रणा | २ मे.टन / तास | |
| | | | | वे-ब्रिज | ६० मे.टन | |
| | | | | प्लॅस्टिक क्रेट्स | १००० नग | |
| | | | | स्टाफ कॉर्टर | २ x १ BHK | |
| | | | | डी.जी. सेट | २५० KVA | |
| | २३ | केळी निर्यात सुविधा केंद्र, वसमत. | ता.वसमत, जि. हिंगोली. | प्रिकुलिंग | ५ मे. टन. / बॅच | १५.७४ केळी रायपनिंग |
| | | | | कोल्ड स्टोरेज | २५ मे. टन. | |
| | | | | रायपनिंग चेंबर | २५ मे.टन/बॅच | |
| | | | | पॅकहाऊस | ५७०० स्क्वे. फुट | |
| | | | | हाताळणी यंत्रणा | २ मे.टन / तास | |
| | | | | प्लॅस्टिक पॅलेट्स | १५० नग | |
| | | | | वे-ब्रिज | ६० मे.टन | |
| **अमरावती** | २४ | संत्रा निर्यात सुविधा केंद्र वरुड | डॉ.पंजाबराव देशमुख कृषि शेती माल प्रक्रिया, पणन सहकारी संस्था मर्या. वरुड, जि. अमरावती | प्रिकुलिंग | ५ मे.टन / बॅच | ------ |
| | | | | कोल्ड स्टोरेज | २५ मे.टन | |
| | | | | ग्रेडिंग लाईन | २ मे.टन/ तास | |
| | | | | डि.जी. सेट | १६० KVA, | |
| | | | | | ३० KVA | |
| | | | | ट्रान्स फॉर्मर | १६० KVA | |
| | | | | वे-ब्रिज | ६० मे.टन | |
| | | | | स्टाफ कॉर्टर | २ x १ BHK | |
| **नागपुर** | २५ | संत्रा निर्यात सुविधा केंद्र, कारंजा (घा ). | ता.आष्टी, जि. वर्धा. | प्रिकुलिंग | ५ मे. टन. / बॅच | २५ मे.टन संत्रा श्रीलंकेला निर्यात |
| | | | | कोल्ड स्टोरेज | २५ मे. टन | |
| | | | | पॅकहाऊस | ३३०० स्क्वे. फुट | |
| | | | | हाताळणी यंत्रणा | २ मे.टन / तास | |
| | | | | वॅक्सिंग युनिट | | |
| | | | | प्लॅस्टिक क्रेट्स | ७००० नग | |
| | | | | वे-ब्रिज | ६० मे.टन | |

**फळे व भाजीपाल्याकरिता मॉडर्न मार्केटिंग सुविधा (२०)**

| विभागाचे नाव | आधुनिक फळे व भाजीपाला निर्यात सुविधा केंद्र | प्रकल्पातील समाविष्ठ घटक | प्रक्रीया तपशील मे.टन |
|---|---|---|---|
| **पुणे विभाग** | शेलपिंपळगाव, ता.खेड,जि.पुणे | ○ कोल्ड स्टोरेज २५मे.टन<br>○ प्रिकुलिंग ५मे.टन प्रति बॅच<br>○ अँन्टीचेंबर,प्लँटरूम, ऑफिस,स्टोअररूम<br>○ पॅकहाऊस एरिया - १५००स्क्वे.फूट<br>○ इलेक्ट्रिक व डी.जी.सेट<br>○ इनपुटशॉप-३<br>○ वॉटर सप्लाय<br>○ लॅबोरेटरी | १६५ |
| | बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर | | ३४ भाजीपाला (कोल्डस्टोरेज) |
| **कोल्हापुर** | मसूर, ता.कराड,जि.सातारा | | १०.६९ भाजीपाला |
| | म्हसवड, ता. माण, जि.सातारा | | ---------- |
| | तळसंदे ता. हातकणंगले, जि.कोल्हापूर | | ---------- |
| **रत्नागीरी** | पालघर, ता. पालघर जि.ठाणे | | |
| **नाशीक** | ठाणगाव, ता.सिन्नर, जि.नाशिक | | ---------- |
| | लोणी, ता.रहाता,जि.अ.नगर | | ---------- |
| | शिरपूर, ता. शिरपूर जि.धुळे | | ---------- |
| | पाडळसा , ता. यावल जि.जळगाव | | २८१ केळी. इ. फळे |
| **औरंगाबाद** | करमाड,ता. जि.औरंगाबाद | | ---------- |
| | घनसावंगी, ता. घनसावंगी, जि.जालना | | ---------- |
| | कळमनुरी, ता. कळमनुरी, जि.हिंगोली | | ---------- |
| | माजलगाव, ता. माजलगाव, जि.बीड | | ---------- |
| **अमरावती** | चांदूररेल्वे, ता. चादुंररेल्वे, जि.अमरावती | | ---------- |
| | चांदूररेल्वे, ता. चांदूररेल्वे, जि. अमरावती देऊळगांवराजा, ता. देऊळगांवराजा, जि.बुलढाणा | | |
| **लातुर** | अर्धापूर, ता. अर्धापूर, जि.नांदेड | | ९०० केळी |
| **नागपुर** | भिवापूर, ता. भिवापूर, जि.नागपूर | | ---------- |
| | मोहाडी, ता.मोहाडी, जि.भंडारा | | ---------- |
| | पुलगाव, ता.देवळी, जि.वर्धा | | ---------- |

**इतर कामकाज -**

- **व्ही. एच. टी. सुविधेवर कारल्याच्या चाचण्या -**

  युरोपीयन युनियनने दि .१ मे २०१४ रोजी आंबा व कारल्यासह इतर चार पिकांवर बंदी लावण्यात आलेली होती. युरोपियन देशांना कारल्याची निर्यात सुरू होण्याच्या अनुषंगाने NPPO, APEDA यांच्या सूचनेनुसार पणन मंडळाच्या व्ही. एच. टी. सुविधेवर आंब्याप्रमाणे कारल्याच्या चाचण्या घेण्यात आल्या होत्या. त्या यशस्वी झाल्या आहेत. युरोपीअन युनीअनने त्यांच्या १३ ऑक्टोबर, २०१६ च्या पत्रान्वये भारतातील आयातबंदी केलेला कारल्यासह भाजीपाला निर्यात जानेवारी २०१७ पासून खुली करण्यात आली आहे. व्हीएचटी द्वारे प्रक्रीया करुन कारले निर्यात करण्यासंदर्भात मान्यता दिली आहे. तसेच विकीरण सुविधेवर सुद्धा फळमाशीसाठी अशा रितीच्या चाचण्या घेण्याबाबत प्रस्तावित आहे. व्हेपर हीट ट्रिटमेंट सुविधा केंद्रावर उपलब्ध असणा-या प्रशीतीकरण (प्रि-कुलींग), शीतगृह, प्रतवारी यंत्रणा, आवेष्टनगृह (पॅकींग हाऊस) या सुविधांचा वापर करुन खाजगी निर्यातदार विविध देशांना फळे व भाजीपाला निर्यात करतात. युरोपीय देशांस कारले निर्यातीसाठी सदर सुविधा केंद्राचे प्रमाणिकरण झालेले असून खाजगी निर्यातदारांनी सुमारे १५८७ मे टन कारले निर्यात केले आहे.

- **व्ही.एच.टी. आंबा निर्यात –**

  सन २००६ पासून सन २०१५ पर्यंत व्ही.एच.टी. वाशी येथुन जपान,न्युझीलंड,युरोपियन देश येथे ५१७.७१ मे.टन आंबा निर्यात करण्यात आलेला होता. तर सन २०१६-१७ मध्ये २१०.६६ मे.टन आंबा युरोपियन देश व न्युझीलंड येथे निर्यात करण्यात आलेला असुन सदर सुविधेवरुन एकुण आंबा ७२८.३७ मे.टन निर्यात करण्यात आलेला आहे.

- **निर्यात सुविधा केंद्र गोरेगाव –**

  सदर सुविधा ही महाराष्ट्र कृषि विकास महामंडळ, मुंबई यांचेकडून फेब्रुवारी २०१४ मध्ये ३ वर्षासाठी ताब्यात घेण्यात आलेली होती. युरोपियन देशांस आंबा निर्यात करणेसाठी सन २०१५ मध्ये अपेडाच्या अर्थसहाय्याने सदर सुविधेवर उष्णजल प्रक्रीया प्रकल्प उभारण्यात आला होता. सदर सुविधेवरुन सन २०१५ मध्ये ३३१ मे. टन आंबा युरोपियन युनियन मधील देशांस निर्यात करण्यात आला तर सन २०१६ मध्ये १४० मे. टन आंबा युरोपियन युनियन येथे निर्यात करण्यात आला. अशा रितीने सदर सुविधेवरुन एकूण ४७१ मे. टन आंबा निर्यात करण्यात आलेला आहे.

- **विकिरण सुविधा केंद्र वाशी –**

  तब्बल १८ वर्षाच्या प्रतिक्षेनंतर सन २००६ मध्ये अमेरीकन बाजारपेठ भारतीय आंब्यासाठी खुली झाली होती. परंतु त्यासाठी प्राथमिक अट ही आंबा विकिरण प्रक्रीया करुन पाठवणे अशी होती. त्यासाठी पणन मंडळामार्फत बी.ए.आर.सी.च्या मालकीची कृषक विकिरण सुविधा वाहतुकीच्या दृष्टीने सोईस्कर नव्हती. त्यामुळे निर्यातदारांच्या मागणीनुसार व अपेडाच्या मार्गदर्शनाने कृषि पणन मंडळामार्फत मोठ्या क्षमतेच्या विकिरण सुविधेची उभारणी वाशी , नवि मुंबई येथे अपेडा व राष्ट्रीय कृषि विकास योजना यांच्या अर्थसहाय्याने तसेच स्वत:चा अतिरिक्त निधी वापरुन सुविधा उभारणेचे कामकाज पुर्ण झाले असुन AERB व DAE चे प्रमाणीकरण पुर्ण झाले आहे. तसेच सन २०१६ मध्ये सुविधेस यु.एस.डी.ए. यांची मान्यता प्राप्त झाली आहे. सदर सुविधेवरुन दि. १६ एप्रिल २०१६ रोजी अमेरीकन निरीक्षकांच्या उपस्थीतीत डाळींबाचे डोज मॅपींग करण्यात आले. सदर डोज मॅपींग यशस्विरित्या झाल्याने सदरच्या अहवालाच्या आधारे भारतातुन कृषि पणन मंडळाच्या विकिरण सुविधेवरुन दि. २९ एप्रील २०१६ पासुन अमेरीकन निरिक्षक यांचे नियंत्रणाखाली १९० मे.टन आंबा व १.३ मे.टन डाळींब विकिरण प्रक्रिया करण्यात येवुन अमेरीका येथे यशस्विरित्या निर्यात झालेली आहे. यामध्ये ७ निर्यातदारांनी सहभाग घेतला आहे. तसेच दि. २२ व २३ जुन २०१६ रोजी विकीरण प्रक्रिया करून केसर, तोतापुरी व दालिम्बिया आंब्याचे १३ मे. टनाचे कंटेनर दि. २४/०६/२०१६ रोजी भारतातून प्रथमच समुद्रमार्गे अमेरीका येथे निर्यात करण्यात आले आहे.

**भाजीपाला प्रक्रिया केंद्र, वाशी, नवी मुंबई :**

युरोपीय समुदायाने चार भाजीपाल्यावर केलेल्या आयातबंदीच्या अनुषंगाने अपेडा यांच्या मार्गदर्शन व अर्थसहाय्याने वाशी, नवी मुंबई येथे भाजीपाला प्रक्रिया केंद्राची उभारणी करण्यात आलेली आहे. सदर सुविधा चालवा-व-देखरेख तत्वावर देण्याकरिता संस्था निवडीसाठी विहीत पद्धतीने ई-टेंडर प्रक्रिया राबवून सुविधा वापराबाबत मे. खुशी इंटरनॅशनल, वाशी यांना सप्टेंबर २०१५ ते सप्टेंबर २०१८ पर्यंत कार्यादेश देण्यात आलेले आहेत. सदर सुविधा अपेडा यांचेमार्फत युरोप येथे निर्यातीकरिता प्रमाणित करण्यात आलेली आहे. सदर सुविधेवरुन सन २०१६-१७ मध्ये सुमारे २००० मे. टन निर्यात झाली आहे.

- **ट्रेसनेट (व्हेजनेट) प्रणाली अंतर्गत निर्यातक्षम भाजीपाला पिकांसाठी कामकाज:**

युरोपीयन देशामधे भारतातून निर्यात होणाऱ्या ४ भाजीपाल्यावर (भेंडी, कारले, शेवगा व दुधी भोपळा) किटकनाशकांचे अंश सापडल्यामुळे आयातबंदी करण्यात आलेली होती. त्यासाठी किड व रोगविरहीत मालाची निर्यात व्हावी यासाठी अपेडाच्या माध्यमातुन व्हेजनेट कार्यप्रणाली विकसीत करण्यात आली .या संदर्भातील निर्यातक्षम फळे व भाजीपाला पिकांवरील किड व रोगांच्या नियंत्रणासाठी नियुक्त् केलेल्या ट्रेसेबिलीटी सिस्टीम कमीटीची सभा दरमहा मा. आयुक्त् (कृषी) यांचे अध्यक्षतेखाली संपन्न् होते. यामध्ये कृषिमालाची निर्यातवृद्धी होण्याच्या अनुषंगाने सर्व संबंधित घटक जसे NPPO, अपेडा, कृषि विदयापीठ, कृषि विभाग, निर्यातदार, के.व्ही.के. इ. समावेश असुन सदर बैठकीत कृषिमालाची निर्यातवृद्धी होण्याच्या अनुषंगाने चर्चा, आढावा घेणेत येतो. पणन मंडळामार्फत पुणे, सोलापूर, नाशिक, उस्मानाबाद, लातुर, परभणी, बीड, जालना, जळगांव व सातारा येथे नोडल अधिकारी नियुक्त करण्यात आले आहेत. उपरोक्त बाबींमुळे किटकनाशक अंश विरहीत उत्पादन होत असुन त्यामधून युरोपीयन देशांना अशा रितीचा उत्पादित माल पाठविणे शक्य होत आहे. सदर प्रयत्नाचे फलीत म्हणुन युरोपीअन युनीयनने त्यांच्या १३ ऑक्टोबर, २०१६ च्या पत्रान्वये भारतातील आयातबंदी केलेला भाजीपाला जानेवारी २०१७ पासुन खुला केला आहे. अहवाल वर्षात महाराष्ट्र राज्यात मँगोनेट अंतर्गत ४४०५ बागांची नोंदणी करण्यात आली असून, अनारनेट अंतर्गत २१०० बागांची नोंदणी करण्यात आलेली आहे. तर व्हेजनेट (भेंडी) अंतर्गत राज्यात २०० बागांची नोंदणी करण्यात आलेली आहे.

- **निर्यातक्षम पिकांच्या कार्यशाळा :-**

१. दि. १५ ऑक्टोंबर २०१६ रोजी मा. मंत्री, सहकार, पणन व वस्त्रौद्योग यांचे अध्यक्षतेखाली सावित्रीबाई फुले विद्यापीठ, पुणे येथील आयुका सभागृहात शेतकरी उत्पादक कंपन्या व निर्यातदार यांच्यासाठी फळे व भाजीपाला याबाबत कार्यशाळेचे आयोजन करण्यात आलेले होते.

२. जानेवारी २०१६ मध्ये आंबा निर्यातदार यांची अपेडा व एन.पी.पी.ओ. यांच्या उपस्थितीत मुंबई येथे बैठकीचे आयोजन करण्यात आलेले होते.

३. कोकणातील आंबा उत्पादक शेतक-यांसाठी दि. १७.२.२०१७ रोजी रत्नागिरी येथे मँगोनेट व आंबा हंगाम, २०१७ च्या नियोजनासाठी सर्व संबंधित घटकांची कार्यशाळा घेण्यात आली होती.

४.डाळींबाचे आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील मागणी विचारात घेता, डाळींब निर्यात अडचणी व उपाययोजना बाबत सर्व संबंधित घटकांची कार्यशाळा मा.मंत्री , सहकार, पणन व वस्त्रोद्योग यांचे अध्यक्षतेखाली दि. ७ मार्च २०१७ सोलापूर येथे घेण्यात आलेली आहे.

- **राज्यातील प्रगतशील व इच्छूक शेतकरी, उद्योजक यांचेसाठी हॉर्टीकल्चर एक्सपोर्ट ट्रेनिंग कोर्सचे आयोजन –**

महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळामार्फत निर्यातपूरक उपक्रमांमधे वाढ करावी हा विचार करून महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळामार्फत "हॉर्टीकल्चर एक्सपोर्ट ट्रेनिंग कोर्स"आयोजनास माहे डिसेंबर २०१५ पासुन सुरूवात करण्यात आलेली आहे. हा कोर्स प्रमाणपत्र अभ्यासक्रम असून तो प्रत्येक महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात आयोजीत केला जातो. त्याचा कालावधी (५ दिवस) आहे. संबंधीत ट्रेनिंग चे प्रशिक्षण शुल्क प्रति व्यक्ती निवासी रु. ८६००/- अनिवासी रु. ७५००/- व महिलांसाठी प्रशिक्षण शुल्कात ४० % सवलत देण्यात आलेली आहे.

- प्रशिक्षणामधे पुढील विषयांवर मार्गदर्शन करण्यात येत आहे.
- ताजी फळे व भाजीपाला निर्यात संधी व पणन मंडळाचे कार्य
- निर्यात प्रक्रिया, परवाने, नोंदणी व वीमा

- इनव्हॉईस, पॅकींग लिस्ट, इ. कागदपत्रांची तोंडओळख
- उत्पादनांचा अभ्यास, एच. एस. कोड, आंतरराष्ट्रीय परिस्थिती
- क्वालीटी पॅरॅमिटर्स, फायटो सॅनिटरी, ॲगमार्क स्टॅंडर्स, ट्रेसनेट, MRL/PHI
- पॅकींग, पॅकेजींग, एअर व सी शिपींग, CHA यांच्या जबाबदाऱ्या
- कृषिमालाची वाहतुक व पुरवठा यंत्रणा (स्थानिक, आंतरदेशीय)
- टर्मिनॉलॉजीज, UCPDC ६००, बॅंकींग प्रक्रिया, पेमेंट रिस्क
- निर्यातदारांसाठी RKVY, APEDA, MEIS, शासनाच्या योजना
- निर्यातीसाठी प्रमाणपत्रे (GAP, Human Consumption etc.)
- सुविधा केंद्र गरज (IFC,VHT,HWIT,VPF,PC,CS,RC)
- फळ भाजीपाल्यावर विशेष प्रक्रिया पद्धती
- करार शेती व पणन कायद्यातील बदलामुळे पणन संधी

माहे एप्रील २०१६ ते मार्च २०१७ अखेर १२ प्रशिक्षण सत्रांमधे एकूण २७० प्रशिक्षणार्थींनी सहभाग घेतलेला आहे. सदर सहभागींकरीता वेळोवेळी आयातदार – निर्यातदार – शेतकरी समुह यांची सांगड घालणेकरीता बैठकांचे आयोजन करण्यात आले असुन, १० प्रशिक्षणार्थींनी कृषीमाल निर्यातीस प्रत्यक्ष सुरवात केली आहे.

- **ग्लोबलगॅप प्रमाणीकरण अनुदान योजना -**

युरोपियन देश, अमेरिका व जपान अशा प्रगत राष्ट्रांना राज्यातील शेतमालाची विशेष करुन फळांची निर्यात करण्यासाठी ग्लोबलगॅप प्रमाणपत्र असणे अत्यंत आवश्यक आहे. हापूस आंबा, केशर आंबा, डाळींब, केळी व संत्रा या फळपिकांच्या निर्यातीस चालना मिळण्याच्या दृष्टीने ग्लोबलगॅप प्रमाणिकरणासाठी शेतक-यांची संख्या वाढवणे गरजेचे आहे. आजअखेर २८९ शेतक-यांना ग्लोबलगॅप प्रमाणपत्र प्राप्त असून त्यासाठी प्रमाणिकरण योजनेचे माध्यमातून शुल्काच्या ५० टक्के रक्कम किंवा जास्तीत जास्त रु.७५००/- प्रति शेतकरी याप्रमाणे कृषि पणन मंडळाकडुन अनुदान अदा केलेले आहे. सन २०१६-१७ साठी हापूस आंबा, केशर आंबा, डाळींब, केळी व संत्रा या फळपिकांकरीता प्रोत्साहनपर ग्लोबलगॅप प्रमाणिकरण अनुदान योजना राबविणेत आलेली होती .सन १६-१७ या कालावधीत रत्नागीरी जिल्ह्यातील ३ शेतक-यांना अनुदान अदा करण्यात आलेले आहे.

# प्रकल्प विभाग

**१) प्रकल्प सल्ला सेवा :**

पणन मंडळाकडून राज्यातील बाजार समित्यांना व सहकारी संस्थांना गेल्या काही वर्षात प्रकल्प सल्ला पुरविण्यात आला. या उपक्रमास मिळालेला प्रतिसाद लक्षात घेवून सर्व सोयींनीयुक्त अशा प्रकल्प सल्ला विभागाची २३ जुलै २००३ रोजी स्थापना झाली.

या विभागामार्फत वेगवेगळ्या प्रकारच्या सेवा देण्यात येतात. सहकारी संस्था, बाजार समित्या, खाजगी उद्योग यांना सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करुन देणे. पणन संचालनालयाकडील प्राप्त प्रस्तावांवर अभिप्राय अहवाल देणे या सारख्या सेवा या अंतर्गत पुरविण्यात येतात. तसेच पणन मंडळामार्फत उभारण्यात येणा-या सुविधांचे प्रकल्प अहवाल अनुदानाकरिता तयार करुन रा.कृ.वि.योजना व अपेडा यांना सादर करण्यात येतात.

प्रकल्प सल्ला विभाग सद्यस्थितीत कृषि प्रक्रिया प्रकल्पांना सल्ला सेवा पुरवित आहे. अशा सर्व प्रकल्पाची एकूण अदांजित किंमत सुमारे रु.२४० कोटी आहे. अशा सर्व प्रकल्प अहवालांचे मुल्यांकन करुन प्रकल्पाद्वारे २०१६-२०१७ या आर्थिक वर्षात पणन मंडळास सुमारे रु.१.०० लाख सल्ला सेवा म्हणून प्राप्त झालेले आहेत. सन २०१६-२०१७ या आर्थिक वर्षात पणन मंडळामार्फत ५ अभिप्राय अहवाल तयार करुन देण्यात आले आहेत.

**२) राज्यातील नियोजित प्रकल्प :**

आर.के.व्ही.वाय. अंतर्गत खालीलप्रमाणे एकूण ५ प्रस्ताव सादर करण्यात आले.

१. कर्जत व जामखेड तालुक्याकरिता कांदा चाळ रु.२४६२.२५ लाख- ५०% अनुदानासाठी
२. पायाभूत सुविधा उभारणी करणे करिता चंद्रपूर बाजार समिती - रु.६३४.३३ २५% अनुदानासाठी
३. Development of marketing infrastructure at main and sub market at agricultural produce marketing committee, jamkhed, dist ahmednagar In maharashtra state रु.८६२.६१ - २५% अनुदानासाठी
४. Development of marketing infrastructure at main and sub market at agricultural produce marketing committee, karjat, dist Ahmednagar -रु. ११८८.०९ - २५% अनुदानासाठी

**३) टर्मिनल मार्केट :**

केंद्र शासनामार्फत सार्वजनिक व खाजगी भागीदारी संकल्पनेतून टर्मिनल मार्केटस मुंबई((ठाणे), नाशिक व नागपूर या ठिकाणी उभारण्यात येणार आहेत. या प्रकल्पांचा अंदाजित प्रकल्प खर्च खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र | टर्मिनल मार्केट | अंदाजीत खर्च रु.कोटी |
|---|---|---|
| १ | मुंबई (ठाणे) | २००-२५० |
| २ | नाशिक | ६० |
| ३ | नागपूर | ७० |

राज्यात उभारण्यात येणा-या टर्मिनल मार्केटसच्या अंमलबजावणीकरिता मा. पणन मंत्री महोदयांचा अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय समितीची स्थापना करण्यात आली. मा.प्रधान सचिव (सहकार व पणन) हे नोडल ऑफिसर व राज्याचे पणन संचालक हे अतिरिक्त नोडल ऑफिसर म्हणून कामकाज पहात आहेत. प्रस्तावित टर्मिनल मार्केट हे सार्वजनिक खाजगी भागीदारीतून उभारण्यात येणार असून हब आणि स्पोक संकल्पनेवर चालविली जाणार आहेत. प्रस्तावित टर्मिनल मार्केटस (Built Own and Operate) या धर्तीवर स्पर्धात्मक निविदा प्रक्रियेतून निवडलेल्या खाजगी उद्योजकाकडून चालविले जाणार आहेत. टर्मिनल मार्केटकरिता राष्ट्रीय फलोत्पादन अभियानातून प्रकल्प खर्चाच्या २५ ते ४० टक्के परंतु कमाल रु. ५० कोटी इतके अनुदान प्राप्त होऊ शकते. खाजगी उद्योजकाची निवड दोन टप्प्यात (Request for Qualification & Request for Proposal ) स्पर्धात्मक निविदा प्रक्रिया पूर्ण करण्यात येणार आहे. केंद्रशासनाने जुलै २००९ मध्ये टर्मिनल मार्केटकरिता सुधारीत मार्गदर्शक सूचना प्रसिध्द केल्या असून त्यानुसार मुंबई, नाशिक व नागपूर या टर्मिनल मार्केटच्या उभारणीबाबतची प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे. मुंबई (ठाणे) टर्मिनल मार्केटकरिता मौजे बाबगांव ता. कल्याण जि.ठाणे येथील ९२ एकर शासकीय जमिन पणन मंडळास हस्तांतरीत झालेली आहे. मुंबई टर्मिनल मार्केट उभारणीचे RFQ ची प्रक्रिया पूर्ण होऊन RFP टप्पा पूर्ण. दि. ३.३.२०१४ रोजी Unity Infraprojects Ltd. यांना लेटर ऑफ इंटेट व OMDA देण्यात आला आहे. करारनाम्यातील बदलाबाबत राज्यशासनाकडे मार्गदर्शन घेणेबाबत कार्यवाही सुरु आहे.

नागपूर टर्मिनल मार्केटकिरता मौजा वारंगा येथील जमिनीची मागणी केली असता सदर जमिनीवर शैक्षणिक संकुल स्थापन करुन शैक्षणिकदृष्टया सार्वजनिक सुविधा विकसित करण्याच्या उद्दीष्टाने कृषि पणन मंडळास टर्मिनल मार्केटकरिता यापूर्वी दिलेली मौजा वारंगा येथील जमिनी ऐवजी मौजा कालडोंगरी ता. नागपूर (ग्रामीण) येथील शासकीय जमीन कृषि पणन मंडळास टर्मिनल मार्केटकरिता देण्याबाबत मंत्रीमंडळ बैठकीत निर्णय घेण्यात आला आहे. राज्य शासनाने दिलेल्या जागेची मोजणी करुन ताब्यात घेण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.

नाशिक येथे टर्मिनल मार्केट उभारणीसाठी शासन मालकीची १०० एकर जमीन महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळास विनामुल्य हस्तातंरीत करण्याबाबत ग्राम पंचायत पिंप्री सैय्यद यांनी संमती दर्शविली आहे.

# ड) अभियांत्रिकी विभाग

कृषी उत्पन्न बाजार समित्यांना त्यांच्या बाजार आवारातील विविध विकास कामे / बांधकामे जसे - कार्यालय, गोदाम, लिलाव ओटे, लिलाव गृह, रस्ते, स्वच्छता गृहे, पाणी पुरवठा, जल नि:सारण व्यवस्था, व्यापारी गाळे, शेतकरी निवास, गुरांचे शेड, सीमाभिंत, तारेचे कुंपण, हमाल भवन, शितगृहे तसेच केंद्र शासनाच्या बाजार आवार विकास बळकटीकरण योजनेअंतर्गत बाजार आवारातील विविध विकासकामे इत्यादींच्या उभारणीसाठी पणन मंडळाकडे येणा-या कर्ज मागणी प्रस्तावांची तद् अनुषंगाने येणाऱ्या कर्ज विनियोग दाखला प्रस्तावांची तांत्रिक छाननीचे काम अभियांत्रिकी विभागामार्फत करण्यात येते. तसेच कृषि पणन मंडळामार्फत पणन मंडळाच्या स्वनिधी अथवा शासकीय अनुदानातुन उभारण्यात आलेली / येत असलेली शेतीमाल हाताळणी व प्रक्रिया प्रकल्पांची स्थापत्य विषयक व अनुषंगिक तांत्रिक कामकाज अभियांत्रिकी विभागामार्फत करण्यात येते.
अहवाल वर्षामध्ये (२०१६-२०१७) अभियांत्रिकी विभागामार्फत करण्यात आलेल्या विविध कामकाजाबाबतची माहिती पुढील प्रमाणे :-

अ) अपेडा, नवी दिल्ली / राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत (रा. कृ. वि. यो.) पणन मंडळामार्फत खालील निर्यात सुविधा केंद्र, फुले निर्यात सुविधा केंद्र, फळे व भाजीपाला आधुनिक सुविधा केंद्र तसेच इतर सुविधांची उभारणी करण्यात आली/येत आहे.

| अ.क्र. | प्रकल्पाचे ठिकाण |
|---|---|
| **अ** | **निर्यात सुविधा केंद्र** |
| १ | इरॅडिएशन प्रकल्प वाशी, नवी मुंबई |
| १.१ | फळे व भाजीपाला सुविधा केंद्र, वाशी, नवी मुंबई |
| २ | केळी निर्यात सुविधा केंद्र, इंदापुर, जि. पुणे |
| ३ | **डाळींब व द्राक्ष निर्यात सुविधा केंद्र, आटपाडी, जि.** सांगली |
| ४ | **संत्रा निर्यात सुविधा केंद्र, वरूड, जि. अमरावती** |
| ५ | **आंबा पॅकहाऊस, गोरेगाव** |
| **ब)** | **फुले निर्यात सुविधा केंद्र,** |
| १ | सातारा |
| **क)** | **फळे व भाजीपाला आधुनिक सुविधा केंद्र** |
| १ | करमाड |
| २ | राजगुरुनगर |
| ३ | पुलगांव (वर्धा) |
| ४ | लोणी |
| ५ | भिवापूर |
| ६ | पालघर |
| ७ | तळसंदे |
| ८ | म्हसवड |
| **ड)** | **इतर सुविधा** |
| १ | इरॅडिएशन प्रकल्प वाशी येथील तळमजला व दुसरा मजल्यावरील फर्निचर कामवाशी , |
| २ | इरॅडिएशन प्रकल्प वाशी येथील तळमजला व दुसरा मजल्या वरील विद्युतीकरण, CCTV आणि EPABX काम, वाशी |
| ३ | विभागीय कार्यालय औरंगाबाद |
| ४ | व्हि.एच.टी. सुविधेचे आधुनिकीकरण करणे |
| ५ | इरॅडिएशन प्रकल्प वाशी येथील एस. एस. टॅंकचे रुपांतर हॉट वॉटर टॅंकमध्ये करणे. |

| | |
|---|---|
| ६ | आंबा निर्यात सुविधा केंद्र, जामसंडे, ता. देवगड सुविधेचे आधुनिकीकरण करणे. |
| ७ | विकिरण सुविधा केंद्र, वाशी येथे तळमजल्यावरील रिसीव्हींग व डिस्पॅचकरीता डॉक लेव्हलर, प्रिकुलिंग व अनुषंगिक कामे. |
| ८ | फळे व भाजीपाला आधुनिक सुविधा केंद्र, घनसावंगी येथील प्रकल्पास एक्स्प्रेस फिडरवरुन विद्युत पुरवठा करणे. |
| ९ | निर्यात सुविधा केंद्र, कळवण येथील प्रकल्पास एक्स्प्रेस फिडरवरुन विद्युत पुरवठा करणे. |
| १० | फुले निर्यात सुविधा केंद्र, सातारा येथील बाह्य विद्युतीकरण. |

ब) राष्ट्रीय कृषि विकास योजने अंतर्गत जहाल डाव्या विचारसरणीने प्रभावित गडचिरोली, गोंदिया, चंद्रपुर व भंडारा या चार नक्षलग्रस्त जिल्ह्यातील बाजार समित्यांच्या आवारांमधील पणन विषयक पायाभूत सुविधा उभारणी प्रकल्प-

या प्रकल्पांच्या उभारणीची उद्दीष्टे पुढीलप्रमाणे आहेत –

- नक्षलग्रस्त जिल्ह्यांतील आदिवासी व इतर शेतक-यांना चांगल्या प्रकारच्या पणन सुविधा पुरवून त्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे.
- आर्थिक स्थैर्यातून या भागातील सामान्य जनतेस नक्षलवादी चळवळीत सहभागी होण्यापासून परावृत्त करणे.
- हंगामात होणारी मोठ्या प्रमाणावरील शेतमालाची आवक अधिक कार्यक्षमपणे हाताळण्यास संबंधित बाजारपेठांना सक्षम करणे.
- कार्यक्षमतेतील वाढीमुळे पणन विषयक खर्चात घट साध्य करणे.
- संबंधित बाजार समित्यांच्या बाजार आवारांमध्ये आवश्यक स्वच्छता / आरोग्य राखून शेतमालाच्या सुगी पश्चात हानीमध्ये घट साध्य करणे.

राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत पहिल्या टप्प्यात गडचिरोली, गोंदिया व चंद्रपूर या ३ जिल्ह्यांतील ११ बाजार समित्यांच्या बाजार आवारांमध्ये पणन विषयक पायाभूत सुविधा उभारणीसाठी रु. ३९.०२ कोटी किमतीचे प्रकल्पांना राष्ट्रीय कृषि विकास योजनेच्या राज्यस्तरिय प्रकल्प मंजूरी समितीने मंजूरी दिलेली आहे. या ११ बाजार समित्यांच्या प्रकल्पांचे कामकाज सन २०१०-२०११ पासून सुरु झालेले होते. सद्यस्थितीत त्यांची कामे जवळपास पूर्ण झालेली आहेत. या प्रकल्पांतर्गत या ३ जिल्ह्यातील एकूण ११ बाजार समित्यांना रु. २९.२९ कोटी अनुदान मंजूर असून मागिल वर्षाअखेर राष्ट्रीय कृषि विकास योजनेमधून रु. २३.४५ कोटी अनुदान पणन मंडळामार्फत देण्यात आलेले आहे.

सन २०१६-१७ आर्थिक वर्षअखेर सदर ११ बाजार समित्यांची बाजार समिती निहाय मंजूर प्रकल्प किंमत, मंजूर अनुदान रक्कम, बाजार समितीला अदा अनुदान रक्कम व प्रकल्पांवर झालेला एकूण खर्च याबाबतचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे :

(आकडे रु. कोटींमध्ये)

| क्र. | बाजार समिती | SLSC मंजुरी दिनांक | मंजूर प्रकल्प किंमत | मंजूर अनुदान रक्कम ७५(%) | बा.स.ला अदा अनुदान रक्कम | बा. स. स्वनिधी खर्च | कामावर झालेला एकूण खर्च |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | चामोर्शी जि. गडचिरोली | २६/०३/२०१० | ९.९९ | ७.४९ | ५.६६ | २.७० | ८.३६ |
| २. | अहेरी जि. गडचिरोली | २६/०३/२०१० | २.३२ | १.७४ | १.६५ | ०.५८ | २.२३ |
| ३. | गोरेगांव जि. | २७/१०/२०१० | २.६५ | १.९९ | १.३१ | ०.४४ | १.७५ |

| क्र. | बाजार समिती | SLSC मंजुरी दिनांक | मंजूर प्रकल्प किंमत | मंजूर अनुदान रक्कम ७५(%) | बा.स.ला अदा अनुदान रक्कम | बा. स. स्वनिधी खर्च | कामावर झालेला एकूण खर्च |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | गोंदिया | | | | | | |
| ४. | तिरोडा जि. गोंदिया | २७/१०/२०१० | २.४० | १.८० | १.२५ | ०.४१ | १.६६ |
| ५. | आमगांव जि. गोंदिया | २७/१०/२०१० | ४.७४ | ३.५६ | ३.२५ | १.२२ | ४.४७ |
| ६. | गोंदिया जि. गोंदिया | २७/१०/२०१० | ७.०५ | ५.२९ | ४.१२ | १.३० | ५.४२ |
| ७. | अर्जुनी मोरगांव जि. गोंदिया | २७/१०/२०१० | २.३० | १.७३ | १.५९ | ०.५३ | २.१२ |
| ८. | कोरपना जि. चंद्रपूर | २७/१०/२०१० | १.१७ | ०.८८ | ०.८८ | ०.२९ | १.१७ |
| ९. | सिंदेवाही जि. चंद्रपूर | २७/१०/२०१० | १.८२ | १.३७ | १.०५ | ०.३४ | १.३९ |
| १०. | सावली जि. चंद्रपूर | २७/१०/२०१० | ३.२१ | २.४१ | १.७८ | ०.६० | २.३८ |
| ११. | पोंभुर्णा जि. चंद्रपूर | २७/१०/२०१० | १.३७ | १.०३ | ०.९१ | ०.३१ | १.२२ |
| | एकूण | | ३९.०२ | २९.२९ | २३.४५ | ८.७२ | ३२.१७ |

राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत दुसऱ्या टप्प्यात गडचिरोली, भंडारा व चंद्रपूर या ३ जिल्ह्यातील एकूण १४ बाजार समित्यांमध्ये रु. ६६.४० कोटी प्रकल्प खर्चाचे पणन विषयक पायाभूत सुविधा उभारणीचे प्रकल्पांना दि. २३/०५/२०१३ रोजीच्या १६ व्या राज्यस्तरिय प्रकल्प मंजूरी समितीने तत्वतः मंजूरी दिलेली आहे. त्याबाबतचा सविस्तर तपशिल खालील प्रमाणे आहे.

(आकडे रु. कोटींमध्ये)

| अ.क्र. | बाजार समिती | जिल्हा | प्रकल्पाची एकूण किंमत | प्रस्तावित अनुदान रक्कम (@ ७५%) |
|---|---|---|---|---|
| १. | आरमोरी | गडचिरोली | ५.०७ | ३.८० |
| २. | गडचिरोली | | ५.०० | ३.७५ |
| ३. | तुमसर | भंडारा | ४.९७ | ३.७३ |
| ४. | लाखांदूर | | ४.९५ | ३.७२ |
| ५. | लाखनी | | ५.०१ | ३.७६ |
| ६. | पवनी | | २.४२ | १.८१ |
| ७. | चिमूर | चंद्रपूर | ५.३५ | ४.०१ |
| ८. | ब्रम्हपूरी | | ५.०४ | ३.७८ |
| ९. | वरोरा | | ५.०० | ३.७५ |
| १०. | राजुरा | | २.९७ | २.२२ |
| ११. | गोंडपिंपरी | | ५.२४ | ३.९३ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १२. | चंद्रपूर | | ५.२४ | ३.९३ |
| १३. | मूल | | ५.१९ | ३.९० |
| १४. | नागभीड | | ४.९७ | ३.७३ |
| | | एकूण | ६६.४० | ४९.८० |

वरील १४ बाजार समित्यांचे प्रकल्पांना शासनाने तत्वतः मान्यता दिलेली आहे. तथापी या प्रकल्पांना राष्ट्रीय कृषि विकास योजनेच्या राज्यस्तरीय प्रकल्प मंजुरी समितीची वित्तीय व अंतिम मान्यता अद्याप मिळालेली नाही.

राष्ट्रीय कृषि विकास योजनेच्या नवीन मार्गदर्शक सूचनांनुसार या १४ बाजार समित्यांना केवळ २५% अनुदान मिळू शकते. तथापी या १४ बाजार समित्या राज्याच्या अतिशय अविकसित व नक्षलग्रस्त जिल्ह्यांमधील आर्थिकदृष्ट्या दुर्बल बाजार समित्या असल्याने या बाजार समित्यांना २५ % अनुदान मंजुरीऐवजी ७५% अनुदान मंजुरी मिळावी यासाठी कृषि पणन मंडळामार्फत राज्य शासनाकडे पाठपुरावा करण्यात आलेला आहे.

क ) भारत सरकारच्या केंद्रीय विपणन आणि निरीक्षण निदेशालय (डी.एम.आय.) मार्फत राज्यातील कृषि उत्पन्न बाजार समित्यांना पायाभूत सुविधा उभारणी व विकास कामांसाठी अनुदान योजना –
डी. एम. आय. कार्यालय, भारत सरकारच्या AMIGS योजनेअंतर्गत राज्यातील कृषि उत्पन्न बाजार समित्यांना त्यांच्या बाजार आवारांमध्ये पायाभूत सुविधा उभारणी व विकास कामांसाठी एकूण प्रकल्प किमतीच्या २५ % अनुदान मंजुरी देण्यात येते.

या योजने अंतर्गत राज्यातील एकूण ३३ बाजार समित्यांना रुपये ३८.४८ कोटी प्रकल्प किमतीच्या २५ % अनुदान रुपये ९.६२ कोटी मंजूर करण्यात आले होते. यापैकी पहिल्या हप्त्याची अनुदानाची रक्कम रुपये ५.४० कोटी या बाजार समित्यांना पणन मंडळाकडून यापूर्वी वितरीत करण्यात आली होती. तथापी कृषि मंत्रालय, भारत सरकारच्या दि. २५/०२/२०१० रोजीच्या मार्गदर्शक सुचनेनुसार 'महाराष्ट्र राज्यातील बाजार समित्यांनी फळे व भाजीपाल्यावरील नियमन काढले नाही' या कारणास्तव या ३३ बाजार समित्यांची दुसऱ्या हप्त्याची अनुदान रक्कम मार्च २०१० पासून डी.एम.आय. कडून स्थगित ठेवण्यात आली होती. सदर अनुदान रक्कम लवकर मिळणेसाठी कृषी पणन मंडळाकडून भारत सरकारकडे वेळोवेळी पाठपुरावा करण्यात आला होता. या ३३ बाजार समित्यांना दि. १६/०३/२०१६ रोजीच्या केंद्रीय अनुदान मंजुरी समिती सभेमध्ये अनुदानाची दुसऱ्या हप्त्याची रक्कम रु. ४.२२ कोटी मंजूर करण्यात आली व सदर अनुदान रक्कम पणन मंडळाकडून संबंधित बाजार समित्यांना नोव्हेंबर २०१६ मध्ये वितरीत करण्यात आली आहे.

या योजनेअंतर्गत राज्यातील सांगोला, गेवराई, बीड, पाचोरा, श्रीगोंदा, फुलंब्री, राहता ,राहुरी, सिल्लोड, आष्टी, तळोदा, इंदापूर, रामटेक, मुल, चंद्रपूर, लाखनी, नागपूर, श्रीरामपूर, अहमदनगर, कळंब, वणी, यवतमाळ, कामठी, नांदगाव, शहादा, सांगली, आटपाडी , मुरूम, मानोरा, पैठण, मुर्तीजापुर, तेल्हारा, संगमनेर, नेवासा, कोल्हापूर व हिंगोली या बाजार समित्यांचा समावेश आहे.

या योजनेअंतर्गत बाजार आवारांमध्ये लिलाव गृह, फळे/भाजी विक्रीसाठी ओटे, पिण्याचे पाण्यासाठी टाकी, पिण्याचे पाण्यासाठी पाईप लाईन, विद्युतीकरण, अंतर्गत रस्ते, कंपाउंड भिंत, शिदोरी गृह, गोदाम, जनावरांसाठी शेड, लिलाव ओटे, सिमेंट कॉक्रीटकरण, नाले, ड्रेनेज, बहूद्देशिय व्यापारी गाळे, प्रवेशद्वार, विद्युतीकरण इत्यादी विकास कामांसाठी अनुदान मंजुरी होती.

केंद्रीय अनुदान मंजुरी समितीकडून एकूण ९ बाजार समित्यांचे प्रकल्पाची कामे वेळेत झाली नाहीत तसेच प्रकल्पामध्ये दाखविलेली कामे केली गेली नाहीत इत्यादी कारणांमुळे अनुदान प्रस्ताव नाकारण्यात आले.

ड) कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या कर्ज मागणी प्रस्ताव /त्रुटी पुर्तता प्रस्ताव/कर्ज विनियोग दाखला प्रस्तावांची अहवाल वर्षात करण्यात आलेली तांत्रिक छाननी.

(१) बुलडाणा, जि. बुलडाणा, (२) चांदूररेल्वे, जि. अमरावती, (३) गेवराई, जि. बीड, (४) नायगांव (बा.), जि. नांदेड, (५) कामठी, जि. नागपूर, (६) लाखणी, जि. भंडारा, (७) मौदा, जि. नागपूर, (८) नरखेड, जि. चंद्रपूर, (९) रामटेक, जि. नागपूर, (१०) इंदापूर, जि. पुणे, (११) कुर्डुवाडी, जि. सोलापूर (१२) पाटोदा, जि. बीड, (१३) चांदूररेल्वे, जि. बीड, (१४) साक्री, जि. धुळे, (१५) तळोदा, जि. नंदुरबार, (१६) गेवराई, जि. बीड, (१७) कुर्डुवाडी, जि. सोलापूर.

## इ) संगणक विभाग

- **मार्कनेट प्रकल्प:**

मार्कनेट म्हणजे मार्केट नेटवर्क. या अंतर्गत कृषि पणन मंडळाने राज्यातील सर्व बाजार समित्या संगणकीकृत करुन इंटरनेटच्या माध्यमातून जोडल्या आहेत. या प्रकल्पाचा मुख्य उद्देश बाजार समित्यांच्या आवारात येणाऱ्या शेतमालाच्या माहितीची (आवक व दर) देवाण-घेवाण करुन, शेतकऱ्याच्या शेतमालास रास्त भाव मिळवून देणे, तसेच बाजार समितीच्या कामकाजामध्ये सुसुत्रता आणणे हा आहे. या योजनेअंतर्गत राज्यातील २९४ मुख्य बाजार व ६६ उपबाजार यांना संगणक संच व तत्सम सामुग्री इंटरनेटसह विनामूल्य पुरविण्यात आली आहे. बाजार समितीमार्फत दैनिक शेतमालाची आवक व बाजारभाव संगणकामध्ये भरुन पणन मंडळाच्या वेबसाईटवर (www.msamb.com) अपलोड करण्यात येतात. याप्रमाणे सर्व संगणकीकृत बाजार समित्यांची माहिती वेबसाईटद्वारे एकत्रित करुन सर्वांना उपलब्ध करण्यात येते.

राज्यातील सर्व बाजार समित्यांना कृषि पणन मंडळाची ई-मेल सुविधा पणन मंडळामार्फत विनामुल्य पुरविण्यात आली आहे. कृषि पणन मंडळ व बाजार समित्या यामधील पत्र व्यवहार व माहिती देवाण घेवाण या ई-मेल सुविधेद्वारे सुरू आहे. यामुळे माहिती देवाण घेवाणसाठी लागणा-या वेळेत व खर्चात बचत झाली आहे.

- **राष्ट्रीय कृषि बाजार (eNAM) योजना:**

केंद्रशासनाने सुरु केलेल्या National Agriculture Market (eNAM) या योजनेअंतर्गत राज्यातील 30 बाजार समित्यांमध्ये संगणकीकृत लिलाव पद्धती (ई-ऑक्शन) कार्यान्वित करणेबाबत कार्यवाही सुरु आहे. यासाठी केंद्र शासनाच्या कृषि विभागाने ३० बाजार समित्यांचे संगणकीकरणासाठी प्रति बाजार समिती रु. ३०/- लाख प्रमाणे रु.९/- कोटी इतका निधी दिला आहे. योजनेच्या अंमलबजावणीसाठी रु.३०/- लाख व्यतिरीक्तचा खर्च बाजार समित्यांना करावा लागणार आहे.

बाजार समित्यांमध्ये संगणकीकृत लिलाव पद्धती (ई-ऑक्शन) ची अंमलबजावणी एस.एफ.ए.सी. या केंद्र शासनाच्या संस्थेमार्फत करण्यात येत आहे. सदर संस्थेने योजनेच्या अंमलबजावणीसाठी सेवा पुरवठादाराची नियुक्ती केली आहे. नाम योजनेमध्ये समाविष्ट होणाऱ्या बाजार समित्यांना केंद्र शासनाकडून ई-ऑक्शन सॉफ्टवेअर, त्याची अंमलबजावणी, प्रशिक्षण, दुरुस्ती व देखभाल विनामुल्य पुरविण्यात येत आहे. एकूण २९ बाजार समित्यांनी संगणकाद्वारे नाम सॉफ्टवेअरचा वापर करुन गेट एन्ट्री सुरु केली असून ५ बाजार समित्यांनी ऑनलाईन ऑक्शन सुरु केले आहे. पुढील टप्यासाठी ३० बाजार समित्यांचा प्रस्ताव केंद्र शासनाने मान्य केला आहे.

- **ई-ऑफिस:**

कृषि पणन मंडळाचे कार्यालय व विभागीय कार्यालये यांच्या कामकाजात सुसुत्रता व पारदर्शकता आणण्यासाठी मुख्यालयातील टपाल व धारिका विषयक कामकाजासाठी ई-ऑफिस संगणक प्रणाली कार्यान्वित करण्यात आली आहे. कृषि पणन मंडळास प्राप्त झालेला पत्रव्यवहार अथवा प्रत्येक विभागाची धारिका याबाबतची कार्यवाही नियमितपणे ई-ऑफिस संगणक प्रणालीद्वारे सुरू आहे. ई-ऑफिसचा वापर करुन टिपण्या व टपाल या डिजीटल स्वरुपात ठेवून कार्यालय पेपरलेस करण्यात येत आहे. टिपण्या व धारीकांना ऑनलाईन मंजूरी देण्यात येत आहे. ई-ऑफिसमुळे टपाल व धारिका विषयक कामकाजाचा आढावा घेणे सोपे झाले आहे.

- **डेटा सेंटर :**
  संगणक विभागात स्वतंत्र टियर ३ पद्धतीचे डेटा सेंटर कार्यान्वित करण्यात आले आहे. या डेटा सेंटर मध्ये वेब, मेल, डेटाबेस, ई-ऑफीस, बाजार समित्यांच्या कामकाजासाठी पणन मंडळाने विकसीत केलेली ऑनलाईन संगणक प्रणाली, ईआरपी संगणक प्रणली, कॉम्पुटराईज्ड ऑक्शन सिस्टीम संगणक प्रणाली इत्यादी साठी सर्व्हर, स्टोरेज व बॅक-अप सुविधा कार्यरत आहे. इंटरनेट साठी २० एम.बी.पी.एस. ब्रॉड बॅन्ड व २० एम.बी.पी.एस. लिज्ड लाईन कार्यरत आहेत. डेटा सेंटर २४ x ७ कार्यरत असते.

- **ईआरपी संगणक प्रणाली :**
  कृषि पणन मंडळ व एन. आय. पी. एच. टी. यांचे कामकाजासाठी ईआरपी व एम.आय.एस. संगणक प्रणाली कार्यान्वित करण्यात आली असून त्या मध्ये विविध अहवाल विकसीत करण्यात आले आहेत. यामुळे माहितीचे एकत्रीकरण करणे सोयीचे झाले असून सविस्तर व संक्षिप्त अहवाल त्वरित प्राप्त होत आहेत.

- **डी.एम.आय. भारत सरकार यांचे कडून संगणक चालकास प्रोत्साहन भत्ता :**
  डी.एम.आय. भारत सरकार यांचे द्वारे Marketing Research & Information Network Scheme अंतर्गत अँगमार्कनेट वेबसाईटवर प्रत्येक महिन्याला २० दिवसांपेक्षा जास्त दिवस बाजारभाव माहिती भरणा-या कर्मचाऱ्यास रु.१०००/- प्रती माह प्रोत्साहन भत्ता देण्यात येतो. डि.एम.आय., भारत सरकार यांचे कडे प्रोत्साहन भत्ता मंजुरीसाठी प्रस्ताव पाठविण्यात येतात. आत्तापर्यंत रु.६९.०५/- लाख प्रोत्साहन भत्ता वाटप केला आहे.

- **सांख्यिकीय माहिती :**
  बाजार समित्यांकडून प्राप्त होत असलेले मासिक, वार्षिक बाजारभाव व आवक, तसेच बाजार समित्यांची इतर सर्वसाधारण माहिती संगणकामध्ये साठविणेसाठी व विविध अहवाल तयार करण्यासाठी डेटाबेस तयार करण्यात आला आहे. या डेटाबेस चा उपयोग करुन बाजार समित्यांचे उत्पन्न, खर्च, मार्केट फी तसेच वेब साईट डाटाबेसला उपलब्ध असलेली बाजार समित्यांमधील शेतमालाची आवक व किंमत याबाबत माहिती आवश्यकते प्रमाणे केंद्र शासन, राज्य शासन व इतर संबंधितांना वेळोवेळी पुरविण्यात येत आहे.

# ई) जनसंपर्क व प्रसिध्दी विभाग

## १. बाजार समिती पदाधिकारी / अधिकारी/शेतकरी प्रशिक्षण

कृषि पणन मंडळामार्फत राज्यातील कृषि उत्पन्न बाजार समित्यांचे पदाधिकारी आणि अधिकारी यांना तसेच बाजार समित्यांमार्फत पाठविलेल्या शेतक-यांना कृषि पणन मंडळाने स्थापन केलेल्या राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्था, तळेगाव दाभाडे , जि. पुणे या संस्थेत प्रशिक्षण देण्याचे काम करण्यात येते. दिनांक १/४/२०१६ ते ३१/३/२०१७ दरम्यान बाजार समित्यांमार्फत ६३ शेतक-यांना जनरल ग्रीन हाऊस मॅनेजमेंट प्रशिक्षण देण्यात आले.

## २. 'कृषि पणन मित्र' मासिक

कृषि पणन मंडळामार्फत दर महिन्याला ' कृषि पणन मित्र' मासिक प्रसिध्द करण्यात येते. सदरचे मासिक प्रत्येक महिन्यास वर्गणीदार,कृषि उत्पन्न बाजार समिती, सहाय्यक निबंधक, जिल्हा उपनिबंधक, विभागीय सहनिबंधक, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, विभागीय कृषि अधिकारी, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, जिल्हा परिषदा, पणन मंडळाचे संचालक मंडळ, मंत्रीमंडळ, मंत्रालयीन सचिव, वृत्तपत्रे, कृषि मासिके, इत्यादींना पाठविण्यात येते. अंकाचे जास्तीत जास्त वर्गणीदार करणेसाठी बाजार समिती, कृषि विभाग व सहकार विभागामार्फत पाठपुरावा करण्यात येत आहे. तसेच राज्यातील सर्व ग्रामपंचायती आणि विविध कार्यकारी सहकारी संस्था यांना वर्गणीदार करणेसाठी प्रयत्न करण्यात येत आहेत.

सदर मासिकामध्ये कृषि उत्पादन, पिक संरक्षण, कृषी क्षेत्रातील उच्च तंत्रज्ञान, पाणी व्यवस्थापन, बी-बियाणे, प्रक्रिया उद्योग, पणन व निर्यात केंद्रे, राज्य शासनाच्या विविध योजना, सुगी पश्चात तंत्रज्ञान, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय, इ. विषयांवर तज्ञांचे लेख प्रसिध्द करण्यात येत असतात.

अहवाल वर्षात महिनानिहाय वितरीत अंकांची संख्या :

| अ.क्रं. | महिना | वितरीत अंक |
|---|---|---|
| १. | एप्रिल २०१६ | १८००० |
| २. | मे २०१६ | १७०८७ |
| ३. | जून २०१६ | १८१८० |
| ४. | जुलै २०१६ | १८००० |
| ५. | ऑगस्ट २०१६ | १४७१० |
| ६. | सप्टेंबर २०१६ | १६७६३ |
| ७. | ऑक्टोबर २०१६ | १६७२६ |
| ८. | नोव्हेंबर २०१६ | १६११९ |
| ९. | डिसेंबर २०१६ | १५९०४ |
| १०. | जानेवारी २०१७ | १५८२१ |
| ११. | फेब्रुवारी २०१७ | १४६७० |
| १२. | मार्च २०१७ | १४३५४ |

अहवाल वर्षात कृषि पणन मित्र मासिकाचे सुमारे ३ लाख वाचक आहेत. "कृषि पणन मित्र" मासिक शेतकरी व कृषि उद्योजक यांच्यापर्यत अधिक संख्येने पोहोचविणेकरीता मासिकाचे व्यावसायिकरण करण्याचे निर्णय घेण्यात आलेला आहे.

## ३. दिनदर्शिका २०१७ व दैनंदिनी २०१७

सन २०१७ मध्ये पणन मंडळाची दिनदर्शिका व दैनंदिनी छपाई करुन त्यांच्या प्रती मंत्रालय, राज्यातील बाजार समित्या व पणन मंडळातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांना वितरीत करण्यात आल्या. कृषि पणन मंडळाच्या विविध उपक्रमांची माहिती लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी सदर दिनदर्शिकेचा, दैनंदिनीचा उपयोग होत आहे.

## ४. प्रदर्शन सहभाग

कृषी पणन मंडळाच्या विविध योजना, प्रकल्प, उपक्रम आणि कार्यक्रम यांची माहिती राज्यातील शेतक-यांना व्हावी व याचा फायदा जास्तीत जास्त शेतक-यांनी करुन घेण्याच्या दृष्टिकोनातून याबाबतची माहिती विविध प्रदर्शनामध्ये सहभागी होवून कृषी पणन मंडळातर्फे संबंधितांना देण्यात येते. तसेच सदर प्रदर्शनामध्ये कृषी पणन मित्र मासिकाचे जास्तीत जास्त वर्गणीदार करुन घेण्याचे प्रयत्न करण्यात येतात. चालू आर्थिक वर्षामध्ये कृषि प्रदर्शनासाठी झालेल्या खर्चास व नियोजित प्रदर्शन खर्चास मंजूरी घेण्यात आली. अहवाल वर्षात मंडळ खालील प्रदर्शनामध्ये सहभागी झाले ;

| अ.क्रं. | प्रदर्शनाचे नांव | ठिकाण | कालावधी |
|---|---|---|---|
| १. | कृषि पंढरी २०१६ | कृ.उ.बा.स., पंढरपूर, जि. सोलापूर | १४ ते १९ जुलै २०१६ |
| २. | “ऊस मूल्य साखळी – दृष्टिक्षेप २०१५ | वसंतदादा शुगर इनस्टीट्यूट, मांजरी, जि. पुणे | १३ ते १५ नोव्हेंबर २०१६ |
| ३. | कृषि औद्योगिक व पशूपक्षी प्रदर्शन | भाजीपाला मार्केट, बाजार समिती आवार, कराड, जि. सातारा | २४ ते २८ नोव्हेंबर २०१६ |
| ४. | ॲग्रोव्हिजन ८ वे | रेशीम बाग ग्राउंड, जि. नागपूर | ११ ते १४ डिसेंबर २०१६ |
| ५. | किसान २०१६ | मोशी, जि. पुणे | १६ ते २० डिसेंबर २०१६ |
| ६. | २ री आंतराष्ट्रीय परीषद | महाराष्ट्र इकॉनॉमिक्स सो., एम.पी.के.व्ही., राहुरी, जि. अहमदनगर | १० व ११ फेब्रुवारी २०१७ |
| ७. | राष्ट्रीय डाळिंब परीसंवाद | निसर्ग मंगल कार्यालय, गुलटेकडी, मार्केट यार्ड, पुणे | १८ व १९ मार्च २०१७ |

## ५. प्रदर्शन / कार्यशाळा / परिषद आर्थिक मदत

आर्थिक वर्षामध्ये कृषि विषयक चर्चासत्र, प्रशिक्षण, प्रदर्शन आयोजित करण्यासाठी वेळोवेळी कृषि विद्यापिठे, कृषि विभाग, शास्त्रज्ञांच्या संस्था, कृषि उत्पन्न बाजार समित्या , कृषि पणनाशी संबंधित सहकारी संस्था यांच्याकडून पणन मंडळाकडे अर्थसहाय्य मिळणेबाबत विनंती केली जाते. पणन व्यवस्थेसंदर्भात प्रशिक्षण, प्रदर्शन, चर्चासत्र इत्यादींचे आयोजन करणे हे पणन मंडळाचे कार्य आहे. अशा प्रकारचे कामकाज इतर संस्था करीत असल्यास त्यांच्या चर्चासत्र, प्रशिक्षण, प्रदर्शन इत्यादींच्या आयोजनाकरीता कृषि पणन मंडळाकडून आर्थिक सहाय्य देणे कृषि पणन विषयक कामकाजांना गती देण्यासाठी आवश्यक आहे. या अनुषंगाने सन २००१ सभा क्रं. ७२ मध्ये राज्यातील कृषि विद्यापिठे , विद्यापिठे, कृषि महाविद्यालये, कृषि विभाग, शास्त्रज्ञांच्या संस्था (असोसिएशन / सोसायटी) कृषि उत्पन्न बाजार समिती, कृषि पणनाशी संबंधित सहकारी संस्था, कृषि क्षेत्र आणि कृषि पणन क्षेत्राशी निगडीत शासकीय, निमशासकीय संस्था यांना कृषि आणि कृषि पणन विषयक चर्चासत्र, कृतिसत्र, प्रशिक्षण, प्रदर्शन, इ. साठी येणा-या खर्चाच्या २५ टक्के किंवा जास्तीत जास्त रु. ५०,०००/- यापैकी जी रक्कम कमी असेल तेवढी रक्कम अर्थसहाय्य म्हणून देण्यात आली व यांबंधीचे निर्णय घेण्याचे अधिकार मा. कार्यकारी संचालक यांना देण्यात आले आहेत. या ठरावाच्या अनुषंगाने

सन २०१६-१७ मध्ये ठरावास अनुसरुन व त्यापुढील जादा आर्थिक सहाय्यास मा. अध्यक्ष व संचालक मंडळ सभेच्या मंजुरीने मान्यता देण्यात आली त्याचा तपशिल खालीलप्रमाणे :

| अ.क्र. | संस्थेचे नांव/मासिकाचे नांव | विषय | रक्कम रु. |
|---|---|---|---|
| १) | मेडिया टू डे | कृषि प्रदर्शन, एच.ए. स्पोर्टस ग्राउंड , पुणे | १,००,०००/- |
| २) | कृषि उत्पन्न बाजार समिती, पंढरपूर | कृषि पंढरी, पंढरपूर २०१६- | ५०,०००/- |
| ३) | बेजो शितल बायो सायन्स फाउंडेशन , जालना | 2nd National Symposium in Edible Alliums: Challenges &future Stragies for Sustainble Production | १,००,०००/- |
| ४) | वसंतदादा शुगर इन्सटीट्यूट, मांजरी, | उस मूल्य साखळी दृष्टिक्षेप २०१५ | ३,५५,०००/- |
| ५) | ॲग्रोव्हिजन, नागपूर | ॲग्रोव्हिजन ८ वे | १०,००,०००/- |

## ६. कृषि पणन मंडळ जाहिरात -

कृषि पणन मंडळाची सन २०१६-२०१७ या कालावधीमध्ये खालील मासिकांमध्ये व पोस्टाच्या कॅलेंडरसाठी जाहिरात देण्यात आली. मासिकांतील व पोस्टातील जाहिरातीमुळे पणन मंडळास विविध भागातून उदा. ग्राम पातळीवर, शहर पातळीवर प्रसिध्दी मिळते तसेच पणन मंडळाच्या योजनांची माहिती लोकांपर्यंत पोहोचते.

| अ.क्र. | संस्थेचे / मासिकाचे नाव | विषय | रक्कम रु. |
|---|---|---|---|
| १. | योध्दा शेतकरी | विशेषांक | ३०,०००/- |
| २. | उद्योगप्रेरणा मासिक | विशेषांक | २,५००/- |
| ३. | दि पुणे पोस्ट ॲन्ड टेलिकॉम को – ऑप क्रेडीट सोसायटी लि., पुणे | पोस्ट दिनदर्शिका | ९,०००/- |

## ७. प्रसिद्धी

कृषि पणन मंडळातर्फे विविध प्रकारच्या कार्यशाळा, प्रदर्शन, चर्चासत्र, इतर अनुषंगिक कार्यक्रम व पत्रकार परिषद आयोजित केल्या जातात. मा. अध्यक्ष कृषि पणन मंडळ यांच्या पत्रकार परिषद, प्रेसनोट तसेच इतर प्रसिध्दीचे कामकाज करण्यात येते.

## ८. लेख प्रसिध्दी

लेख प्रसिध्दी – कृषि पणनाशी संबंधित माहिती शेतकरी, सह. संस्था, शास्त्रज्ञ, अधिकारी, पदाधिकारी, विस्तार कार्यकर्ते यांचेमार्फत पोहोचविण्यासाठी कृषि पणन मंडळ सतत प्रयत्नशिल आहे. कृषी पणनाशी संबंधित माहितीवर आधारित विविध लेख अहवाल वर्षात प्रसिध्द करण्यात आले.

## ९. दूरदर्शन आणि आकाशवाणी कार्यक्रमात सहभाग

कृषि पणन मंडळ, दूरदर्शन, मुंबई व पुणे, आकाशवाणी पुणे केंद्राच्या ग्रामीण कार्यक्रम सल्लागार समितीचे सदस्य आहे. दूरदर्शन केंद्र, पुणे व मुंबई, आकाशवाणी पुणे केंद्रावरुन तसेच इतर आकाशवाणी केंद्रावरुन कृषि पणन मंडळाचे विविध कार्यक्रम, योजना, उपक्रम यांची माहिती तसेच शेतक-यांना कृषि तंत्रज्ञानाची माहिती होण्याच्या दृष्टिकोनातून पणन मंडळाच्या तज्ञांचे कार्यक्रम प्रसारीत करण्यात येतात. तसेच प्रत्येक तिमाहीसाठी विषय आणि तज्ञांची नावे कळविण्यात येतात. या कार्यक्रमांमुळे शेतक-यांना कृषि पणन मंडळाच्या योजना व कृषि विषयक मार्गदर्शन मिळण्यास मोठ्या प्रमाणावर मदत झालेली आहे.

सन २०१६-१७ या आर्थिक वर्षामध्ये दूरदर्शन, मुंबई व दूरदर्शन केंद्र, पुणे वरुन "कृषि दर्शन" या कार्यक्रमाअंतर्गत पणन मंडळाचे खालील अधिका-यांचे कार्यक्रम प्रसारित करण्यात आले ;

| अ.क्रं. | अधिका-याचे नांव व पदनाम | विषय | कार्यक्रम प्रसारण दिनांक | दूरदर्शन केंद्राचे नांव |
|---|---|---|---|---|
| १. | डॉ. प्रशांत सोनवणे उपसरव्यवस्थापक, | बाजार समिती कामकाज व आव्हाने | ०७/०६/२०१६ | कृषी दर्शन/मुंबई |
| २. | श्री. डी.एम. साबळे सहाय्यक सरव्यवस्थापक | शेतमाल निर्यातीसाठी पीक संरक्षणातील दक्षता | १७/०७/२०१६ | कृषी दर्शन/फोन इन लाईव्ह/मुंबई |
| ३. | डॉ. किशोर तोष्णीवाल कार्यकारी संचालक | कृषि पणन कायद्यातील सुधारणा | २६/०१/२०१७ | कृषी दर्शन/फोन इन लाईव्ह/मुंबई |
| ४. | डॉ. भास्कर पाटील सहायक सरव्यवस्थापक | उत्पादक ते ग्राहक | १५/०३/२०१७ | आमची माती आमची माणस/मुंबई |

## १०. ग्रंथालय :

कृषि पणन मंडळातील अधिकारी / कर्मचारी तसेच पणन मंडळाशी संबंधित सर्व संस्था, तज्ञ, शास्त्रज्ञ, विस्तार कार्यकर्ते, पदाधिकारी यांना कृषी, पणन, आयात, निर्यात,तंत्रज्ञान, नवीन संशोधन इ. बाबतची नवनवीन माहिती / संशोधन/ जागतिक घडामोडी समजाव्यात, त्याचा तपशिल प्राप्त व्हावा यासाठी ग्रंथालय सुरु करण्यात आले आहे. ग्रंथालयात विविध विषयांवरील पुस्तके, संशोधनपर मासिके, अहवाल, सी. डी., प्रकल्प अहवाल इ. उपलब्ध असून त्यांचा वापर मोठ्या प्रमाणात होत आहे.

तसेच दरवर्षी विविध विषयांवरील पुस्तके ग्रंथालयात येत असून कृषि पणन, निर्यात इ. विषयांवरील राष्ट्रीय आणि आतंरराष्ट्रीय स्तरावरुन प्रसिध्द होणारी मासिके, त्रैमासिके, नियतकालिके ग्रंथालयात येतात.

**ग्रंथालयातील पुस्तकांची सद्दस्थिती**

एकूण पुस्तके – ३,९२०
मासिके – मराठी – १० इंग्रजी – २

ग्रंथालय नवनवीन पुस्तकांची खरेदी करुन अधिकाधिक माहितीपूर्ण आणि आधुनिक करण्याचा सातत्याने प्रयत्न करण्यात येत आहे. तसेच विविध विषयांवरील वृत्तपत्रांमध्ये / मासिकांमध्ये प्रसिध्द झालेल्या लेखांचे विषयावार संकलन ग्रंथालयात करण्यात येते. इंटरनेटवरुनही विविध विषयांवरील माहिती आवश्यकतेनुसार

पणन मंडळातील अधिका-यांना उपलब्ध करुन देण्यात येते. ग्रंथालय विभागामार्फत मराठा चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज अॅन्ड अॅग्रीकल्चर इ. विविध संस्थांचे सभासदत्व प्राप्त करुन घेण्यात आले आहे. ग्रंथालयात दररोज ११ दैनिके येत असून या दैनिकांमधून विविध विषयांवरील कात्रण काढून त्यांचेही विषयावर संकलन करण्यात येते. तसेच सदर कात्रणांच्या प्रती व्हॉटस अॅप तसेच ई-मेल व्दारे संबंधितांना पाठविण्यात येतात. यामुळे कृषी पणन विषयक वृत्तपत्रांमधून आलेल्या बातम्यांची माहिती वरिष्ठांना होण्यास तसेच उपस्थित बाबींवर आवश्यक कार्यवाही करण्यास मदत होत आहे.

# प) कृषि व्यापार विकास विभाग

पणन व्यवस्थेत शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने योग्य तो बदल घडवून आणण्यासाठी, शेतकऱ्यांना जास्तीत जास्त आर्थिक मोबदला मिळवून देण्यासाठी नविन पर्याय निर्माण करणे, पणन व्यवस्थेत अनेक पर्याय निर्माण करणे हे मुख्य उद्दिष्ट ठेवून राज्यातील कृषि मालाच्या विक्री व्यवस्थेतील मध्यस्थांची संख्या कमी करुन शेतकऱ्यांना त्यांच्या कृषिमालाला चांगला भाव मिळावा व चांगल्या प्रतीचा कृषि माल किफायतशीर दरामध्ये ग्राहकांना उपलब्ध व्हावा तसेच राज्यातील कृषि मालासाठी देशांतर्गत नवनवीन बाजारपेठा उपलब्ध होण्याच्या दृष्टीने कृषि व्यापार विकास विभाग कामकाज करत आहे. त्याच बरोबर राज्यातील कृषि मालासाठी परराज्यातील बाजारपेठा उपलब्ध होण्यासाठी तसेच परराज्यातील कृषि माल शेतकरी उत्पादक कंपनीच्या माध्यमातून राज्यातील ग्राहकांना रास्त दरात उपलब्ध करुन देणेकरीता तसेच शेतकऱ्यांमध्ये बाजारपेठेच्या बदलत्या परिस्थितीनुसार आवश्यक तो बदल घडविणे, त्यांना प्रशिक्षण देणे, बाजारपेठेतील बदलत्या घडामोडींची माहिती शेतकऱ्यांपर्यंत पोहचविणे इ. बाबत कृषि व्यापार विकास विभाग प्रयत्नशिल आहे.

**१. उत्पादक ते ग्राहक थेट विक्री योजना**

कृषि मालाच्या विक्री व्यवस्थेतील मध्यस्थांची साखळी वगळून उत्पादकांना थेट ग्राहकाला दर्जेदार मालाची किफायतशीर दरांमध्ये विक्री करता यावी यासाठी कृषि पणन मंडळामार्फत उत्पादक ते ग्राहक थेट विक्रीचा अभिनव उपक्रम राबविण्यात येतो. या उपक्रमाअंतर्गत चालू आर्थिक वर्षात उत्पादक ते ग्राहक थेट विक्री योजनेअंतर्गत आंबा व संत्रा महोत्सवांचे आयोजन करण्यात आले होते.

**आंबा महोत्सव**

पणन मंडळामार्फत दरवर्षी आंबा महोत्सवाचे आयोजन केले जाते. दि.०७/०४/२०१६ रोजी मनोरा गेस्ट हाऊस, मुंबई येथे मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या शुभ हस्ते आंबा बाजाराचे उद्‌घाटन करण्यात आले. तसेच दि.१५/०४/२०१६ रोजी पणन मंडळाचे मुख्यालयासमोरील आयोजीत आंबा महोत्सवाचे उद्‌घाटन मा. मंत्री, सहकार, पणन व वस्त्रोद्योग व सार्वजनीक बांधकाम तथा मा. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे यांच्या शुभहस्ते करण्यात आले.

सन २०१६ मध्ये पणन मंडळामार्फत मुख्यालयाच्या रस्त्यावर आंबा महोत्सवासाठी ४५ स्टॉल उभारण्यात आले आहेत. साधारणपणे ६० ते ६५ आंबा उत्पादक शेतकऱ्यांनी आंबा महोत्सवात सहभाग घेतला होता.सदर योजनेस ग्राहकांचा चांगला प्रतिसाद मिळत असून ग्राहकांना उत्तम प्रतिचा नैसर्गिकरित्या पिकविलेला आंबा रास्त दरात उपलब्ध होत आहे. यामुळे शेतकऱ्यांबरोबर ग्राहकांचाही फायदा होत आहे. कृषि पणन मंडळामार्फत पुणे येथे बालगंधर्व रंगमंदिर व येरवडा मध्यवर्ती कारागृह येथे आंबा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असून कराड, इस्लामपूर, सोलापूर इ. शहरात आंबा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते.

**संत्रा महोत्सव**

राज्यातील संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना संत्र्याची थेट ग्राहकांना विक्री करता यावी तसेच ग्राहक अदा करीत असलेल्या रक्कमेतील जास्तीत जास्त वाटा शेतकऱ्याला प्राप्त व्हावा आणि उत्पादक आणि ग्राहक यांच्यामध्ये थेट खरेदी विक्री व्हावी तसेच ग्राहकांमध्येही संत्रा फळाची आवड निर्माण व्हावी या दृष्टीकोनातून कृषि पणन मंडळामार्फत संत्रा महोत्सवाचे आयोजन करण्यात येत आहे.

सन २०१६-१७ मध्ये उत्पादक ते ग्राहक विक्री उपक्रमा अंतर्गत कृषि पणन मंडळाने आपुलकी सामाजिक संस्था आणि ट्रान्सस्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने मार्च २०१७ मध्ये दि.२३ ते ३० मार्च २०१७ या आठ दिवसांच्या कालावधीसाठी संत्रा महोत्सवाचे आयोजन बालगंधर्व रंगमंदिर, पुणे शेजारील मोकळी जागा येथे केले होते. संत्रा महोत्सवाचे उद्घाटन पुण्याच्या प्रथम नागरीक आणि महापौर सौ.मुक्ताताई शैलेश टिळक यांचे हस्ते करण्यात आले. कृषि पणन मंडळ, पुणे आपुलकी सामाजिक संस्था आणि ट्रान्सकूल ॲग्रो मॉल यांच्या संयुक्त विद्यमाने बालगंधर्व रंगमंदिर, पुणे येथे आयोजित संत्रा महोत्सवात सी.ए.आय.एम. प्रकल्प अमरावती, महाऑरेंज, महाराष्ट्र राज्य संत्रा उत्पादक संघ, महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषि विकास प्रकल्प यांच्या माध्यमातून शेतकरी उपलब्ध झाले होते. सदर उपक्रमाअंतर्गत अंदाजे २४०० मे. टन संत्र्याची विक्री करण्यात आली. त्यामुळे संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना मुबलक आर्थिक फायदा झालेला आहे.

**२. फळ महोत्सव अनुदान योजना**

कृषि मालाच्या विक्री व्यवस्थेतील मध्यस्थांची साखळी वगळून उत्पादकांना थेट ग्राहकाला दर्जेदार मालाची किफायतशीर दरांमध्ये विक्री करता यावी यासाठी कृषि पणन मंडळामार्फत उत्पादक ते ग्राहक थेट विक्रीचा अभिनव उपक्रम राबविण्यात येतो. उत्पादक ते ग्राहक थेट विक्री योजना राज्यातील जास्तीत जास्त ठिकाणी राबविली जावी यासाठी राज्यातील सहकारी संस्था / सहकारी संघ / बाजार समित्या / बचत गट यांना फळ महोत्सव आयोजनासाठी कृषि पणन मंडळामार्फत अनुदान देण्यात येते. सदर योजनेत अंशत: बदल करण्यात आलेला असून महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाच्या उत्पादक ते ग्राहक थेट विक्री योजनेअंतर्गत फळ व धान्य महोत्सव हे राज्यातील कृषि उत्पन्न बाजार समित्या, कृषी व पणनशी संबधित असलेल्या सहकारी संस्था, शासनाचे विभाग व संस्था व शेतकरी उत्पादक कंपन्या यांच्यामार्फत खालील अटी व शर्तीस अधीन राहुन आयोजीत करण्यास व अशा संस्थांनाच अनुदान देण्याबाबत मा. संचालक मंडळाने निर्णय घेतलेला आहे.

लाभार्थी - राज्यातील कृषि उत्पन्न बाजार समित्या, कृषी व पणनशी संबधित असलेल्या सहकारी संस्था, शासनाचे विभाग व संस्था व शेतकरी उत्पादक कंपन्या.

**नियम व अटी —**

१. महोत्सवाचा कालावधी हा किमान ५ (पाच) दिवसांचा असावा.
२. महोत्सवास प्रतिस्टॉल रु.२,०००/- याप्रमाणे अर्थसहाय्य देय राहील.
३. महोत्सवामध्ये किमान १० व कमाल ५० स्टॉलसाठी अर्थसहाय्य देय राहील.
४. महोत्सवाच्या प्रचार व प्रसिध्दीमध्ये उदा., बॅनर्स, जाहिरात, बातम्या, बॅकड्रॉप, हॅण्ड बिल्स, इ. मध्ये कृषि पणन मंडळाचा सहप्रायोजक म्हणून नामोल्लेख करणे आयोजक संस्थेवर बंधनकारक राहील.
५. कृषि पणन मंडळास महोत्सवामध्ये सहभाग घ्यावयाचा झाल्यास त्यासाठी आवश्यक स्टॉलची मोफत उपलब्धता करुन देणे आयोजकांवर बंधनकारक राहील.
६. आयोजक संस्थेला सभासदांना 'कृषि पणन मित्र' मासिकाचे वर्गणीदार करावे लागेल.
७. महोत्सव आयोजनापूर्वी कृषि पणन मंडळाची पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक राहील.
८. महोत्सवाचा अहवाल आणि काही निवडक फोटो आमच्या मासिकामध्ये प्रकाशित करण्यासाठी पणन मंडळाकडे सादर करावेत.
९. महोत्सवातील कृषि मालाची प्रत, दर व इतर अनुषंगिक व कायदेशीर बाबींसाठी कृषि पणन मंडळ जबाबदार राहणार नाही, तथापी चांगल्या गुणवत्तेचाच माल विकणे शेतकरी, शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपनी यांचेवर बंधनकारक राहील, याची खातरजमा करण्याची जबाबदारी आयोजकावर राहील.
१०. महोत्सव अनुदानासाठीचा प्रस्ताव अपूर्ण असल्यास व अटी, शर्तींची पूर्तता न केल्यास अनुदान देय होणार नाही.

११. महोत्सव हा फक्त उत्पादकांकरिता असल्याने त्यामध्ये व्यापाऱ्यांना सहभागी होता येणार नाही किंवा मार्केटमधुन आणून मालाची विक्री करता येणार नाही, असे आढळून आल्यास आयोजकांना अनुदानासाठी अपात्र ठरविले जाईल.
१२. महोत्सवाकरिता इतर कोणत्याही शासकिय योजनेअंतर्गत अनुदान घेतल्यास या योजनेअंतर्गत अनुदान देय होणार नाही.
१३. उपरोक्त नमूद केलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचे हमीपत्र रु.१००/- च्या स्टँप पेपरवर लिहून देणे बंधनकारक आहे.

**३. शहरी भागासाठी थेट शेतमाल विक्री योजना**

शहरी भागासाठी थेट भाजीपाला पुरवठा योजनेचा लाभ जास्तीत जास्त शेतक-यांनी घेवून, भाजीपाला विक्रीमधील मध्यस्थांची संख्या कमी करण्याचा प्रयत्न करुन, ग्राहकांना ताजा ,योग्य वजनाचा, स्वच्छ भाजीपाला वाजवी दरात उपलब्ध करुन द्यावा. तसेच भाजीपाल्याच्या दरामध्ये होणा-या अवाजवी भाव वाढीवर नियंत्रण ठेवावे हाच या योजनेचा मुख्य उद्देश आहे.

राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत शहरी भागातील भाजीपाला पुरवठा प्रकल्पाअंतर्गत भाजीपाला उत्पादन, काढणीपश्चात व्यवस्थापन व विक्री व्यवस्थापन घटकांची जोड या योजनेस दिली असून, या योजनेतील विक्री व्यवस्थापन घटक राबविणेसाठी महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाकडे देण्यात आला आहे. सदर विक्री व्यवस्थापन घटकांतर्गत खालिल बाबींचा समावेश आहे;

१. संकलन व प्रतवारी केंद्र उभारणी .
२. वातावरण नियंत्रीत किरकोळ भाजीपाला विक्री केंद्र उभारणी.
३. मोटराईज्ड व्हेंडिंग कार्ट.
४. स्थायी / फिरते विक्री केंद्र उभारणी.

शहरी भागात भाजीपाला पुरवठा प्रकल्प ही योजना मुंबई, पुणे व नागपूर या तीन शहरासाठीच लागू असून, सदर तीन शहरांना भाजीपाला पुरवठा करणारे जिल्हे जोडून दिले आहेत. शहरी भागात भाजीपाला पुरवठा योजना ही पुणे व नागपूर या तीन शहरासाठी लागू असून, सदर तीन शहरांना भाजीपाला पुरवठा करणारे जिल्हे खालील प्रमाणे आहेत ;

१. पुणे शहर - पुणे, सातारा, सांगली , अहमदनगर व सोलापूर .
२. मुंबई शहर - पुणे, नाशिक, ठाणे, रायगड, अहमदनगर.
३. नागपुर शहर – नागपूर, वर्धा, यवतमाळ, गोंदिया, भंडारा, गडचिरोली, अमरावती, चंद्रपूर.

प्राप्त निधीतून मुंबई, पुणे व नागपूर शहरांसाठी विक्री व्यवस्थापन घटकातील ४ बाबींवर अनुदानासाठी खर्च करण्यात आलेला असून, प्राप्त निधीपैकी पुणे शहरासाठी प्राप्त झालेला रू.३३१.०० लाख निधी हा पूर्णपणे खर्च झालेला आहे. वित्त व लेखा विभागाकडील लेख्यांनुसार नागपूर शहरासाठी प्राप्त झालेल्या निधीपैकी रक्कम रू.२०.७६ लाख निधी शिल्लक असून मुंबई शहरासाठी प्राप्त निधीपैकी रू.४६.७८ लाख निधी शिल्लक आहे.

**४. शेतकरी आठवडे बाजार**

ग्राहकांना शेतमालाची थेट विक्री करण्यासाठी कृषि पणन मंडळ विविध उपक्रम राबवित आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्र शासनानेही महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ मध्ये सुधारणा करून खाजगी बाजार, थेट पणन, शेतकरी ग्राहक बाजार, एक परवाना पद्धत, कराराची शेती, टर्मिनल मार्केट इ. पर्याय शेतकऱ्यास कृषि माल विक्रीसाठी उपलब्ध करून दिलेले आहेत. यामध्ये शेतकऱ्यास शेतीमाल

विक्रीसाठी पर्याय मिळणेबरोबरच कृषिमाल विक्रीमध्ये पारदर्शकता, मध्यस्थांची संख्या कमी करणे, शेतमाल विक्री खर्च कमी करणे हे उद्देशही आहेत. मात्र या सर्वच ठिकाणी थेट ग्राहकांना शेतमाल विक्रीची सुविधा नाही. तसेच सद्यस्थितीतील बाजार यंत्रणेमध्ये शेतमाल विविध घटकांकडे जात असतांना सदर शेतमालाची जबाबदारी कोणीही घेत नाही, शेतमालाचे नुकसान झाल्यास तोटा किंवा नुकसानीची जबाबदारी शेतकऱ्यांवर टाकली जाते, मध्यस्थांच्या मोठ्या साखळीमुळे तसेच बाजार घटकांच्या वेगवेगळ्या कामांमुळे, जसे हमाली, तोलाई, भराई, गाडी भाडे इ. आकारांमुळे किंमतीतील बराचसा वाटा विविध घटकांकडे जातो. बाजार समित्यांमध्ये शेतमालाचे दर ठरविणे आणि वजन याबाबत पूरेशी पारदर्शकता नसणे, तसेच बाजार आवारांमध्ये पूरेशी स्वच्छता नसल्यामुळे कृषि मालाच्या विक्री व्यवस्थेमध्ये बऱ्याचशा त्रुटी दिसून येतात.
राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत "शहरी भागासाठी भाजीपाला पुरवठा" ही योजना कृषि पणन मंडळ मुंबई, पुणे आणि नागपूर या शहरांमध्ये राबवित होती. सदर योजने अंतर्गत शेतकऱ्यांना ९१ संकलन व प्रतवारी केंद्र, ४७ वातावरण नियंत्रित केंद्र, १५० स्थाई/फिरते विक्री केंद्र आणि १८७ मोटराईज्ड व्हेंडींग कार्ट यांना अनुदान वितरीत करण्यात आलेले आहे. सदर योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना स्थाई/फिरते विक्री केंद्र तसेच वातावरण नियंत्रित केंद्र यांचेमार्फत ग्राहकांना थेट भाजीपाल्याच्या विक्रीसाठी प्रयत्न करण्यात येत होते. सदर केंद्रांमधून शेतकरी, शेतकरी गट आणि शेतकऱ्यांच्या उत्पादक कंपन्या यांच्यामार्फत भाजीपाला विक्रीसाठी मर्यादा येत होत्या. सहकारी गृहरचना संस्थांच्या आवारात भाजीपाला विक्री सुरू करण्यात आली. तथापि, येथेही या ना त्या कारणाने व्यवस्था काही प्रमाणात बंद होत आहेत, तर काही ठिकाणी वाव असूनही शेतकऱ्यांना संधी मिळत नाही. तसेच ग्राहकांनाही उपलब्ध किरकोळ विक्रेते / फेरीवाले यांचेवर भाजीपाला खरेदीसाठी अवलंबून रहावे लागते. अशा परिस्थितीत शेतकरी, शेतकरी गट आणि शेतकऱ्यांच्या उत्पादक कंपन्या यांचेकडून भाजीपाला थेट ग्राहकांना विक्रीसाठी वेगळे पर्याय उपलब्ध करून देणेबाबत सातत्याने मागणी होत होती. सदर बाबीचा विचार करून कृषि पणन मंडळाने शेतकरी आठवडे बाजार ही संकल्पना पुणे येथे शहरात राबविण्याचा निर्णय घेतला आणि दि.२९ जून २०१४ रोजी गांधी भवन, कोथरूड येथे राज्यातील पहिला शेतकरी आठवडे बाजार सुरू केला.

कृषि पणन मंडळाने सुरु केलेल्या शेतकरी आठवडे बाजारांना शेतकऱ्यांकडून मिळणारा प्रतिसाद लक्षात घेवून शेतकरी आठवडे बाजारांना कायदेशीर संरक्षण देणे तसेच त्यांच्या आयोजनासाठी नियमावली निश्चित करण्यासाठी राज्यामध्ये "संत शिरोमणी श्री सावता माळी शेतकरी आठवडे बाजार अभियान" राबविण्याचा शासनाने निर्णय घेतलेला असून या अभियानासाठी महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे यांची समन्वय संस्था (Nodal Agency) म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. या संदर्भात शासनाने दि.१२ ऑगस्ट २०१६ रोजी शासन निर्णय क्र.:कृपमं/प्र.क्र.११९/२१ स अन्वये शेतकरी आठवडे बाजारासाठीची नियमावली तयार केली आहे. तसेच महानगरपालिका / नगरपालिका यांनी त्यांच्या कार्यालयाच्या आवारात त्यांच्या भाजीमंडईत तसेच नगरपालिका क्षेत्रात शेतकरी आठवडे बाजारास जागा उपलब्ध करुन देणेबाबत नगर विकास विभागाने शासन परिपत्रक क्र. संकिर्ण-२०१६/प्र.क्र.३५३/नवि-२०, दि.२४ ऑगस्ट २०१६ रोजी प्रसिध्द केले आहे.

कृषि पणन मंडळाने शेतकरी आठवडे बाजार ही संकल्पना राबविण्यास सुरवात केलेली असून मुंबई शहरामध्ये संत शिरोमणी श्री सावता माळी शेतकरी आठवडे बाजाराचे उद्घाटन रविवार, दि.१४ ऑगस्ट २०१६ रोजी विधान भवनाच्या पार्कींग क्र. ४ मध्ये मा. ना. श्री. देवेंद्रजी फडणवीस, मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या शुभहस्ते करण्यात आले. शेतकरी बाजाराच्या संकल्पनेस मूर्त स्वरुपात आणण्यासाठी शेतकरी आठवडे बाजारासाठी कृषि पणन मंडळास विनामूल्य जागा उपलब्ध करुन देणेकरीता राज्यातील सर्व महानगरपालिकांना / नगरपालिका / कृषि विभाग तसेच शासनाचे विविध विभाग यांना प्रस्ताव सादर करण्यात आले आहेत व त्या संदर्भातून जागा ताब्यात घेणेबाबतचा पाठपुरावा करण्यात येत आहे.

जागा उपलब्ध झाल्यानंतर शेतकरी आठवडे बाजार सुरु करणेसंदर्भात महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाकडून खालील प्रमाणे कार्यवाही करण्यात येते ;

१. शेतकरी आठवडे बाजाराचे आयोजक निवडणे.
२. शेतकरी आठवडे बाजारात विक्रीसाठी येणारे शेतकरी / शेतकरी गट / शेतकरी उत्पादक कंपन्यांची यादी प्रमाणीत करणे.
३. शेतकरी आठवडे बाजार चालू करण्यासाठी आवश्यक त्या यंत्रणांची परवानगी घेणे.
४. शेतकऱ्यांना ओळखपत्र देणे.
५. आयोजक व स्थानिक संस्थांशी समन्वय ठेवणे
६. बाजाराच्या ठिकाणी तात्पुरते शेड, स्टॉल उभारणे.
७. शेतकरी आठवडे बाजाराच्या जागेची स्वच्छता राखणे.

सध्या १२२ शेतकरी आठवडे बाजार राज्यात कार्यरत आहेत त्याचा गोषवारा पुढीलप्रमाणे -

| अ.क्र. | विभाग | शहर | बाजारांची संख्या |
|---|---|---|---|
| १. | पुणे | पुणे | ५३ |
| | | सोलापूर | ४ |
| | | **पुणे एकूण** | **५७** |
| २. | मुंबई | मुंबई | ३० |
| | | नवी मुंबई | ७ |
| | | ठाणे | १३ |
| | | **मुंबई एकूण** | **५०** |
| ३. | कोल्हापूर | कोल्हापूर | ५ |
| ४. | नागपूर | नागपूर | ५ |
| ५. | औरंगाबाद | औरंगाबाद | ४ |
| ६. | नाशिक | नाशिक | १ |
| **एकूण** | | | **१२२** |

शेतकरी आठवडे बाजारासंदर्भात शेतकरी / शेतकरी गट / शेतकरी उत्पादक कंपनी यांच्यामध्ये जनजागृती करण्यासाठी जिल्हानिहाय बैठका आयोजीत करुन शेतकऱ्यांमध्ये बाजारपेठेच्या बदलत्या परिस्थितीनुसार आवश्यक तो बदल घडविणे, त्यांना प्रशिक्षण देणे, बाजारपेठेतील बदलत्या घडामोडींची माहीती शेतकऱ्यांपर्यंत पोहचविणे इ. कामे करण्याचे नियोजन आहे. राज्यातील १२२ शेतकरी आठवडे बाजारातील आठवड्यातील शेतमालाची एकूण विक्री अंदाजे १५०० मे. टन होत असून एकूण उलाढाल रु.५.०० ते ६.०० कोटी प्रती आठवडा होत आहे.

**शेतकरी बाजार संकल्पना :**

- शेतकरी तसेच ग्रामिण महिला बचत गट यांनी उत्पादित केलेल्या मालाला थेट बाजार पेठ उपलब्ध करून देणे.
- सर्व प्रकारचा भाजीपाला एकाच ठिकाणी ग्राहकांना उपलब्ध करून देणे.
- शेतकरी, शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपनी आणि उत्पादक सहकारी संस्था यांचा शेतमाल त्यांनी पुरस्कृत केलेल्या गटांमार्फत/ प्रतिनिधींमार्फत विक्री करणे.
- मध्यस्थ नसल्यामुळे ग्राहक अदा करीत असलेली रक्कम थेट शेतकऱ्यांस उपलब्ध.
- मालाची हाताळणी कमी होत असल्याकारणाने सुगीपश्चात नुकसान कमी तसेच मालाचा दर्जा उत्तम राहतो.

- शेतकरी आठवडे बाजाराची वेळ व ठिकाण निश्चित असल्याकारणाने शेतमाल काढणीचे आणि विक्रीचे नियोजन करणे शेतकऱ्यांना शक्य.
- इलेक्ट्रॉनिक वजन काट्यामार्फत शेतमालाचे वजन. त्यामुळे ग्राहकांमध्ये वजनाबाबत विश्वास निर्माण करणे.
- बाजार पेठेचा अंदाज येत असल्याने बाजारात आणावयाच्या मालाबाबत नियोजन करणे शक्य.
- शंभर टक्के रोखीने व्यवहार.
- कोणत्याही प्रकारच्या परवान्यांची आवश्यकता नाही.
- ग्रामिण भागातील युवकांना चांगल्या अर्थार्जनाचा रोजगार उपलब्ध .
- वाजवी भावामध्ये ग्राहकांना भाजीपाला उपलब्ध.

**शेतकरी बाजाराचे फायदे :**

**शेतकरी -**

- शेतकरी, शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपन्या आणि उत्पादक सहकारी संस्था यांचेमार्फत थेट ग्राहकांना शेतमाल विक्रीची संधी.
- कृषि माल शेतातून थेट बाजारात येत असल्याने काढणी नंतरच्या होणाऱ्या नुकसानीत मोठी घट.
- रोख स्वरूपात १०० टक्के मालाची रक्कम थेट शेतकऱ्याच्या हातात .
- आपल्या मालाचा बाजार भाव ठरविण्याचा शेतकऱ्याला अधिकार .
- अत्यंत कमी शेतमाल विक्री खर्च.
- ग्राहक आणि शेतकरी यांच्यामध्ये सामंजस्य निर्माण होते.
- ग्राहकांच्या मागणीनुसार मालाचा पुरवठा.
- थेट विक्रीमुळे मध्यस्थांना मिळणारी रक्कम थेट शेतकऱ्याला प्राप्त .
- बाजारात विक्री होणाऱ्या मालाचा अंदाज आल्याने भाजीपाला शिल्लक रहात नाही.

**ग्राहक -**

- ताजा स्वच्छ शेतमाल थेट शेतकऱ्यांकडून उपलब्ध.
- शेतकरी विक्री करीत असल्याकारणाने मालाच्या प्रती बाबत खात्री.
- थेट शेतकऱ्यांशी संवाद होत असल्याकारणाने ग्राहक आपली गरज शेतकऱ्याला सांगू शकतात.
- थेट शेतकऱ्यांकडून शेतमाल खरेदीचे ग्राहकांना समाधान.
- घराजवळ भाजीपाला बाजार पेठ उपलब्ध.
- भाजीपाला खरेदीचे आठवड्याचे नियोजन करता येते.
- एकाच छताखाली भाजीपाला, फळे, प्रक्रिया उत्पादने, ग्रामिण उत्पादने ग्राहकांना उपलब्ध.
- शेतमालाचे वजन इलेक्ट्रॉनिक वजन काट्यामार्फत होत असल्याने ग्राहकांना वजनाबाबत विश्वास

**शेतकरी आठवडे बाजार कामकाज वाटप :**

संत शिरोमणी श्री सावता माळी शेतकरी आठवडे बाजार अभियान हे संपूर्ण राज्यामध्ये राबवावयाचे असून याकरीता शासनाचे विविध विभाग, नगरपालिका, महानगरपालिका, जिल्हा परिषदा विविध संस्था/विभाग यांचेमार्फत जागा उपलब्ध करून देण्याची जबाबदारी कृषि पणन मंडळाची असून शेतकरी आठवडे बाजार अभियान राबविण्यासाठी जिल्हा कृषि पणन अधिकारी तसेच विभागीय कार्यालय यांचेकडे कामकाजाचे वाटप हे खालील प्रमाणे असेल. जिल्हा कृषि पणन अधिकारी व विभागीय उपसरव्यवस्थापक, तसेच शेतकरी गट/शेतकरी उत्पादक कंपनी, शेतकरी उत्पादक सहकारी संस्था, ग्राहक सहकारी संस्था, कृषि पणन सहकारी संस्था (शेतकरी बाजाराचे आयोजक) तसेच शेतकरी बाजारात विक्री करणारे घटक यांचेवर विविध प्रकारच्या जबाबदाऱ्या खालील प्रमाणे सोपविण्यात येत आहे.

**जिल्हा कृषि पणन अधिकारी**

- राज्यातील शहरी भागातील नगरपालिका/महानगरपालिका/शासनाचे वेगवेगळे विभाग यांचेकडे रितसर अर्ज दाखल करून शेतकरी आठवडे बाजारासाठी नियमानुसार कृषि पणन मंडळास जागा उपलब्ध करून घेणे.
- शेतकरी आठवडे बाजारासाठी नगरपालिका/महानगरपालिका, शासनाचे विविध विभाग/संस्था जिल्हा अधिकारी, गृह विभाग अग्निशामक यंत्रणा, वाहतूक विभाग यांचेकडून मागणीनुसार व नियमानुसार आवश्यक परवानग्या घेणे.
- शेतकरी आठवडे बाजाराच्या ठिकाणी आवश्यक टेन्ट, इलेक्ट्रीक वजनकाटे, टेबल जागेची स्वच्छता व व्यवस्था ठेवण्यासाठी स्थानिक संस्थेशी समन्वय ठेवणे, आवश्यक तात्पुरत्या सुविधा उपलब्ध करून देणे.
- आयोजक आणि स्थानिक संस्था/शासनाचे विभाग यांच्यात आणि कृषि पणन मंडळामध्ये समन्वय ठेवण्याची जबाबदारी पार पाडणे.
- आठवड्याच्या ठरलेल्या वारी आणि ठरलेल्या वेळी शेतकरी आठवडे बाजार भरेल या दृष्टीने नियोजन करणे.
- शेतकरी आठवडे बाजारामध्ये फक्त शेतकरी, शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपनी, शेतकरी उत्पादक सहकारी संस्था, ग्राहक संस्था यांच्या सभासदांचा माल थेट विक्री करण्याचे नियंत्रण ठेवणे.
- शेतकरी आठवडे बाजारात सहभागी शेतकरी गट हे कृषि विभागाच्या प्रकल्प संचालक आत्मा यांच्या कार्यालयाकडे नोंदणी केलेला असावा. पणन विभागाअंतर्गत राबविण्यात येणाऱ्या (१) महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषि विकास प्रकल्प, (२) समन्वयीत कृषि विकास प्रकल्प, (३) कृषि व्यापार विषयक पायाभुत सुविधा विकास गुंतवणूक कार्यक्रम, (४) गरिबी निर्मूलनासाठी जपानचा निधी सहाय्यत महाराष्ट्रातील लहान शेतकऱ्यांना बाजार घटकांशी जोड़ण्याचा प्रकल्प या ४ बाह्य सहाय्यत प्रकल्पांतर्गत निर्माण करण्यात आलेले शेतकरी गट अथवा शेतकरी उत्पादक कंपन्यांनी शेतकरी आठवडे बाजारामध्ये विक्रीसाठी स्टॉल लावण्यास प्राधान्य देण्यात यावे. यांना शक्य नसल्यास इतर नोंदणीकृत शेतकरी गट अथवा शेतकरी उत्पादक कंपन्यांना शेतकरी आठवडे बाजारात स्टॉल लावण्यासाठी मान्यता द्यावी.
- शेतकरी आठवडे बाजारात फळे व भाजीपाला विक्रीसाठी येणा-या शेतक-यांचे प्रशिक्षण आत्मा आणि महाराष्ट्र स्पर्धात्मक कृषी विकास प्रकल्प यांच्या सहाय्याने आयोजित करणे शेतकरी आठवडे बाजार आयोजक म्हणून आवश्यक कागदपत्रानुसार प्रस्ताव संबधितांकडून प्राप्त करून घेणे ते शिफारशीसह सादर करणे.
- शेतकरी उत्पादक कंपन्या, शेतकरी तसेच कृषी विभागाच्या प्रकल्प संचालक (आत्मा) यांच्याकडील नोंदणीधारक शेतकरी गटांना शेतमाल विक्रीसाठी परवानगी देणे. यासाठी आवश्यक कर्ज व कागदपत्रे प्राप्त करून घेणे.
- शेतकरी आठवडे बाजारात उत्कृष्ठ दर्जाचा माल विक्रीसाठी न आणल्यास विक्रिसाठी शेतकरी, गट, कंपनी यांना दिलेली परवानगी रद्द करणे.
- आयोजकामार्फत प्रत्येक आठवड्याच्या बाजारांची माहिती मुख्यालयास पाठविणे.

**विभागिय कार्यालय**

- शेतकरी आठवडे बाजारासाठी विविध जागा निश्चित करणे, त्यांच्या परवानग्या मिळविणे व जिल्हा कृषि पणन अधिकारी यांच्या मदतीने बाजार सुरू करणे.
- जिल्हा कृषि पणन अधिकाऱ्याकडून आयोजक म्हणून नेमणूक करावयाच्या प्रस्तावाची तपासणी करून आयोजकाची नेमणूक करणे आणि याबाबतची माहिती मुख्यालयास कळविणे.

- शेतकरी आठवडे बाजारासाठी समन्वयक अधिकारी नियुक्त करून शेतकरी बाजाराची आठवडे निहाय माहीती संकलित करून वेबसाईटवर प्रसिध्द करणे .
- शेतकरी आठवडे बाजारामध्ये आयोजनासाठी लागणाऱ्या खर्चाकरीता स्टॉलधारकाकडून घ्यावयाचे सेवाशुल्क आयोजकांना निश्चित करून देणे.
- शेतकरी आठवडे बाजारामध्ये सहभागी होणाऱ्या विक्रेत्यांना ओळख पत्र देणे.
- शेतकरी आठवडे बाजारामध्ये समावेश करावयाचे शेतकरी, शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपनी, शेतकरी उत्पादक सहकारी संस्था, ग्राहकांच्या सहकारी संस्था यांना विक्रीसाठी पूर्वपरवानगी देणे. त्यांचेकडून आवश्यक अर्ज आणि कागदपत्रे प्राप्त करून घेणे.
- शेतकरी आठवडे बाजाराच्या आयोजनासाठी आवश्यक सेवाशुल्क निश्चित करणे.
- प्रत्येक जिल्हयाच्या ठिकाणी किमान दोन शेतकरी आठवडे बाजार सुरू होतील यासाठी आवश्यक कार्यवाही करणे.
- शेतकरी, शेतकरी गट आणि शेतकरी उत्पादक कंपनी तसेच शेतकरी बाजारात विक्रीसाठी पात्र विक्रेते यांना ओळख पत्र देणे.

**आयोजक**

- शेतकरी आठवडे बाजारामध्ये फक्त शेतकरी, शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपन्या, शेतकरी उत्पादक सहकारी संस्था, ग्राहक सहकारी संस्था यांच्या सभासदांचा माल विक्री होत आहे अशा प्रकारचे नियंत्रण ठेवणे.
- शेतकरी आठवडे बाजाराच्या आयोजनासाठी लागणाऱ्या खर्चासाठी प्रत्येक स्टॉलधारकाकडून सेवाशुल्क प्राप्त करून घेणे.
- आयोजकांनी कोणाचा माल किती कालावधीसाठी विक्री करणार याबाबतचा शेतकरी, शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपनी, शेतकरी उत्पादक सहकारी संस्था यांच्या सभासदांच्या तपशीलासह तसेच संमत्तीसह ७/१२ च्या अद्ययावत उताऱ्यासह शेतकरी आठवडे बाजारामध्ये विक्रीसाठी परवानगी मिळण्याकरीता अर्जासोबत दाखल करणे.
- शेतकरी आठवडे बाजारात फक्त फळे आणि भाजीपालाच विक्री होईल याची दक्षता घेणे.
- फक्त शेतकरी, शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपनी, शेतकरी उत्पादक सहकारी संस्था, ग्राहक संस्था यांच्या सभासदांचा माल थेट ग्राहकांना विक्री करता येईल असे हमीपत्र अर्जासोबत आयोजक म्हणून नेमणूक करण्याच्या अर्जासोबत दाखल करणे. तसेच उत्कृष्ठ प्रकारचाच माल विक्री करण्यात येईल याबाबतचे हमीपत्र घेणे.
- शेतकरी, शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपनी, शेतकरी उत्पादक सहकारी संस्था, ग्राहक संस्था यांना शेतकरी आठवडे बाजारातील जागा समान तत्वावर वाटप करण्याची जबाबदारी आयोजकाची राहिल.
- विक्रीसाठी दिलेली जागा बदलण्याचे अधिकार आयोजकास असतील.
- जागेचे भाडे, टेबल, खुर्च्या, पिण्याचे पाणी, लाईट व्यवस्था, कचरा निर्मूलन, जागेची साफसफाई, अभ्यांगत पार्किंग नियोजन, सुरक्षा, प्रचार, प्रसिद्धी इ. खर्चासाठी स्टॉल धारकांकडून वाजवी रक्कमेचे सेवाशुल्क आकारण्याचे अधिकार आयोजकावर राहील.
- प्रत्येक आठवड्यात झालेल्या शेतकरी आठवडे बाजारांचा जमा खर्चाचा हिशेब ठेवणे आणि सदर हिशेब कृषि पणन मंडळास आठ दिवसाच्या आत सादर करणे. सहभागी विक्रेत्यांनी मागणी केल्यास सदर हिशेब उपलब्ध करून देणे.
- कोणत्याही परिस्थितीत खाजगी व्यापारी/किरकोळ विक्रेते शेतकरी आठवडेबाजारात विक्रीसाठी येणार नाही याची जबाबदरी आयोजकाची राहील.
- विक्रेते आणि ग्राहक यांच्यामध्ये सौहार्दपूर्ण संबंध प्रस्थापित करणे व ग्राहकांना त्रास होणार नाही तसेच ग्राहकांची फसवणूक होणार नाही याची काळजी घेणे.

- शेतकरी आठवडे बाजारातील विक्रेत्यांनी बाजार परिसरात धुम्रपान / मद्यपान करू नये तसेच ग्राहकांशी गैरवर्तन करू नये. याबाबतची तक्रार आल्यास त्यावर कार्यवाही करण्याची जबाबदारी आयोजकाची राहील. याबाबत कृषि पणन मंडळास माहिती देणे आयोजकावर बंधनकारक असेल.
- प्रत्येक शेतकरी, शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपनी, शेतकरी उत्पादक सहकारी संस्था यांनी स्टॉलवर आपला/संस्थेचा फ्लेक्स लावणे तसेच फ्लेक्सवर जबाबदार व्यक्ती आणि त्याचा मोबाईल नंबर नमूद करणे, त्याच बरोबर शेतमालाच्या बाजार भावाचा फलक स्टॉलमध्ये दर्शनी ठिकाणी लावणे बंधनकारक राहील.
- शेतकरी आठवडे बाजारामध्ये सहभागी शेतकरी, शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपनी, शेतकरी उत्पादक सहकारी संस्था यांची यादी त्यांच्या शेतमालाच्या विक्रीसह तसेच अंदाजित किंमतीसह महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाच्या वेबसाईटवर टाकण्यात येईल. सदर माहिती महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळास ईमेलद्वारे पुरविणे आयोजकांवर बंधनकारक असेल.
- शेतकरी आठवडे बाजारामध्ये महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाचा पत्ता, दूरध्वनी क्रमांक, ई-मेल, संपर्क अधिकाऱ्याचा भ्रमणध्वनी क्रमांक इ. तपशीलाचा फ्लेक्स लावणे आयोजकावर बंधनकारक असेल.
- शेतकरी उत्पादक कंपनी, शेतकरी उत्पादक सहकारी संस्था, ग्राहक सहकारी संस्था किंवा कृषि पणन सहकारी संस्था यांनी आपल्या संस्थेचे लेखापरिक्षण नियमितपणे करून घेणे आवश्यक आहे.
- कृषी पणन मंडळाच्या मदतीने शेतकरी आठवडे बाजाराची प्रचार व प्रसिध्दी करणे ही शेतकरी, शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपन्या, शेतकरी उत्पादक सहकारी संस्था यांची जबाबदारी राहील.

**विक्रेते**

- शेतमालासोबत येणारा काडी/कचरा/घाण अथवा शिल्लक माल शेतकरी बाजारातून परत नेण्याची जबाबदारी संबंधित शेतकरी, शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपनी, शेतकरी उत्पादक सहकारी संस्था यांची राहील. शेतमाल विक्रीनंतर कचरा शेतकरी आठवडे बाजारात टाकून गेल्याचे आढळल्यास दंड आकारण्याचे अथवा शेतमाल विक्रीसाठी देण्यात आलेली परवानगी रद्द करण्याचे अधिकार आयोजकास राहतील.
- शेतकरी बाजारा संदर्भातील सूचना/अडचणी/शिफारशी/तक्रारी आयोजकांना सादर करणे, तसेच याबाबत आवश्यकतेनुसार कृषी पणन मंडळाशी संपर्क साधणे.
- शेतकरी, शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपनी, शेतकरी उत्पादक सहकारी संस्था यांनी शेतमाल विक्रीचे व्यवहार रोखीने करणे बंधनकारक राहील. उधारीने व्यवहार केल्यास आणि नंतर रक्कमेची वसूली न झाल्यास त्यास आयोजक अथवा महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ जबाबदार राहणार नाही.
- विक्री अभावी शिल्लक राहिलेल्या शेतमालाची जबाबदारी ही संबंधित शेतकरी, शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपनी, शेतकरी उत्पादक सहकारी संस्था यांची राहील. आयोजक अथवा महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ शिल्लक मालास जबाबदार नसतील .
- शेतकरी आठवडे बाजारामध्ये शेतमालाचे वजन करण्यासाठी इलेक्टॉनिक वजनकाट्याचा वापर करणे, शेतमाल विक्रीसाठी टेबलावर ठेवणे, टेन्टचा वापर करणे बंधनकारक आहे.
- शेतकरी आठवडे बाजारात उत्कृष्ठ दर्जाचा माल विक्रिसाठी आणणे, अतिपक्व, कच्चा, रोगग्रस्त, सडलेला, फुटलेला (ग्राहक खरेदी करू शकणार नाही असा माल) असा शेतमाल विक्रिसाठी आणु नये. असा शेतमाल विक्रिसाठी आणल्यास सदर मालाची विक्री थांबविण्यात येईल तसेच सबंधितांची शेतकरी आठवडे बाजाराची परवानगी रद्द करण्यात येईल.

**शेतकरी बाजारासंदर्भात शेतकऱ्यांचे प्रशिक्षण :**
शेतकरी बाजारात येणाऱ्या शेतकऱ्यांना बाजार चालविण्याचे तसेच बाजारात येणाऱ्या ग्राहकांबरोबर कसे वागावे, सलोख्याचे संबंध कसे प्रस्थापित करावेत, शेतमालाची विक्री कशी करावी, शेतमालाची माहिती कशी द्यावी, वजनाची हमी, भावाबाबत माहिती देणेकरीता तसेच संपुर्ण बाजाराच्या आयोजनाबाबत प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. यासाठी कृषि पणन मंडळात प्रशिक्षण आयोजीत करण्यात येते. सदर प्रशिक्षण विनामुल्य असून शेतकरी बाजारात विक्रीसाठी येणाऱ्या शेतकऱ्यांच्या प्रशिक्षणाचा खर्च कृषि पणन मंडळातर्फे करण्यात येतो.

आजअखेर आयोजीत प्रशिक्षण कार्यक्रमांचा गोषवारा पुढीलप्रमाणे ;

| अ.क्र. | विभाग | शहर | प्रशिक्षणार्थींची संख्या |
|---|---|---|---|
| १. | नागपूर | नागपूर | १५ |
| | | वर्धा | १० |
| २. | औरंगाबाद | औरंगाबाद | २५ |
| ३. | अमरावती | अकोला व तेल्हारा | २० |
| | **एकूण** | | **७०** |

वर नमुद केल्याप्रमाणे एकूण ७० शेतकऱ्यांना शेतकरी आठवडे बाजाराबाबतचे प्रशिक्षण देण्यात आलेले आहे.

**आयोजक नेमणूक :**
कृषि पणन मंडळामार्फत मुंबई व नवी मुंबई येथे सुरु करण्यात आलेल्या शेतकरी आठवडे बाजारांवर आयोजकांची नेमणूक करणे गरजेचे आहे, जेणेकरुन सदर बाजार हे शासन निर्णयातील अटी व शर्तीनुसार सुरु राहतील. तसेच दि.१२/०८/२०१६ च्या शासन निर्णयामध्ये शेतकरी उत्पादक कंपन्यांना आयोजक म्हणून नेमण्याची तरतूद आहे. त्यानुसार राज्यातील विविध जिल्ह्यातील १० शेतकरी उत्पादक कंपन्यांची शेतकरी आठवडे बाजार आयोजनाचे काम करण्यासाठी नेमणूक करण्यात आली आहे.

**शेतकरी आठवडे बाजार निधी प्रस्ताव :**
महाराष्ट्र शासनामार्फत सुरु केलेल्या संत शिरोमणी श्री सावतामाळी शेतकरी आठवडे बाजार अभियानाच्या बळकटीकरणासाठी तसेच शेतकरी / शेतकरी गट / शेतकरी उत्पादक कंपनी यांच्यामध्ये जनजागृती करण्यासाठी जिल्हानिहाय बैठका आयोजीत करुन शेतकऱ्यांमध्ये बाजारपेठेच्या बदलत्या परिस्थितीनुसार आवश्यक तो बदल घडविणे, त्यांना प्रशिक्षण देणे, बाजारपेठेतील बदलत्या घडामोडींची माहिती शेतकऱ्यांपर्यंत पोहचविणे इ. कामे करण्याचे नियोजन आहे. शेतकरी आठवडे बाजारात जास्तीतजास्त शेतकरी / शेतकरी गट / शेतकरी उत्पादक कंपन्यांचा सहभाग वाढविण्यासाठी विक्री व्यवस्थापनाच्या काही बाबींकरीता संबंधितांना आर्थिक सहाय्य देणे गरजेचे आहे. विक्री व्यवस्थापनातील घटक व त्यासाठी द्यावयाचे आर्थिक सहाय्य याचा रक्कम रु.४७.०५ कोटींचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आलेला आहे. यापैकी राज्य शासनाने शेतकरी आठवडे बाजाराच्या प्रचार व प्रसिध्दीसाठी व बळकटीकरणासाठी रक्कम रु.४.०० कोटींचा प्रस्ताव मंजूर केला आहे. तसेच शेतकरी आठवडे बाजारात वाहतूकीसाठी गाड्या, प्लॅस्टीक क्रेट्स, इलेक्ट्रॉनिक्स वजन काटे व टेन्ट इ. साठींचा ५० टक्के अनुदानाचा रक्कम रु.४७.०५ कोटींचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

**शेतकरी आठवडे बाजारांसाठी जागा मिळणेबाबत**
कृषि पणन मंडळाने सुरु केलेल्या शेतकरी आठवडे बाजारांना शेतकऱ्यांकडून मिळणारा प्रतिसाद लक्षात घेवून महानगरपालिका / नगरपालिका यांनी त्यांच्या कार्यालयाच्या आवारात त्यांच्या भाजीमंडईत तसेच नगरपालिका

क्षेत्रात शेतकरी आठवडे बाजारास जागा उपलब्ध करुन देणेबाबत नगर विकास विभागाने शासन परिपत्रक क्र. संकिर्ण-२०१६/प्र.क्र.३५३/नवि-२०, दि.२४ ऑगस्ट २०१६ रोजी प्रसिध्द केले आहे. सदर शासन निर्णयामध्ये नमुद केलेले आहे की, "शेतकऱ्यांना त्यांचे भाज्या, फळे, अन्नधान्य व इतर कृषि उत्पादने थेट विक्रीसाठी महानगरपालिका / नगरपालिका यांनी त्यांच्या कार्यालयाच्या आवारात, त्यांच्या भाजीमंडईत, तसेच नगरपालिका क्षेत्रात किमान एक मैदान व महानगरपालिका क्षेत्रात ३ ते ४ मैदाने, दर शनिवार किंवा रविवारी उपलब्ध करुन द्यावीत. या शेतकरी आठवडे बाजारांकरीता आच्छादन काढुन टाकता येणाऱ्या शेड उभारण्यात याव्यात तसेच या शेतकरी आठवडे बाजाराबाबत जनजगृती करावी". परंतू शेतकरी आठवडे बाजाराची व्याप्ती व त्यास शेतकऱ्यांकडून तसेच ग्राहकांकडून मिळणारा प्रतिसाद लक्षात घेता महानगरपालिका / नगरपालिका यांनी शहरातील प्रत्येक प्रभागातील पालिकेच्या मोकळ्या जागा आठवड्यातील दर दिवशी विनामूल्य उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे.

## ५.आंतरराज्य विक्री व्यवस्थापन

महाराष्ट्र राज्य हे फळे आणि भाजीपाल्याच्या उत्पादनाच्या दृष्टीकोनातून देशातील अत्यंत महत्वाचे राज्य असून कृषि मालाच्या निर्यातीमध्येही महाराष्ट्र राज्याचा वाटा हा साततत्याने महत्वाचा राहिलेला आहे. राज्यामध्ये द्राक्ष, डाळींब, संत्री, केळी, आंबा, मोसंबी, पपई, बेदाणा या फळांचे मोठ्या प्रमाणात उत्पादन होते. तसेच कांदा, वांगी, भेंडी, टोमॅटो, मिरची इ. भाजीपाल्याचे उत्पादनही मोठ्या प्रमाणात होते. शेतकरी कृषि उत्पन्न बाजार समित्यांमध्ये माल विक्रीसाठी आणतात. या मालाची विक्री झाल्यानंतर खाजगी व्यापारी हा माल देशातील विविध शहरांमध्ये तेथील व्यापाऱ्यांना पाठवितात व संबंधित बाजार पेठांमधील व्यापाऱ्यांमार्फत या शेतमालाची विक्री होत असते. या विक्री प्रणालीमध्ये शेतकऱ्यांनी माल बाजार समितीत आणणे, मालाची चढउतार, वाहतुकीचा खर्च तसेच कृषि मालाच्या विक्रीसाठी होणारा खर्च हा सगळा खर्च हा शेतमालाच्या शेतकऱ्याला मिळणाऱ्या मुल्यातून होवून अंतिमत: शेतकऱ्याला कमी दर प्राप्त होत असतो.

महाराष्ट्रामध्ये एम.ए.सी.पी., ए.डी.बी., सी.ए.आय.एम., एस.एफ.एस.सी. यांचेमार्फत तसेच काही शेतकऱ्यांच्या मार्फत शेतकरी उत्पादक कंपन्यांची स्थापना झालेली आहे. राज्यामध्ये सद्यस्थितीत सुमारे १२०० शेतकरी उत्पादक कंपन्या स्थापन झालेल्या आहेत. शेतकरी कंपन्या स्थापन होत असतांना १) शेतकऱ्यांना कृषि निविष्ठांचा पुरवठा करणे, २) सामाईक सुविधा उपलब्ध करून देणे, ३) तांत्रिक सल्ला देणे, ४) कृषि मालाच्या विक्री व्यवस्थापनासाठी मदत करणे या चार गोष्टीही अभिप्रेत होत्या. शेतकरी उत्पादक कंपन्यांनी कृषि निविष्ठांच्या पुरवठ्यामध्ये तसेच सामाईक सुविधा उपलब्ध करून देण्यामध्ये काही प्रमाणात कामकाज केलेले आहे. तथापि, कृषि मालाच्या विक्री व्यवस्थापनामध्ये अद्यापही शेतकरी उत्पादक कंपन्यामार्फत फारसे कामकाज झालेले दिसून येत नाही. काही कंपन्यांनी या वर्षी किमान आधारभूत किंमतीच्या दराने तूर खरेदीमध्ये काम केले आहे तर काही कंपन्यांनी कडधान्यापासून डाळी तयार करून विक्री करण्याचा प्रयत्न केलेला आहे. अद्यापही यामध्ये फारसे यश आलेले दिसून येत नाही. काही कंपन्या शेतकरी आठवडे बाजाराचे आयोजक त्याचबरोबर शेतकरी आठवडे बाजारामध्ये शेतमालाच्या विक्रीमध्ये पुढे आलेले आहे. तथापि यांची संख्या बरीच मर्यादीत आहे.

राज्यात उत्पादित होणाऱ्या नाशवंत भाजीपाला आणि फळे यांच्या विक्री व्यवस्थेमध्ये शेतकरी उत्पादक कंपन्यांना मदत व मार्गदर्शन करणे अत्यंत गरजेचे आहे. यामध्ये प्रामुख्याने देशातील ७ ते ८ राज्यांमधील बाजार पेठांमध्ये शेतकरी उत्पादक कंपन्यांमार्फत थेट फळे आणि भाजीपाल्याचा पुरवठा केल्यास शेतकरी उत्पादक कंपन्यांना आपल्या सभासदांना काही प्रमाणात जादाचे भाव देणे शक्य होईल. यामध्ये पणन मंडळामार्फत देशातील ज्या राज्यांमध्ये महाराष्ट्रातून फळे आणि भाजीपाला व्यापाऱ्यांमार्फत पाठविण्यात येत आहे अशा राज्यामधील महत्वाच्या शहरांमधील बाजार पेठांचा अभ्यास करणे, तेथिल बाजार समित्यांशी संपर्क

साधून कोणत्या प्रकारचा माल महाराष्ट्रातून त्या बाजार समित्यांमध्ये कोणत्या व्यापाऱ्याकडे येतो याबाबत अभ्यास करणे, बाजार समित्यांधील काही व्यापाऱ्यांशी राज्यातून त्या ठिकाणी पाठविण्यात येणाऱ्या शेतमालाच्या विक्री संदर्भातून चर्चा करणे आणि शेतकरी उत्पादक कंपन्यांनाही आपला शेतमाल सदर व्यापाऱ्यांना थेट पाठविणे आणि याद्वारे शेतमालाच्या विक्री साखळीमध्ये होणारे नुकसान कमी करणे आणि बाजार खर्च कमी करणे याद्वारे शेतकऱ्याला जादाचे उत्पन्न शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या माध्यमातून देणे शक्य आहे. यामुळे शेतकरी उत्पादक कंपन्यांना स्वत:चा व्यवसाय करणे शक्य होवू शकेल. त्याचबरोबर पर्यायी कृषि पणन व्यवस्था विकसीत करण्यासाठी प्रयत्न करता येवू शकेल. याकरीता देशातील ;

१) मध्यप्रदेश - भोपाळ, जबलपूर
२) राजस्थान - जयपूर, उदयपूर
३) उत्तर प्रदेश - लखनौ, कानपूर
४) पश्चिम बंगाल - कोलकाता. असनसोल
५) ओरिसा - भुवनेश्वर, पुरी
६) केरळ - थिरूवानंथपुरम, कोची
७) तामिलनाडू - चेन्नई, त्रिचनापल्ली
८) आसाम – गोहाटी

यापैकी ५ ते ६ राज्य निवडून या राज्यांमध्ये फळे आणि भाजीपाल्याच्या विक्री व्यवस्थेमध्ये ज्या शेतकरी उत्पादक कंपन्या पुढे येवू शकतील अशा शेतकरी उत्पादक कंपन्यांचे एक किंवा दोन प्रतिनिधी यांच्या समवेत संबंधित राज्याचा अभ्यास दौरा करून त्याप्रमाणे पुढील कार्यवाही करणे प्रस्तावित आहे. अभ्यास दौरा आयोजित करतांना सहभागी होणाऱ्या सभासदांचा खर्च संबंधित शेतकरी उत्पादक कंपनीमार्फत करावा. कृषि पणन मंडळाने संबंधितांना राज्यामधील कृषि पणन मंडळे / पणन संचालनालय / बाजार समित्या यांचेशी संपर्क साधून तेथील बाजार समित्यांमधील व्यापाऱ्यांबरोबर चर्चा करणे, व्यापाऱ्यांची निवड करणे, याबाबतचे कामकाज करावे. त्याचबरोबर कोणत्या ठिकाणाहून कोणता माल पाठविणे शक्य आहे, वाहतूकीचे साधन कोणते वापरावे, पेमेंट पद्धत, प्रतवारी तपासणीची यंत्रणा इ. बाबत संबंधित ठिकाणी चर्चा करता येईल.

**६.स्थानिक बाजारपेठ विकास**

- **केरळ राज्याशी केलेला MOU**

महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे, अंतर्गत कृषि समृध्दी समन्वयित कृषि विकास प्रकल्प हा सर रतन टाटा ट्रस्ट व आंतरराष्ट्रीय कृषि विकास निधी यांचे संयुक्त विद्यमाने विदर्भातील अकोला, अमरावती, बुलढाणा, वर्धा व यवतमाळ या सहा जिल्ह्यातील ६४ तालुक्यातील १६०९ गावांतील नैराश्यग्रस्त शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्याकरिता राबविण्यात येत आहे. कृषि समृध्दी प्रकल्पाच्या कार्यक्षेत्रात ७० गावामधील १२०० संत्रा उत्पादक शेतकरी आहेत. सदरील संत्रा उत्पादक शेतकरी महिला बचत गटाच्या माध्यमातून ग्राहकास थेट विक्री करण्याकरिता इच्छुक आहेत. यासाठी आंन्ध्र प्रदेश, कर्नाटक, केरळ, पंजाब व तामिलनाडू इ. राज्यांतील कृषि पणन मंडळ व संबंधित राज्याचे पणन संचालक यांना त्यांच्या राज्यातील कृषि उत्पन्न बाजार समित्यांमध्ये थेट विक्री करीता जागा उपलब्ध करुन देणेबाबत कळविण्यात आले होते. त्याअनुषंगाने केरळ राज्यातील WTO सेल यांनी केरळ राज्यातील संचालक, कृषि यांचेशी कृषि पणन मंडळाने सामंजस्य करार करणेबाबत कळविले आहे. त्याअनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

- **थेट पणन संदर्भातून मार्गदर्शन**

जागतिक मुक्त अर्थव्यवस्थेस तोंड देण्यासाठी तसेच प्रलंबित पणन व्यवस्थेत शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने योग्य तो बदल घडवून आणण्यासाठी केंद्राने मॉडेल ॲक्ट प्रस्तावित केला आहे. मॉडेल ॲक्ट मधील तरतूदी

राज्यांनी स्विकारून बाजार समित्यांच्या कामकाजात सुधारणा, शेतकऱ्यांना जास्तीत जास्त आर्थिक मोबदला मिळवून देण्यासाठी नविन पर्याय निर्माण करणे, एकाधिकाराच्या ऐवजी पणन व्यवस्थेत अनेक पर्याय निर्माण करणे हे मुख्य उद्दिष्ट. अस्तित्वात असलेल्या बाजार समित्या व सर्व बाजार घटकांच्या हिताला कोणतीही हानी पोहोचणार नाही, या दृष्टीनेच कायद्यात सुधारणा करण्यात आल्या आहेत. शेतकऱ्यांच्या कृषि मालाची थेट खरेदी करण्यासाठी सन २००७ मध्ये महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व नियमन) अधिनियम १९६३ मध्ये नविन कलम ५ (ड) चा समावेश करण्यात आला आहे. सद्यस्थित १३२ थेट पणन लायसन्सधारक कार्यरत आहेत. सन २०१४-१५ मध्ये थेट पणनाखालची उलाढाल रु. ११८२ कोटी होती व सन २०१५ ते फेब्रु. २०१६ पर्यंत रु. १२६९ कोटी इतकी आहे. याबाबत पणन मंडळाच्या कृषि पणन मित्र मासिकाच्या माध्यमातून, विविध प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये याबाबतची माहिती दिली जाते.

**७.शेतकरी उत्पादक कंपनी**

कृषि व्यापार विकास विभागामार्फत शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या शेतमालाच्या थेट पणन संदर्भातील कामकाज केले जाते तसेच शेतकऱ्यांमध्ये बाजारपेठेच्या बदलत्या परिस्थितीनुसार आवश्यक तो बदल घडविणे, त्यांना प्रशिक्षण देणे, बाजारपेठेतील बदलत्या घडामोडींची माहिती शेतकऱ्यांपर्यंत पोहचविणे इ. कामे केली जातात. याचाच एक भाग म्हणून शेतकऱ्यांना गठित होऊन शेती करणेबाबत, शेतकऱ्यांची कंपनी स्थापन करणेबाबत प्रोत्साहन देण्याचे काम या विभागमार्फत केले जात आहे. पिक उत्पादकता वाढ, उत्पादित मालाची गुणवत्ता वाढवून शेतकऱ्यांच्या निव्वळ नफ्यात वाढ आणि बाजार संपर्क, पर्यायी बाजार व्यवस्था निर्माण करणे या करीता कृषि व्यापार विकास विभाग प्रयत्नशिल आहे. शेतकरी उत्पादक कंपनी संदर्भातील कंपनी स्थापन करणेबाबत मार्गदर्शन करणे, शेतकऱ्यांना संघटीत करणेबाबत प्रयत्न करणे, विविध शासकीय योजनांचा लाभ करुन देणे, शेतकऱ्यांना आणि शेतकरी उत्पादक कंपन्यांना त्यांच्या कृषि उत्पादनांच्या विक्रीसाठी मदत / मार्गदर्शन आणि प्रशिक्षण देणे, शेतकरी उत्पादक कंपन्यांचा डेटाबेस तयार करणे, थेट शेतमाल विक्रीसाठी व्यवस्था निर्माण करणे, विविध कंपन्यांच्या समन्वयातून नविन तंत्रज्ञानाची माहिती सर्व कंपन्यांना व शेतकऱ्यांना उपलब्ध करुन देण्यासाठी मदत करणे, कृषि व्यवसायाच्या नवनवीन संधीची दालने खुली करुन देणे इ. विविध प्रकारचे कामकाज तातडीने सुरु करण्यात येत आहे.

**शेतकरी उत्पादक कंपन्यांसाठी कार्यशाळेचे आयोजन**

मा.ना.श्री.सुभाष देशमुख, मंत्री, सहकार, पणन व वस्त्रोद्योग तथा अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ यांचे अध्यक्षतेखाली दि. १५ ऑक्टोबर २०१६ रोजी सावित्रीबाई फुले विद्यापिठ येथील चंद्रशेखर ऑडोटोरियम, इंटर युनिव्हर्सिटी सेंटर फॉर ॲस्ट्रॉनॉमी ॲंड ॲस्ट्रोफिजिक्स (आयुका), पुणे येथे शेतकरी उत्पादक कंपन्यांची कृषि पणन विषयक वेगवेगळ्या विषयांवरील एक दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. सदर कार्यशाळेस शेतकरी उत्पादक कंपन्यांचे सभासद व शेतकरी असे एकूण अंदाजे ५०० शेतकऱ्यांनी सहभाग घेतला होता.

मा.ना.श्री. सुभाष देशमुख, मंत्री, सहकार, पणन व वस्त्रोद्योग तथा अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ यांचे अध्यक्षतेखाली कृषि उत्पन्न बाजार समिती यांच्या सहकार महर्षी वि. गु. शिवदारे सभागृह येथे डाळिंब उत्पादक शेतकऱ्यांसाठी दि.२८ ऑक्टोबर २०१६ रोजी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यशाळेस अंदाजे ७५० ते ८०० डाळींब उत्पादक शेतकरी उपस्थित होते.

# फ) तळेगाव शेती विभाग

- कृषि पणन मंडळाच्या शेती विभाग,तळेगाव अंतर्गत १५० एकर जमिन क्षेत्र आहे. सदरचे क्षेत्र मुख्यफार्म व गिलबिल पट्टी असे दोन वेगवेगळया ठिकाणी असून मुख्यफार्म हे प्रक्षेत्र तळेगाव गाव भागास लागून आहे. तसेच गिलबिल पट्टी हे प्रक्षेत्र मुंबई पुणे महामार्गास लागून आहे.
- **गिलबिल पटटी प्रक्षेत्र तपशील मुख्यफार्म प्रक्षेत्र तपशील**

| अ क्र. | गिलबिल पटटी तपशिल | क्षेत्र (एकर) |
|---|---|---|
| अ) | राष्टीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्था | २८.०० |
| ब) | पदवीत्तर कृषी व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालय व निर्यात सुविधा केंद्र | ०१.०० |
| क) | फळबाग लागवडी खालील क्षेत्र (आंबा,पेरु,नारळ व आवळा) | १२.०० |
| ड) | नाला,रस्ते,इमारत व पडीक क्षेत्र | ०९.०० |
| | **एकुण क्षेत्र** | **५०.००** |

**फळबाग –**

सदर प्रक्षेत्रावर आंबा – १५४ फळझाडे , पेरु – ६५० फळझाडे , नारळ – ३२ झाडे , आवळा – ४० फळझाडे अस्तित्वात आहेत. सदर फळबाग पैकी पेरु व आंबा फळझाडे फक्त पाणीपुरविण्याच्या अटीवर वार्षिक भाडेतत्वावर देण्यात आलेले असून पाच वर्षाचे भाडे रु ६,४३,८७७.०० अंतिम करण्यात आलेले आहे.

**मुख्यफार्म प्रक्षेत्र तपशील –**

| अ क्र. | मुख्यफार्म तपशिल | क्षेत्र (एकर) |
|---|---|---|
| अ) | लागवडी योग्य क्षेत्र | ३०.०० |
| ब) | तलावाखालील क्षेत्र (पाण्याचे क्षेत्र – अंदाजे २७ - २८ एकर) | ४१.०० |
| क) | मत्स्यतळी | ०१.०० |
| ड) | नाला, रस्ते, इमारत , पडीक क्षेत्र, मत्स्यतळी व न्यायालयीन बाब | २८.०० |
| | **एकुण क्षेत्र** | **१००.००** |

मुख्यफार्मवरील अ.क्र. 'ब' तलाव क्षेत्र (४२ एकर) मच्छिमारीसाठी पाच वर्ष करारावर मावळ तालुका मच्छिमार को- ऑप सोसायटी,तळेगाव यांचेकडून चौथ्यावर्षाची सन २०१६ -१७ साठी रक्कम रु.५६,०००/- प्राप्त झालेली आहे. अ.क्र. 'क' पाण्याची दोन तळी (१ एकर) श्री. सिकीलकर ,तळेगाव यांना मत्स्यमारीसाठी कराराने पाचवर्षासाठी दिलेली आहेत. सन २०१६ - २०१७ ची रक्कम रु.३२०००/- प्राप्त झालेली आहे.

मुख्यफार्मवरील लागवडी योग्य क्षेत्रावर पुर्वी प्रात्याक्षिक पिके ऊस व इतर पीके (भात,सोयाबीन, इ.) घेण्यात येत होती. या जमीनीवरील नगरपरिषद आरक्षण बाब (डि पी रस्ता सोमाटणे ते तळेगाव), जमीनीस कंपाउट करणे आणि तलावात येणारे दुषित पाणी बंद करणे इ. कारणाने पिक पध्दती मागील ५ वर्षापासून तुर्तास बंद आहेत. दुषित पाणी तलावात न येता बाहेर काढणेसाठी बंद गटर काढणे बाबत नगरपरिषद,तळेगाव यांचेकडे पाठपुरावा चालु असून आवश्यक संमतीपत्र सादर करण्यात आलेले आहे.

मुख्यफार्म येथील शेतजमीन लागवडीखाली आणण्यासाठी पाणी पाईपलाईन दुरुस्ती व जमीन क्षेत्रास कंपाऊड करणे. इ. कामकाजाबाबत मा.संचालक सभे पुढे विषय मंजुरीसाठी सादर करण्यात आलेला असून कार्यवाही चालू आहे.

# ६) इतर प्रकल्प

## १) आंतरराष्ट्रीय कृषि विकास निधी सहाय्यीत कृषि समृद्धी – समन्वयीत कृषि विकास प्रकल्प (CAIM)

पश्चिम विदर्भातील अमरावती, अकोला, बुलढाणा, वर्धा, यवतमाळ आणि वाशिम या सहा जिल्हयांमध्ये कृषि क्षेत्रात शासनामार्फत सध्या राबविण्यात येत असलेल्या सर्व योजनांमध्ये समन्वय साधुन कृषि विकास साधण्याकरीता महाराष्ट्र शासन पुरस्कृत, आंतरराष्ट्रीय कृषि विकास निधी (IFAD) व सर रतन टाटा ट्रस्ट (SRTT) सहाय्यीत कृषीसमृध्दी समन्वयीत कृषि विकास प्रकल्प (CAIM) राबविण्यात येत आहे.

मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी नागपूर येथे दि. ३० डिसेंबर २००८ रोजी हिवाळी अधिवेशनामध्ये प्रकल्प घेण्याची घोषणा केली. या प्रकल्पाचे उद्घाटन मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या शुभहस्ते व मा. मंत्री, सहकार, पणन व संसदीय कार्य, महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखाली दि. ७ मे २०१० रोजी अमरावती येथे करण्यात आले. सदर प्रकल्प वर्ष २०१८ पर्यंत असून या प्रकल्पाच्या माध्यमातून सहा जिल्हयातील निवडक १६०६ गावांमधिल सुमारे २,८६,००० लाभार्थी कुटूंबांना लाभ देवून कृषि विकास साधला जात आहे.

**प्रकल्पाचा मुख्य उद्देश**

या प्रकल्पाचा मुख्य उद्देश म्हणजे घटलेले कृषि उत्पन्न वाढविण्याच्या प्रयत्नांमध्ये योगदान देवुन प्रकल्प क्षेत्रातील कुटुंबाचा, शाश्वत व वैविध्यपूर्ण उत्पनांच्या स्त्रोतांसह, कृषी व कृषियेत्तर उत्पनांच्या साधनांद्वारे विकास करणे. त्याचप्रमाणे उत्पादनातील व बाजारपेठीय जोखीमीमुळे दारिद्रय व नैराश्येच्या परिस्थितीत न जाता कुटुंबांना सुस्थितीत पुर्नस्थापित करणे हा होय.

**प्रकल्पाची उद्दिष्टये**

१. वैविध्यपूर्ण शेती आणि कृषियेत्तर उत्पनांच्या साधनांद्वारे कुटुंबांच्या उत्पन्नात वाढ करणे.
२. सेंद्रिय शेती व किमान निविष्टांची कंत्राटी शेती पध्दती अवलंबुन कृषि विकास करणे.
३. कृषि उत्पादनांची प्राथमिक प्रक्रिया, त्यांची गुणवत्तावाढ आणि मालाची विक्री व्यवस्था इ. बाबतीत शेतकऱ्यांचा सहभाग वाढविणे.
४. सुक्ष्म-वित्तपुरवठा (Micro-Finance) आणि अतिलघु-उद्योगांद्वारे महिला सक्षमीकरण.
५. शासनाचे सर्व स्त्रोत आणि योजनांमध्ये समन्वय साधणे.

**प्रकल्पाचे लाभार्थी**

प्रकल्प क्षेत्रातील एकूण सुमारे ३ लाख कुटुंबांना व सुमारे २० लाख लोकांना या प्रकल्पाचा फायदा होणार आहे. प्रकल्पातील प्रत्येक गावातील २०० ते ३०० कुटुंबांना विविध योजनांच्या माध्यमातून लाभ मिळणार आहे. या प्रकल्पातील लाभार्थी प्रामुख्याने खालील प्रमाणे आहेत;

- दारिद्रय रेषेखालील कुटूंब.
- अनुसूचित जाती, जमाती.
- अल्प व अत्यल्प भुधारक व भूमिहीन कुटूंब.
- ग्रामिण महिला.
- नैराश्यग्रस्त शेतकरी हे प्रमुख लाभार्थी असतील.

**प्रकल्पाचे प्रमुख घटक**

१. विविध खाजगी, सेवाभावी व शासकीय संस्थांमध्ये भागिदारी निर्मीती आणि या संस्थांचा क्षमता विकास- महिलांचे सक्षमीकरण (SHG & CMRC)

२. उत्पादनापासून पणन व्यवस्थेपर्यंत बाजार जाळयांद्वारे (Market Linkage) समन्वय साधणे आणि शाश्वत शेतीला प्रोत्साहन देणे :

- शाश्वत शेती
- मुळ-स्थळी जलसंधारण
- बाजार जाळयांची निर्मीती व शेती आधारित अतिलघु आणि लहान व मध्यम प्रकल्प / उद्योगांची उभारणी
- पशु संवर्धन

## ३. प्रकल्प व्यवस्थापन

**वर्ष २०१६-१७ मध्ये झालेली कामे**

- बचतगट स्थापन - ९८०, अधिग्रहित (अडोप्टेड) बचतगट - ३०२
- ५००२ अतिगरीब कुटुंबांना उघुउद्योगासाठी अर्थसहाय्य.
- शेतकरी गट / संयुक्त दायीत्व गट स्थापना - ४४६
- १९२० बीसीआय लर्निंग ग्रुपची बांधनी
- २४ उत्पादक कंपन्यांची स्थापना
- २३ कृषि सेवा केंद्राची स्थापना
- दुग्ध संकलन केंद्र - ३३
- माती परीक्षण प्रयोगशाळा- १०
- ग्राम उद्योग केंद्र - २३
- शेततळयाची निर्मिती - २८८
- मूळ स्थळी जंलसंधारण - २,७१,११२ हेक्टरवर)
- नाला खोलीकरण - २८
- सिमेंट नाला बांध- ५५
- सि. ना. बा. गाळ काढणे - १५७
- विहिर पुर्नभरण - २६७
- १३१९ सिंचन साहित्यांचे वाटप
- ९५३११ शेतक-यांना शाश्वत शेती व BCI प्रॅक्टीस बाबत प्रशिक्षण
- बीसीआय (BCI-Better Cotton Initiative) अंतर्गत प्रकल्पातील ६९९२५ कापुस उत्पादक शेतकऱ्यांचे ८२७३० हेक्टर क्षेत्रावर कापुस उत्पादन.
- २२६२ शेतकरी, १६१९.६ हेक्टर क्षेत्राकरीता ३६ बाजार जाळ्यांची निर्मिती.
- १.२० लक्ष हेक्टरवर LEISA शेती व BCI प्रॅक्टीस
- ११९६ - जैविक खत युनिटची निर्मिती
- माती परीक्षण - १२०१३ नमुने
- एकत्रीत निविष्ठा खरेदी - जिप्सम (भूसुधारक) -७२७८ टन
- शेडनेट - ५८
- मधूमक्षीका पालन - ६ बॉक्स
- ११ दालमिलची उभारणी करण्यात आली.

- शेती अवजार बँक व्यवसाय अंतर्गत १२ रोटावेटर, १४ शेती यंत्र, ३ स्पायरल सेपरेटर, ३ बीबीएफ प्लांटर घेवून गटांनी व्यवसाय सुरु केला.
- प्रकल्पांतर्गत १५२८ लाभार्थींना परसाबागेतील कुक्कुटपालनाकरीता प्रोत्साहित करण्यात आले.
- १०१८ - शेळीपालन व्यवसाय
- ८७२ - घरगुती दुग्धव्यवसाय
- १८ - मत्स्यपालन व्यवसाय
- वैरण विकास कार्यक्रम - ६६५ हेक्टर
- ११६९२ पशुधन व्यवसायीक लाभार्थ्यांना प्रशिक्षण
- १६७७ युवक/ युवतींना कौशल्य विकास व्यावसायीक प्रशिक्षण
- प्रकल्पाचे त्रैमासिक 'कृषिसमृध्दी' जून २०१६ पासून सुरु करण्यात आले.
- प्रकल्पांतर्गत ५५ शेतकऱ्यांना 'कृषिसमृध्दी' देवून प्रोत्साहीत करण्यात आले.
- प्रकल्पांतर्गत सर्व ६ जिल्ह्यांमध्ये 'कॅशलेस व्यवहार' कार्यशाळा आयोजित करण्यात आली.

**कंत्राटी शेती - क्षेत्र १६१९ हेक्टर**

- सोयाबीन बिजोत्पादन - ६००.८५ हेक्टर
- कापूस बिजोत्पादन - ७९.३३ हेक्टर
- हरभरा बिजोत्पादन - ४१०.६५ हेक्टर
- मका बिजोत्पादन - २.५ हेक्टर
- मुंग/उडीद बिजोत्पादन - ८० हेक्टर
- भेंडी बिजोत्पादन - १३.४ हेक्टर
- कांदा बिजोत्पादन - १२०.२० हेक्टर
- मिर्ची - ०.८ हेक्टर
- तूर - ३११० हेक्टर

**प्रदर्शनी**

**कृषिविकास प्रदर्शनी, अमरावती**

- १० ते १३ एप्रिल २०१६
- ५६ बचत गटांचा सहभाग
- ६.१९ लाख रुपयांचा व्यवसाय

**ॲग्रोव्हिजन पदर्शनी, नागपूर**

- १२ ते १४ नोव्हेंबर २०१६
- १० बचत गट व ३ सीएमआरसीं चा सहभाग

**ॲग्रीटेक कृषी प्रदर्शनी, अकोला**

- २७ ते २९ डिसेंबर २०१६
- १ शेतकरी उत्पादक कंपनी व १ महिला बचत गटाचा सहभाग
- ५० हजार रुपयाचा व्यवसाय

**कृषी वसंत प्रदर्शनी, अकोला**

- २७ ते ३० जानेवारी २०१६
- २ शेतकरी उत्पादक कंपनी व ५ महिला बचत गटाचा सहभाग

- १.८५ लक्ष रुपयाचा व्यवसाय

**कार्यशाळा**

१. स्वयंरोजगार कार्यशाळा - ८ जुलै २०१६
२. यशस्वी उपक्रमांचे परिसंवाद - २१ ऑक्टो.२०१६
३. शाश्वत शेती व स्वयंरोजगार कार्यशाळा - २५ नोव्हें.२०१६
४. टेक्सटाइल आर्ट - क्राफ्ट, ब्लॉक प्रिंट व फॅशन डिजाईन - १५ ते २४ नोव्हें.२०१६

## २) जागतीक बँक सहाय्यीत - महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषि विकास प्रकल्प (MACP)

१. महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषी विकास प्रकल्पाचा प्रमुख उद्देश राज्यातील शेतीची उत्पादकता वाढविणे, शेतकऱ्याच्या शेतमालास किफायतशिर भाव मिळवुन देणे व त्यं ाचा बाजार पेठामधील सहभाग वाढविणे हा आहे.

२. हा प्रकल्प एकुण ७०८.२० कोटीचा असुन त्यामध्ये जागतिक बँकेचा हिस्सा ४६४.३० कोटी, महाराष्ट्र शासनाचा हिस्सा ५२.०५ कोटी व प्रकल्पाचा लाभ घेणाऱ्या लाभार्थी संस्थाचा हिस्सा १९१.८५ कोटी आहे.

३. घटक निहाय जागतिक बँकेच्या आर्थिक सहभागाचा तपशीलखालील प्रमाणे:

(रक्कम कोटीत)

| अंमलबजावणी कक्ष | एकूण किंमत | प्रकल्पाचा एकुण झालेला खर्च | टक्केवारी |
|---|---|---|---|
| प्रकल्प समन्वय कक्ष | ६१.२६ | ४९.६३ | ८१.०१ |
| प्रकल्प अंमलबजावणी कक्ष (कृषि पणन) | २७७.०३ | २३८.८२ | ८६.२१ |
| प्रकल्प अंमलबजावणी कक्ष (कृषि) | १९४.६६ | १२९.९८ | ६६.७७ |
| प्रकल्प अंमलबजावणी कक्ष (पशुसंवर्धन) | ८.६३ | ७.१८ | ८२.७५ |
| **एकूण** | **५४१.६४** | **४२५.६३** | **७८.५८** |
| लाभार्थि हिस्सा | १७०.४७ | ९९.२९ | ५८.२४ |
| **एकूण** | **७१२.१२** | **५२४.९२** | **७३.७१** |

४. जिल्हास्तरीय 'आत्मा' तालुका स्तरावरील शेतकरी माहिती व सल्ला केंद्र, फलोत्पादन प्रक्रिया संस्था, औरंगाबाद व वानामती, नागपूर यासारख्या निवडक प्रशिक्षण संस्थांच्या बळकटीकरणातून कृषी तंत्रज्ञान व बाजारपेठांशी जोडणी यासाठीचे प्रयत्न केले जात आहेत. सर्व जिल्ह्यातील आत्मा कार्यालयांमध्ये कामात गती यावी यादृष्टीने काम्पुटर, लॅपटॉप, प्रोजेक्टर यासारख्या सुविधा उपबद्ध केल्या आहेत. याचबरोबर प्रत्येक जिल्ह्यात दोन याप्रमाणे स्थापित शेतकरी माहिती व सल्ला केंद्रांसाठी देखील माहिती तंत्रज्ञान संबंधी सुविधा उदा. एलसीडी प्रोजेक्टर, पोष्टर्स इ. सुविधा उपलब्ध करुन दिल्या आहेत, जेणेकरुन खेडेगावातील शेतकऱ्यांपर्यंत पोहोचून शेतीविषयक तांत्रिक माहिती देवून शेतकऱ्यांमध्ये जागृती निर्माण होईल. प्रकल्प कामाशी संबधीत सर्व जिल्ह्यातील कृषी, कृषी पणन व पशुसंवर्धन विभागातील अधिकाऱ्यांसाठीप्रशिक्षण कार्यक्रम व कार्यशाळांचे आयोजन मोठ्या प्रमाणात केले जाते. या कार्यशाळांमुळे प्रकल्पाशी संबंधीत माहिती मिळून कामास गती मिळते आहे. तसेच काही विशेष कार्यशाळांचे आयोजन वर उल्लेख केल्यानुसार प्रशिक्षण संस्थांच्या माध्यमातूनही आयोजित केल्या जातात.

५. प्रकल्पातील उपघटकांचा लाभ गाव स्तरावरील शेतकऱ्यांना होणे महत्वाचे असल्याने गावागावात शेतमाल उत्पादनानुसार शेतकऱ्यांचे गट व उत्पादक संघ स्थापनेचे काम केले असून, राज्यात १२,६९३ शेतकरी गटांची स्थापना केली आहे. प्रकल्पामध्ये ४०६ उत्पादक कंपन्याची स्थापना केली असुन ३७० कंपन्याचे व्यवसाय आराखडे तयार केले आहेत.

६. प्रकल्पाच्या सुरुवातीपासून नियमीतपणे राबविले जाणारे उपक्रम म्हणजे पीक प्रात्यक्षिके, काढणी पश्चात तंत्रज्ञान प्रात्यक्षिके, पी.पी.पी. तत्वावर पीक प्रात्यक्षिकांची बाजारपेठेशी जोडणी, नाविण्यपूर्ण प्रकल्प हे या वर्षीदेखील सर्वच जिल्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर राबविण्यात आले. या सर्व उपक्रमांचे नियमीतपणे संनियंत्रण व मुल्यमापन करुन अंमलबजावणीमध्ये आवश्यकते बदल केले जातात.

७. सर्व ३३ जिल्ह्यांसाठी विपणन आराखडेतयार करणे, विक्रेते-ग्राहकसंमेलनांचे आयोजन करणे, उद्योजकता विकास कार्यक्रम, उत्पादकसंघांचे बळकटीकरण यासारखे उपक्रमदेखील अहवाल काळात राबविण्यात आले.

८. कृषी व्यवसाय निर्मिती सुविधा या यंत्रणेने आपला कार्यविस्तार वाढविला असून कृषी व विपणन तंत्रज्ञानविषयक माहिती देण्यासाठी अधिकाऱ्यांच्या कार्यशाळांचे आयोजन, प्रकल्पांतर्गत स्थापित कंपन्यांसाठी व्यवसाय आराखडेतयार करणे, प्रकल्पाशी संबंधीत माहिती अभ्यास अहवाल-विविध उपक्रमांच्या माहिती पुस्तिकांचे प्रकाशन करणेतसेच काही विशेष अभ्यास हाती घेवून त्यासंबंधी आवश्यकतेसहाय्य करणे इ. उपक्रम राबविण्यात आले.

९. पशुधन आधार सेवा या प्रकल्प अंमलबजावणी कक्ष- पशुसंवर्धन यांच्या घटकांतर्गत जनावरांच्या बाजारांमध्ये बांधकामे हाती घेवून आवश्यकसोई- सुविधांच्या निर्मितीबरोबरच संबंधीत जिल्ह्यांमध्ये क्षेत्रीय स्तरावर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. त्यामध्ये जनावरांची शिबीरांचे आयोजन, चारा पिक प्रात्यक्षिकांचे आयोजन यासारख्या उपक्रमांचे आयोजन निवडक १८ जिल्ह्यांमध्ये करण्यात आले. अहमदनगर जिल्ह्यामध्ये शेळी-मेंढी पालकांचे गट व फेडरेशनची स्थापना करण्यात आली असुन १५० गटांची स्थापना केली आहे. निवडलेल्या शेळी-मेंढी पालकांचे प्रशिक्षण व काही गटांमध्ये उस्मानाबादी पैदासक्षम बोकडांचे वाटप करणेही कामे पूर्ण केली आहेत. याचप्रकारे यवतमाळ जिल्ह्यामध्ये शेळीपालन एक उच्यमुल्यवर्धी व्यवसाय या उपघटकांतर्गत शेळीपालनाची २५० प्रात्यक्षिके उभी करण्यात आली असून निवडक शेतकऱ्यांच्या शेतामध्ये चारा पिक प्रात्यक्षिके घेणे, निवडलेल्या शेतकऱ्यांचे प्रशिक्षण, उस्मानाबादी पैदासक्षम बोकडांचे वाटप करणे यासारखे उपक्रम राबविले आहेत.

१०. शेतकऱ्याच्या मालास बाजारपेठ उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने काही पर्यायी बाजारपेठेची साधने उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न प्रकल्पांतर्गत केला जातो. याचाच एक भाग म्हणून वखार महामंडळाच्या निवडक गोदामांमध्ये धान्य चाचणी प्रयोगशाळा स्थापित करणे व धान्य तारण योजनेस चालना देणे, शेतकरी सामुहिक सेवा केंद्र सुरु करुन त्यांना गती देणे, आठवडी बाजारांमध्ये सुविधा निर्माण करणे यासारखे उपक्रम राबविले जात आहेत. आज अखेर ३९४ आठवडी बाजारांचे काम पूर्ण झाले असून ०६ आठवडी बाजारांचे काम प्रगतीपथावर आहे.

११. राज्यातील वखार महामंडळाच्या निवडलेल्या ११२ गोदामांची तसेच ४० गोदामांमध्ये प्रयोगशाळा स्थापित करण्याच्या दृष्टीने आवश्यकसाधनांची व उपकरणांची खरेदी पूर्ण झाली आहे. आता पर्यंत ५७,६२३ गोदम पावत्या शेतकऱ्याना प्रदान करण्यात आल्या आहेत. या गोदामांमध्ये २,८६,४०१ मेट्रीक टन धान्य साठा केला गेला असून रु. २३१.३४ कोटीचे कर्ज धान्य पावती योजने अंतर्गत देण्यात आले.

१२. प्रकल्पांतर्गत निवडलेल्या बाजार समित्यांच्या कामात गतीशीलता येवून केलेल्या सुधारणांचा प्रत्यक्ष लाभ बाजारातील अनेक घटकांनाहोईल यासाठी चांगल्या व्यवस्थापनाची गरज असते. ही बाब ध्यानात घेवून बाजार समित्यांच्या संचालकांच्या क्षमता बांधणीसाठी कार्यशाळा, कर्नाटक राज्यातील बाजार समित्यांच्या कामाची माहिती व्हावी यादृष्टीने अभ्यासदौरे तसेच संबंधीत अधिकाऱ्यांसाठी प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन इ. उपक्रम अहवाल काळात घेण्यात आले.

१३. एकूण ५८ बाजार समित्या व २० जनावरांच्या बाजारांमधील बांधकामे पूर्ण झाली आहेत. याशिवाय २३ बाजार समित्या व ४ जनावरांच्या बाजारातील बांधकामे सुरु आहे. ८२,८५० मे.टन इतक्या क्षमतेचे गोदामाचे बांधकाम केले आहे.

१४. एकूण १५० बाजार समित्यांमध्ये बाजार माहिती फलक प्रकल्पा मार्फत लावण्यात आले आहेत. तसेच एकूण २५ बाजार समित्यांमध्ये सगणकीय लिलाव पद्धतीचा अवलंब प्रकल्पामार्फत केला जाणार आहे. सध्या २१ बाजार समित्यांमध्ये संगणकीय लिलाव पद्धत कार्यान्वीत करण्यात आली आहे.

१५. टॅली सॉफ्टवेअरच्या माध्यमातून राज्यातील सर्व बाजार समित्यामध्ये समान लेखे पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे.

१६. प्रकल्पाच्या प्रभावी अंमलबजावणीच्या दृष्टीने प्रकल्पाच्या प्रगतीचे संनियंत्रण, पर्यावरण व सामाजिक व्यवस्थापन उपाययोजनांची अंमलबजावणी, प्रकल्प निधीचे संनियंत्रण व तक्रार निवारण यंत्रणा कार्यरत आहेत. त्यादृष्टीने प्रकल्प अंमलबजावणीशी संबंधीत सर्व अधिकारी व संलग्न शासन विभागाचे विविध स्तरावरील अधिकारी यांना मार्गदर्शकसूचना निगर्मीत केल्या आहेत. याशिवाय संलग्न शासन विभागाकडून वेळोवेळी मार्गदर्शक सूचना दिल्या जातात.

१७. जागतिक बँके चे अधिकारी व मा. प्रधान सचिव (कृषी व पणन) यांच्या वेळोवेळी उप-प्रकल्पांना भेटी व प्रदीर्घ बैठकांचे आयोजन करुन नियमीतपणे मार्गदर्शन यामुळे प्रकल्पाच्या कामात गती येवून प्रभावी अंमलबाजवणी होत आहे, त्याबद्दल प्रकल्पाचे वतीने त्यांचे आभार.

## ३) आशियाई विकास बँक (ADB) सहाय्यीत "कृषि व्यापारविषयक पायाभूत सुविधा विकास गुंतवणूक कार्यक्रम" (AIDIP)

केंद्र शासनाने प्रसृत केलेल्या मॉडेल अॅक्टप्रमाणे कृषि पणन कायद्यामध्ये सुधारणा केलेल्या राज्यांमध्ये कृषि उत्पादनाच्या वाढी बरोबरच महत्वपुर्ण असणाऱ्या "कृषि पणन व्यवस्था" या घटकाच्या विकासार्थ सार्वजनिक-खाजगी भागीदारीतून विविध उपक्रम हाती घेतलेले आहेत. त्या अनुषंगाने आशियायी विकास बँक सहाय्यीत "कृषि व्यापार विषयक पायाभूत सुविधा विकास गुंतवणूक कार्यक्रम" ह्या प्रकल्पात महाराष्ट्र राज्याचा समावेश झालेला असून या प्रकल्पाकरीता सहकार व पणन विभागाची कार्यकारी यंत्रणा म्हणून व महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे यांची अंमलबजावणी यंत्रणा म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे.

या प्रकल्पाद्वारे कृषि विकासाच्या मार्गातील सध्याची कालबाह्य झालेली काढणीपश्चात हाताळणी व्यवस्था, कृषि विपणन क्षेत्रामधील पायाभूत सुविधांच्या निर्मितीमध्ये असलेला सार्वजनिक गुंतवणूकीचा अभाव, नगदी पिकांच्या बाबतीत असलेले मर्यादीत वैविध्यकरण इ. अडथळ्यांवर मात करण्याकरीता "एकात्मिक मुल्य साखळी" (Integrated Value Chain) या प्रतिमानावर (model) आधारीत एकात्मिक मुल्य साखळ्यांची निर्मिती राज्याच्या विविध भागांमध्ये उत्पादित होणाऱ्या कृषि मालाकरीता करण्यात येणार आहे. या मुल्य साखळ्यांतर्गत कृषि व्यापार विषयक पायाभूत सुविधा व रस्ते, वीज, पाणी यांसारख्या इतर सुविधा त्याचप्रमाणे बाजारपेठ विषयक संशोधन (market intelligence), शेतकऱ्यांची क्षमता बांधणी (capacity building) व अस्तित्वात असलेल्या मुल्य साखळ्यांच्या बळकटीकरणाद्वारे कृषि मालाच्या मुल्य साखळी लगतच्या भौतिक व संस्थात्मक जाळ्यांमध्ये सुधारणा घडवून आणण्यात येणार आहे.

एकात्मिक मुल्य साखळीमध्ये कृषि व्यापाराशी निगडीत अनेक घटकांच्या म्हणजेच शेतकरी, व्यापारी, निर्यातदार तसेच उद्योजक व इतर सर्व स्टेक होल्डर्सच्या आवश्यक मुलभूत गरजा लक्षात घेवून राज्यातील त्या त्या भागामध्ये आवश्यक कृषि व्यापार विषयक पायाभूत सुविधा यामध्ये प्रामुख्याने संकलन केंद्रे, प्रतवारी व पॅकिंग केंद्रे, साठवणूक सुविधा, (Ambient and controlled temperature) मुल्यवर्धन आणि बाजारपेठे विषयक संशोधन, वितरण व लॉजिस्टीक्स आणि कृषि मालाच्या उत्पादनापासून ग्राहकापर्यंतच्या (end to end) बाजार जाळ्यांची निर्मिती करणे इ. चा समावेश आहे.

या प्रकल्पाअंतर्गत राज्यामध्ये एकात्मिक मुल्य साखळ्यांची निर्मिती सार्वजनिक खाजगी भागीदारीतून करण्यात येणार असून सर्व मुल्य साखळ्या "हब-स्पोक" मॉडेलवर आधारीत असतील. स्पोकच्या ठिकाणी त्या-त्या भागातील प्रमुख नगदी पिकांचे उत्पादन लक्षात घेवून त्यानुसार पायाभूत सुविधा विकसित करण्यात येणार आहेत. यामध्ये प्रामुख्याने केळी, डाळींब, द्राक्ष, आंबा, मोसंबी, संत्रा, लिंबू, पपई तसेच टोमॅटो, वांगी, बटाटा, कांदा, आले, मिरची इ. पिकांचा समावेश असेल. हबच्या ठिकाणी सर्व स्पोकमधून उपलब्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या कृषि मालाकरीता आवश्यक पायाभूत सुविधा यामध्ये प्रामुख्याने कृषिमालाच्या प्रकारानुसार मालाची सफाई, प्रतवारी, पॅकिंग, गोदामे, शितगृह, रायपनिंग चेंबर इ. तसेच मुलभूत सुविधांमध्ये नॉलेज सेंटर, व्यापार केंद्र, अतिथीगृह, अंतर्गत रस्ते, वीज व पाणीपुरवठा, घनकचरा व्यवस्थापन, बगीचा, उपहारगृह व वाहनतळ इ. चा समावेश असणार आहे. हब येथून कृषिमाल देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय बाजारपेठेमध्ये विक्री करण्याकरीता रेल्वे, विमानतळ येथे आवश्यक कार्गो सुविधा व इतर पायाभूत सुविधांचा विकास करणे अपेक्षीत आहे.

सदर प्रकल्पासाठी केंद्र शासनामार्फत राज्य शासनास आशियाई विकास बँकेकडून $ ८५ दशलक्ष (सुमारे रु. ४०० कोटी) पर्यंत टप्याटप्याने कर्ज मिळणार असुन सदर प्रकल्पात राज्य शासनाचा वाटा रु. ९४ कोटी एवढा

असणार आहे. या प्रकल्पाकरीता भांडवली गुंतवणूकीचे प्रमाण खाजगी गुंतवणूकदार – किमान ६५ टक्के, आशियायी विकास बँक व राज्य शासन ३५ टक्के असे आहे.

सदर प्रकल्पामध्ये निर्माण होणाऱ्या सुमारे १५ एकात्मिक मुल्य साखळयांच्या माध्यमातून ग्रामिण भागांमध्ये कृषि व्यापार विषयक व पणन विषयक पायाभूत सुविधांची निर्मिती होणार आहे. पायाभूत सुविधांच्या निर्मितीमुळे विविध फळे व भाजीपाला यांसारख्या नाशवंत कृषि मालाचा दर्जा वाढून त्यांच्या मागणीत वाढ होईल तसेच शेतकऱ्यांना अधिक बाजारभाव मिळू शकेल. पायाभूत सुविधांच्या निर्मितीमुळे व शेतकऱ्यांच्या उत्पादक कंपन्यांमुळे शेतकरी थेट व्यापारी, निर्यातदार व प्रक्रियादार यांच्याशी करार करु शकतील व त्यामुळे त्यांना कृषि मालाच्या भावाची तसेच उत्पन्नाची हमी मिळेल. या प्रकल्पांतर्गत शेतकऱ्यांना प्रात्यक्षिकांद्वारे प्रशिक्षण देण्यात येणार असल्याने शेतकरी तांत्रिक दृष्ट्या सक्षम होतील, त्यामुळे कृषि मालाच्या दर्जामध्ये सुधारणा होईल. ग्राहकांना स्वच्छ व ताजा कृषि माल उपलब्ध होईल. या प्रकल्पांतर्गत विकसित होणाऱ्या मुल्य साखळयांभोवती कृषि प्रक्रिया उद्योगांच्या उभारणीस चालना मिळेल. अशा प्रकारे या प्रकल्पाच्या माध्यमातून राज्यातील विविध भागांमध्ये त्या त्या भागातील पिकांच्या उत्पादनानुसार आवश्यक त्या कृषि व्यापार विषयक पायाभूत सुविधांची निर्मिती झाल्याने त्याचा लाभ शेतक-यांना होणार असून त्यांचे आर्थिक उत्पादन वाढणार आहे.

**करण्यात आलेले कामकाज**

प्रकल्पाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ अंतर्गत स्वतंत्र प्रकल्प व्यवस्थापन कक्षाची (PMU) स्थापना करण्यात आलेली आहे.

प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यामध्ये विकसित भागात नाशिक एकात्मिक मुल्य साखळी व तुलनेने अविकसित भागात औरंगाबाद-अमरावती या दोन ठिकाणी हब व स्पोक मॉडेलनुसार सार्वजनिक-खाजगी भागीदारी तत्वावर एकात्मिक मुल्य साखळ्यांची उभारणी करण्यात येणार होती. खाजगी गुंतवणुकदार निवडीसाठी दि. 02 नोव्हेंबर 2012 ते 30 मे 2014 या कालावधीत निविदा प्रक्रीया राबविण्यात आली. तथापि विहित मुदतीत एकही प्रस्ताव प्राप्त झाला नाही त्यामुळे निविदा प्रक्रीया रद्द करण्यात आली.

दि. 27 मार्च 2014 रोजी मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या राज्यस्तरीय उच्चाधिकार समितीच्या बैठकीमध्ये प्रकल्प आराखड्यात पायाभूत सुविधांचे सेवाशुल्क शासनाने निश्चित न करता ते बाजारपेठेभिमुख असेल, खाजगी गुंतवणुकदारांसाठीचा कालावधी (Concession Period) 20 ऐवजी 25 वर्षे असेल, खाजगी गुंतवणूकदार निवडीसाठी एक टप्पा निवड (सिंगल स्टेज) पध्दत वापरणे, प्रत्येक स्पोकसाठी स्वतंत्र गुंतवणूकदार निवडीस मान्यता, मुल्य साखळी 1 व 2 वगळता पुढील मुल्यसाखळ्या उभारण्यासाठी खाजगी जागा वापरण्याची गुंतवणूकदारांना परवानगी इ. बदलांना मान्यता दिलेली होती.

अशाप्रकारे प्रकल्प आराखड्यात सुचविण्यात आलेल्या बदलांनुसार तसेच मुंबई, नागपूर, पुणे व औरंगाबाद येथिल रोड शो मधील संभाव्य गुंतवणुकदारांच्या सुचनांनुसार राज्य शासनाच्या पीपीपी सेलच्या मदतीने सुधारित Bid Document दि. 27 ऑक्टोबर 2015 रोजी प्रसिध्द करण्यात आले. दि.16 जानेवारी 2016 या अंतिम तारखेस जालना व पैठण या दोन स्पोकसाठी प्रत्येकी एक प्रस्ताव प्राप्त झाला. दि. 18 जानेवारी 2016 रोजी सदर प्रस्ताव उघडण्यात आले. तथापि सदर प्रस्ताव अपुर्ण स्वरुपाचे असल्यामुळे Non-responsive ठरले व खाजगी गुंतवणुकदार निवडीविना निविदा प्रक्रिया संपुष्टात आली.

MFF-०४५ ची मुदत डिसेंबर २०१७ रोजी संपत असुन ही मुदत डिसेंबर २०२० पर्यंत वाढविणेबाबतचा प्रस्ताव राज्य शासनामार्फत सह सचिव, अर्थ व्यवहार विभाग, वित्त मंत्रालय, भारत सरकार यांना दि. १८ नोव्हेंबर २०१६ व दि. १५ एप्रिल २०१७ रोजी सादर करण्यात आलेला आहे. या प्रस्तावाला आशियाई विकास बँकेने सकारात्मक प्रतिसाद दिलेला आहे.

दुस-या टप्प्यातील चार मुल्य साखळयांसाठी पहिल्या टप्प्यातील सुधारीत निविदा प्रक्रियेतील सर्व तरतुदी व खाजगी जागेचा पर्याय वापरुन निविदा प्रक्रिया राबविण्यात येणार होती. तथापि MFF ची मुदत डिसेंबर २०१७ मध्ये संपत असून त्यास जास्तीत जास्त ३ वर्षांची मुदतवाढ मिळू शकते. त्यामुळे प्रकल्प अंमलबजावणीस उपलब्ध असलेला कालावधी विचारात घेता व शिल्लक असलेली संपुर्ण रक्कम खर्च करण्याच्या दृष्टीने प्रकल्पाची अंमलबजावणी टप्प्यांमध्ये न करता संपुर्ण राज्यात एकाचवेळी करण्याचे प्रस्तावित आहे.

राज्यात आशियाई विकास बँक सहाय्यीत प्रकल्प राबवत असतांना आलेले अनुभव विचारात घेउन केंद्रिय अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालयाच्या एकात्मिक शितसाखळी विकास योजनेच्या धर्तीवर परंतू आशियाई विकास बँकेशी केलेल्या कराराच्या चौकटीत बसेल असा प्रकल्प राज्यभर राबवल्यास गुंतवणूकदारांचा चांगला प्रतिसाद मिळू शकतो हे विचारात घेवून सुधारीत आराखडा तयार करण्यात आलेला असून त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

**सुधारित आराखड्यातील घटक –**
**अ) उत्पादन क्षेत्रालगत उभारावयाच्या सुविधा** – उत्पादन क्षेत्रामध्ये संकलन आणि प्राथमिक प्रक्रीया सुविधा (हाताळणी यंत्रणा, प्रशितकरण केंद्र, शीतगृह, मोबाईल शीतगृह, रायपनिंग चेंबर इ.)
**ब) वितरण हब** – अत्याधुनिक बहुपिकांसाठी, बहुतापमानाची शितगृहे (Modern Multi-product, multi temperature cold storage), नियंत्रित वातावरणातील साठवणूक (Controlled Atmosphere Storage), गोदामे इ.
**क) शीत वाहनाद्वारे वाहतूक** – शीत व्हॅन/ शीत ट्रक्स, इन्सुलेटेड व्हॅन इ.
**ड) प्रक्रीया युनिट** – फ्रोजन प्रोसेसिंग, असेप्टीक प्रोसेसिंग, IQF इ.

उपरोक्त सुधारित आराखडा मान्यतेसाठी आशियाई विकास बँकेस पाठविण्यात आलेला आहे. सदर आराखड्यात आशियाई विकास बँकेच्या सुचनांनुसार आवश्यक ते बदल करून सदर सुधारित आराखडा संपुर्ण राज्यात राबविण्याचे प्रस्तावित आहे.

***